महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वार्षिक अहवाल

## २०१५-२०१६

# वार्षिक अहवाल २०१५-२०१६

## अनुक्रमाणिका


| तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | ०१ |
| संचालक मंडळाचा अहवाल | ०२ |
| फॉर्म नं.एमजीटी-९ | १३ |
| सीएसआर | २० |
| सांविधिक लेखापरिक्षकांच्या अहवालास उत्तरे | २६ |
| सेक्रेटरीयल लेखापरिक्षण अहवाल | ३७ |
| महानिंयत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | ४२ |
| महानिंयत्रक व महालेखा परिक्षक यांच्या अहवालाला उत्तर | ४४ |
| लेखा परिक्षकांचा अहवाल (स्वायत्त) | ४८ |
| ताळेबंद (स्वायत्त) | ५८ |
| नफा-तोटा विवरण (स्वायत्त) | ५९ |
| वित्तिय विवरण पत्रात येणाऱ्या अनुसूची (स्वायत्त) | ६० |
| रोकड प्रवाह विवरण (स्वायत्त) | ९२ |
| लेखा परिक्षकांचा अहवाल (एकत्रित) | ९४ |
| ताळेबंद (एकत्रित) | १०६ |
| नफा-तोटा विवरण (एकत्रित) | १०७ |
| वित्तिय विवरण पत्रात येणाऱ्या अनुसूची (एकत्रित) | १०८ |
| रोकड प्रवाह विवरण (एकत्रित) | १४५ |
| दिर्घ मुदतीचे कर्जे | १४७ |
| अल्प मुदतीचे कर्जे | १५५ |
| प्रकल्प वैशिष्ट्ये | १५६ |

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## संचालक मंडळ
## (०१-०४-२०१५ पासून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत)

| | |
|---|---|
| **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** | श्री. बिपीन श्रीमाळी (०५.०१.२०१५ पासून) |
| संचालक | श्री. मुकेश खुल्लर (०४.०२.२०१५ ते ०७.०५.२०१६) |
| संचालक (मायंनिग) | श्री. श्याम वर्धने (१४.०९.२०१६ पासून) |
| संचालक (संचलन) | श्री. विजय सिंग (२८.०८.२०१३ ते २८.०८.२०१६)<br>श्री. सी. एस. थोटवे (१९.०९.२०१६ पासून) |
| संचालक (वित्त) | श्री.जे. के. श्रीनिवासन (२६.०५.२०१४ पासून) |
| संचालक(प्रकल्प) | श्री. सी. एस. थोटवे (२८.०८.२०१३ ते २८.०८.२०१६)<br>श्री. वी. एम. जयदेव (१९.०९.२०१६ पासून) |
| संचालक | श्रीमती. इरावती दानी (२६.०६.२०१४ पासून) |
| संचालक | श्री. विश्वास पाठक (२१.०७.२०१५ पासून) |

# संचलकाचा अहवाल

प्रिय सभासद

आपल्या कंपनीचा ११वा वार्षिक अहवाल आणि दि.३१मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखेपरिक्षित लेखे-आणि वित्तिय विवरणपत्रे सादर करण्यास आपल्या संचालकांना आनंद होत आहे.

**स्वायत्त वित्तिय निष्कर्ष**

(₹ कोटी मध्ये)

| तपशील | २०१५-१६ | २०१४-१५ |
|---|---|---|
| निर्माण केलेले विजेचे एकूण युनीट्स (दशलक्ष) | - | ४९३१३ |
| उत्पन्न | - | - |
| वीज विक्रीपासून महसूल | १९२९३ | १८९७० |
| इतर उत्पन्न | १०३ | २६७ |
| एकूण उत्पन्न | १९३९६ | १९२३७ |
| खर्च | - | - |
| वापरलेल्या मालाची किमत | ११३७५ | १२१८२ |
| इतर खर्च | १७३२ | १५९५ |
| कर्मचारी खर्च | १२६८ | १४१५ |
| घसारा / कर्जफेडीसाठी तरतुद | १२७६ | १०९२ |
| वित्तिय खर्च | २००८ | १९५२ |
| पूर्वकाळातील बाबी (निव्वळ) | (४१) | (०८) |
| निव्वळ नफा - (कर आणि असाधारण बाबी या पूर्वीचा) | १७७८ | १००९ |
| असाधारण बाबी (वित्तिय पूर्नरचना योजनेच्या अंतिमीकरणाने आकाराण्यात आलेला असाधारण घसारा | १०५२० | - |
| करपूर्व नफा | (८७४२) | १००९ |
| कर (निव्वळ) | ५२ | ५७३ |
| निव्वळ करोत्तर नफा | (८७९४) | ४३६ |

कामगिरी-

(अ) वित्तिय कामगिरी:

आढाव्याच्या वर्षात वीज विक्री उत्पन्नात १.७०टक्क्याने वाढ झाली. ते ₹ १८९७० कोटी वरुन ₹ १९२९३ कोटी असे वाढले. वीज विक्रीच्या महसुलातील वाढ ही म.वि.नि. आयोगाने मागील काही वर्षा संबंधी समायोजनाचा आदेश दिल्यामुळे तसेच कंपनीच्या नव्या युनिट्सने विजनिर्मिती केल्यामुळे झाली. याच कालखंडात इतर उत्पन्न ६१.१८ टक्के घट होऊन ते ₹ १६३ कोटीने कमी झाले. यामुळे एकूण उत्पन्नातील वाढ ०.८३ टक्के आहे. वापरले जाणारे साहित्याचा खर्च ₹ १२१८२ कोटी वरुन ₹ ११३७५ कोटी झाले याचे मुख्य कारण

आयात केलेल्या कोळश्याची किंमत ₹ ८०४ कोटीने कमी होणे हे आहे. वित्तिय खर्च २.८५ टक्कयांनी वाढून ₹१९५३ कोटी वरुन ₹ २००८ कोटी असा जास्त झाला याच मुख्य कारण कोराडी युनीट क्र.८ याच्या कार्यान्वयेन केल्यानंतर व्याजाचा बोजा वाढला. कर्मचारी खर्च ₹१४१५ कोटी वरुन ₹ १२६८ कोटी असा (१०.३६ टक्के) कमी झाला. मागील वर्षी वेतन सुधारणा केल्याने रजा रोखीकरण व उपदान यांच्या तरतुदी वाढल्याने त्याचा प्रभाव पडून खर्च जास्त होता. कोराडी युनीट कार्यान्वित केल्याने घसारा / कर्जफेडीच्या तरतुदी यात १६.७५ टक्के वाढ झाली. यात आयुष्य आधारित घसाऱ्याचाही प्रभाव आहे. इतर खर्चाही ₹ १७३२ कोटी वरुन ₹१५९५ कोटी असे वाढले. याची मुख्य कारणे परकीय चलनातील व्यवहारात ₹ ९४ कोटी हानी झाली इतर तसेच जुन्या शिलकीच्या तरतुदी वाढणे आणि सर्वसाधारण खर्च नेहमी प्रमाणे वाढणे ही आहेत. परिणामी करपूर्व नफा मागील वर्षी ₹ १००९ कोटी होता तो यावर्षी ₹ १७७८ कोटी झाला. आढावा वर्षात पूर्वीच्या म.रा.वि. मंडळाचे वित्तिय पूनर्रचना योजनेचे अंतिमीकरण झाले. त्याचा परिणाम असाधारण घसारा ₹१०५२० कोटी इतका आकारण्यात आलेला आहे. यामुळे मागील वर्षी ₹ ४३६ कोटींचा नफा कमवणाऱ्या आपल्या कंपनीस आढाव्याच्या वर्षी ₹ ८७९४ कोटी तोटा झाला आहे.

**(ब) प्रवर्तनातील कामगिरी :**

दि. ३१ मार्च २०१६ रोजी आपल्या कंपनीची वीज निर्मितीची एकूण स्थापित क्षमता ११६५७ मेगा वॅट एवढी असून त्यात औष्णिक वीज ८२२० मे.वॅ, वायू. ६७२ मे.वॅ., जल विद्युत २५८५ मे.वॅ. अणि सौरवीज १८० मे.वॅ. अशी विभागणी आहे. आढावा वर्षात आपल्या कंपनीने एकूण ४७६९९ दशलक्ष युनीट्स वीज निर्माण केली. (औष्णिक-४०६५५ द.ल.यु., वायू – २८८८ द.ल.यू., जलविद्युत-३८६३द.ल.यु., आणि सौरवीज – २९३ द.ल.यु.)

- वर्ष २०१५-१६ मध्ये कोळसा आधारित औ.वि केंद्राची सरासरी वीज उपलब्धता अंक ७०.१२ टक्के झाला. मागील वर्षी ७८.७४ टक्के होता.
- सयंत्र भार अंक ५६.०२ टक्के झाल. मागील वर्षी ५८.९५ टक्के होता.

आढावा वर्षात कंपनीचे बरेच युनीट्स विविध कारणास्तव चालू ठेवता आले नव्हते. जसे पाण्याची टंचाई, आर्थिक कारणावरुन बंद ठेवणे, दुरुस्ती व देखभालीची कामे आणि जुनी युनीट्सचे कार्यान्वयन बंद करणे इ.

परळी केंद्रातील युनीट्स पाण्याच्या टंचाईमुळे खाली दिलेल्या कालावधीत बंद ठेवावे लागले होते :-

अ) परळी युनीट -३ - २७/०६/२०१५ ते ३१/०३/२०१६

ब) परळी युनीट -४ - ०५/०७/२०१५ ते ३१/०३/२०१६

क) परळी युनीट -५ - ०६/०७/२०१५ ते ३१/०३/२०१६

ड) परळी युनीट -६ - २५/०६/२०१५ ते ३१/०३/२०१६

इ) परळी युनीट -७ - ०८/०७/२०१५ ते ३१/०३/२०१६

म.वि.नि. आयोगाच्या आदेशानुसार खालील केंद्रे आर्थिक कारणाबद्दल काही काळ बंद ठेवावी लागली.

अ) चंद्रपूर युनीट - १- ०१/०४/२०१५ ते ३०/०६/२०१५

ब) भुसावळ युनीट - २ - ०१/०४/२०१५ ते ३०/०६/२०१५

क) कोरडी युनीट-६-०१/०४/२०१५ ते ३०/०६/२०१५

खालील युनीट दुरुस्ती व देखभालीसाठी बंद ठेवावे लागले होते

ड) कोरडी युनीट-६-०१/०७/२०१५ ते ३१/०३/२०१६

खालील युनीट निवृत्त करुन त्यातील कार्य बंद करण्यात आले.

अ) चंद्रपूर युनीट-१-१८/०३/२०१६ पासून

ब) चंद्रपूर युनीट-२-१८/०३/२०१६ पासून

वायु आधारित वीज निर्मिती केंद्रांना वायु कमी प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे त्यांची सरासरी उपलब्धता ९८.३१ टक्के आणि संयत्र भार घटक अंक – ४८.९३ टक्के होता प्रर्वतन कामगिरि वर परिणाम करणारी इतर कारणे अशी :-

- चालु वर्षी कोळशाचे रियलायझेशन ८०.६० टक्के असे होते. मागील वर्षी ते ७१.३२ टक्के होते.
- विशिष्ट कोळसा वापर यावर्षी ०.८१३ के जी/ के डब्ल्यु एच होता. तर मागील वर्षी तो ०.८६० के जी/ के डब्ल्यु एच होता.
- बॉयलर ट्यूब गळतीची टक्केवारी चालू वर्षी २.१३ टक्के होती. गतवर्षी ती ३.५५ टक्के होती.
- विशिष्ट तेल वापर चालू वर्षी ०.८९ एम एल/ के डब्ल्यु एच होता. गतवर्षी तो १.२० एम एल/ के डब्ल्यु एच होता.
- साहयकारी वापर यावर्षी ९.११ टक्के होता. मागील वर्षी ९.७९ टक्के होता.
- या वर्षी जाळलेल्या कोळशाचे कॅलोरिफिक मूल्य ३१५९ किलो कॅलरीज प्रती किलो होते.
- चालू वर्षी हिट रेट २५७६ के कॅलरीज/ के डब्ल्यु एच होता.
- चालू वर्षी वहन हानी ०.९३ टक्के होती. गतवर्षी ०.६३ टक्के होती.
- **वर्ष २०१५-१६ मधील महानिर्मितीची ठळक वैशिष्ट्ये :-**
  - विशिष्ट तेलाचा सर्वात कमी वापर :- ०.८९ एम एल/ के डब्ल्यु एच (प्रमाणाक – १.८१ एम एल/ के डब्ल्यु एच) (मागील वर्षी १.२० एम एल/ के डब्ल्यु एच)
  - बी टी एल मुळे सर्वात कमी आउटेज – २.१३ टक्के (वी. वर्ष २०१४-१५ मध्ये ३.५५ टक्के) (त्यापुर्वी २०११-१२ मध्ये २.२९ टक्के)
  - औ.वि.केंद्राचा उष्णता दर सर्वात कमी – २५७६ के.कॅल/ के डब्ल्यु एच (प्रमाणक – २६१८ के.कॅल/ के डब्ल्यु एच असे आहे) (मागील वर्षी २०१४-१५ मध्ये हा दर २६०२ के कॅल/ के डब्ल्यु एच)
  - १४ औ.वि. केंद्राचा भार क्षमता ८० टक्क्यापेक्षा जास्त.
  - १२ औ.वि. केंद्राचा संयत्र भार घटक-अंक – ७० टक्कयापेक्षा जास्त.
  - १६ केंद्राचा ए व्ही एफ हा अंक – ८० टक्कयापेक्षा जास्त.

| | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|
| के.वि.प्राधीकरणानुसार संयत्र भार अंक | ५८.९५ टक्के | ५६.०२ टक्के |
| पी एल एफ फक्त बंद युनीट्सचा (पाणी टंचाई, आर्थिक / राखीव बंद ठेवणे ) | ६७ टक्के | ७६.७२ टक्के |

  - पारस केंद्राचा अखिल भारतीय स्तरावर पी एल एफ मध्ये १८ वा क्रमांक – (८०.९७ टक्के)

**लाभांश :-**

आपल्या कंपनीस यावर्षी ₹ ८७९४ कोटी एवढा तोटा झाला आहे. चालू वर्षी चा अपवाद वगळता या आधीच्या सर्व वर्षात आपल्या कंपनीने सातत्याने महसूल अधिक्य निर्माण केलेले आहे. तरी सुध्दा वीज विक्रीच्या पैशाची प्राप्ती महावितरण या कंपनीकडून अनियमितपणे व अपूऱ्या प्रमाणात होत असल्याने आपल्या कंपनीला रोख अधिक्य निर्माण करणे अवघड झाले आहे.

कंपनीची भांडवली खर्चाच्या मोठ्या योजना आहेत. त्यामुळे समभाग निधीचीही गरज आहे. याचा विचार करुन आपल्या संचालकांनी असे ठरविले आहे की, जरी काही रोकडता निर्माण झाले तरी त्याचा उपयोग आपल्या कंपनीच्या विस्तारासाठी आणि भविष्यातील भांडवली खर्चाच्या योजनांसाठी करावा म्हणून या आढावा वर्षासाठी, आपल्या संचालकांनी लाभांशाची शिफारस केलेली नाही.

**नवीन क्षमता भर :-**

महाराष्ट्र राज्यातील विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन आपल्या महानिर्मिती कंपनीने विविध औष्णिक वीज कंपनी प्रकल्पाची उभारणी करण्याचे ठरविले आहे. सध्या चालू असलेले व भविष्यातील प्रकल्पाची कार्यवाहीची स्थिती खालील प्रमाणे आहे.

**अ) वर्षभरात केलेली क्षमता वाढ :-**

वर्ष २०१५-१६ मध्ये खालील प्रकल्पामधून १४१० मे.वॅ. इतकी वाढ उपलब्ध क्षमतेत करण्यात आली:-

१ चंद्रपूर औ.वि.केंद्र युनीट ९ (१x५०० मे.वॅ): २१/०३/२०१६ (पूर्ण भार प्रवर्तन)

२ परळी औ.वि. केंद्र युनीट ८ (१x२५०मे.वॅ): ३०/०३/२०१६ (पूर्ण भार प्रवर्तन)

३ कोराडी औ.वि. केंद्र युनीट ९ (१x६६००मे.वॅ): १५/०३/२०१६ (पूर्ण भार प्रवर्तन)

याशिवाय खालील यूनीट्स वाणिज्यिक प्रवर्तनास सिध्द झाले.

१ कोराडी औ.वि. केंद्र युनीट ८ (१x६६०मे.वॅ) :- १६/१२/२०१५

२ चंद्रपूर औ.वि. केंद्र युनीट ८ (१x५०० मे.वॅ) :- ०४/०६/२०१६

**ब) कार्यवाही चालू असलेल्या प्रकल्प व्दारे होणारी क्षमता वाढ :**

खालील युनीट हे कार्यान्वयीत होण्याच्या अंतिम टप्प्यात आहे. त्यातून वर्ष २०१६-१७ मध्ये ६६० मे.वॅ क्षमतेची वाढ होईल.

१ कोराडी युनीट – १० (१x६६०मे.वॅ) - या युनीटचे संकलन दि. ०१/०७/२०१६ रोजी झाले. त्यातील पूर्ण भार क्षमतेचे प्रवर्तन ऑगस्ट २०१६ मध्ये सुरु होण्याची अपेक्षा आहे.

**क) संयुक्त उपक्रमतातून क्षमता वाढ :**

महाराष्ट्रातील ढेरंड येथे टाटा – महानिर्मिती यांचा संयुक्त साहस उपक्रम आकारात येणार आहे. कोळसा आधारित वीज निर्मितीच्या या प्रकाराची क्षमता १९८०/१६०० मे.वॅ (३x६६० मे.वॅ / २x८०० मे.वॅ) मुंबई / उरण यांच्या उत्तर दिशेच्या किनारपट्टी वरील या प्रकल्पाची वीज सध्या प्रारंभिक अवस्थेत असल्याने २०१९-२० पर्यंत मुंबई ची गरज भागवण्यासाठी याची वीज उपलब्ध होणे कदाचित शक्य होणार नाही महानिर्मिती संचालक मंडळाने या प्रकल्पात तत्वत: मान्यता दिलेली आहे. महानिर्मिती आणि मे.टाटा पॉवर या दोन्ही कंपन्यात सामंजस्य करार वर सहया करणे व हा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करणे यांनाही संचालक मंडळाने मंजुरी दिली आहे.

**सौर वीज निर्मिती : -**

महानिर्मिती कंपनीची सौर वीज निर्मिती क्षमता १८०.३३ मे.वॅ आहे. त्यापैकी चंद्रपूर येथे ५ मे.वॅ. आणि साक्री (जि. धुळे) १२५ मे.वॅ आहे. शिरशु फळ (बारामती जि पुणे) येथे ५०.३३ मे.वॅ. (३६.३३+१४ मे.वॅ.) क्षमतेचे युनीट्स स्थापन झाले आहेत. यापैकी ५०.३३ मे.वॅ. चा प्रकल्प खाजगी- सार्वजनिक प्रकल्प नमुन्यांच्या आहे. महाराष्ट्र शासनाच्या "नुतनीकरण ऊर्जा धोरण २०१५" अंर्तगत सौर वीज प्रकल्पावर २५०० मे.वॅ. वीज जाळ्यांचा विकास करण्यासाठी ज्या पध्दतीची कार्यवाही करावयाची आहे., याला महानिर्मितीने मान्यता दिली आहे. या प्रस्तावित २५०० मे.वॅ. साठीच्या कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अनु.क्र | कार्यवाही करण्याची क्षमता | पध्दत | तपशील |
|---|---|---|---|
| १ | १००० मे.वॅ. | स्पर्धात्मक बोली पध्दत | निर्मिती उपलब्ध / संपादित जमानीवर |
| २ | ५०० मे.वॅ. | इ.पी.सी. | निर्मिती उपलब्ध / संपादित जमानीवर |
| ३ | ५०० मे.वॅ. | सौर ऊर्जा उद्यान | दोंडायाचा येथील ६६०मे.वॅ x ५ कोळसा औ.वि.प्रकल्पाऐवजी |
| ४ | २५० मे.वॅ. | नव्या कल्पना नुसार | शासकीय व अन्य संस्था, डब्ल्यु आर जी, नागपूर मेट्रो, स्थानिक स्वायत्त संस्थांच्या जमीनीवर |
| ५ | २५० मे.वॅ. | अशासकीय संस्था 'प्रयास" सोबत सूर्य ऊर्जा वापर असणाऱ्या शेत जमीनीवर | एम एन आर इ, प्रयास,मेज व आय आय टी यांच्या तपशीलवार सूचना नंतर योजनेचे अंतिमीकरण केले जाईल. |

**नवीन प्रकल्पासांठी वित्त पुरवठा :**

नियोजन क्षमता वाढीच्या सर्व नियोजित प्रकल्पांचा वित्त पुरवठा कर्ज व समभाग यांचे ८०:२० गुणोत्तराने करण्यात येईल. आपली कंपनी आपल्या महसुलातील संसाधनाचा उपयोग करिल. विस्ताराच्या प्रकल्पांच्या समभागातील कंपनीच्या वाटयाचा काही भाग उपलब्ध रोख मर्यादे नुसार केला जाईल. एकूण प्रकल्पाच्या ८० टक्कयांपर्यतच्या खर्चासाठी वित्तिय संस्था व बँकातर्फे वित्त पुरवठा होईल, तर उर्वरित २०टक्के समभागाचा निधी महाराष्ट्र शासनाकडून येईल.

**इंधन सुरक्षा :-**

**अ) विद्यमान कोळश्याची गरज व पुरवठ्याची व्यवस्था**

महानिर्मितीच्या औ.वि. केंद्राना वर्ष २०१५-१६ मध्ये आवश्यक असणारा कोळसा खालील प्रमाणे आहे.

| महानिर्मितीसाठी प्रमाणित ऐ.व्ही एफ प्रमाणे आवश्यक कोळसा :- | |
|---|---|
| औ.वि. केंद्र | कोळशाच्या आवश्यकता (एम एम टी पी ए) |
| भुसावळ औ.वि. केंद्र | ८.५१ |
| चंद्रपूर महा औ.वि. केंद्र | १३.४४ |
| खापरखेडा औ.वि. केंद्र | ८.१८ |
| कोरडी औ.वि. केंद्र | ३.२० |

| | |
|---|---|
| नाशिक औ.वि. केंद्र | ३.६२ |
| पारस औ.वि. केंद्र | ३.०५ |
| परळी औ.वि. केंद्र | ६.६७ |
| **एकूण** | **४६.६७** |

**कोळसा पुरवठ्याचे करार : -**

महानिर्मितीने कोळसा कंपन्या सोबत इंधन पुरवठ्याचे करार केले आहेत. त्याचा औ.वि. केंद्रानुसार कोळसा कंपन्या ची जोडणी खालील तक्त्यात दिली आहे. आकडेवारी एम एम टी पी ए मध्ये आहे.

| औ. वी. केंद्र | डब्ल्यु सी एल | एम सी एल | एस इ सी एल | एस सी सी एल | कराराप्रमाणे संख्या |
|---|---|---|---|---|---|
| भुसावळ | २.८०० | २.३१२ | २.३१२ | ० | ७.४२४ |
| चंद्रपूर | १०.३६५ | १.५२५ | ०.९१० | ० | १२.८०० |
| खापरखेडा | १.४३२ | ३.८७९ | २.००१ | ० | ७.३१२ |
| कोराडी | ०.६१५ | १.५८० | ३.१०५ | ० | ५.३०० |
| नाशिक | ३.६८९ | ०.००० | १.०११ | ० | ४.७०० |
| पारस | १.८०० | १.२०४ | ०.००० | ० | ३.००४ |
| परळी | ३.५२८ | ०.००० | ०.००० | २.२६० | ५.७८८ |
| **एकूण** | **२४.२२९** | **१०.५००** | **९.३३९** | **२.२६०** | **४६.३२८** |

**आयात कोळसा (२०१५-१६)**

वर्ष २०१५-१६ साठी वीज मंत्रालय / सी इ ए यांनी महानिर्मितीसाठी आयात करावयाच्या कोळशासाठी ४.० एम एम टी चे लक्ष्य दिले आहे. महानिर्मितीने कोळसा पुरवठ्यासाठी दोन वेगवेगळे मागणी आदेश पुरवठादारांना दिले आहेत. सागरी मार्गाने होणाऱ्या विक्रीसाठी (एचएसएस) आणि देशांतर्गत वाहतूक हाताळणीसाठी (आयएचटी). यानुसार भुसावळ केंद्र (युनिट ४ व ५) साठी ४४०० ते ४८०० के कॅल / केजी जी सी व्ही (एआरबी) असलेला १.११ एम एम टी कोळसा मागवला. या सागरी आयातीचा करारानुसार ०.९० एम एम टी एवढा कोळसा मिळाला. (जूलै- २०१६ पर्यत)

**ब) वायू आधारीत केंद्रांसाठी वायूचा पुरवठा :**

महानिर्मितीचे उरण येथे वायूचे निर्मिती वीज केंद्र आहे. त्याची स्थापित क्षमता ६७२ मे.वॅ. आहे. यासाठी महानिर्मिती मे. भारतीय वायू प्राधिकरण लि. संस्थेसोबत ३१.१२.२०१५ रोजी करार केला . प्रत्येक दिवशी ३.५ एम एम एस सी एम डी एवढ्या नैसर्गिक वायूची विक्री, वाहतूक व प्रत्यक्ष देणे या कार्यासाठी हा करार आहे. त्यांची किंमत सरकारी दराइतकी राहील. याशिवाय महानिर्मितीने मे. आर आय एल (आणि इतर) यांच्यासोबत उरण केंद्राला के जी – डी ६ नैसर्गिक वायू शासकीय दराने १.२ एम एम एस सी एम डी इतका पुरवठा करण्याची रचना केली आहे. मात्र या के जी- डी ६ वायू (आर आय एल गॅस) पुरवठ्यात मार्च २०१३ पासून पूर्ण कपात करण्यात आली.

उरण केंद्राला गेल्या ३ वर्षात मिळालेल्या वायूची सरासरी खालील तक्त्यात दिली आहे.

| वित्तिय वर्ष | एपीएम गॅस सरासरी प्राप्ती (एमएमएससीएमडी) | गॅस सरासरी प्राप्ती (एमएमएससीएमडी) | एकूण वायूची सरासरी प्राप्ती (एमएमएससीएमडी) |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | १.५५ | ०.७३ | २.२८ |
| २०१५-१६ | १.५३ | ०.४४ | १.९७ |
| २०१६-१७ (१५ जूलै २०१६ पर्यंत) | १.५७ | ०.६५ | २.२२ |

यावरुन दिसून येईल की वायू पुरवठ्यात कोणतीही सुधारणा झाली नाही तर (वित्तिय वर्ष २०१६-१७ मध्ये) १.२ एम एम एस सी एम डी एवढा वायू कमी मिळेल असा अंदाज आहे. त्यापुढे वीज निर्मिती मध्ये सरासरी २५० मे.वॅ. घट होईल.

**क) धुतलेला कोळसा – मे. डब्ल्यु सी एल सोबत संयुक्त साहसी प्रकल्प :**

महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाने मे. डब्ल्यु सी एल कंपनी सोबत तिच्या कार्यक्षेत्रात कोळसा धुलाई चा संयुक्त प्रकल्प सुरु करण्यास तत्वत: मान्यता दिलेली आहे. याशिवाय यासाठी मे. डब्ल्यु सी एल सोबत सांमजस्य करार करण्यासाठी काम चालु आहे.

**ड) अदलबदलीने कोळसा खर्चाचे सुसूत्रिकरण :**

१) **आय एम टी एफ अदलाबदल** : आय एम टी एफ च्या मार्गदर्शक सुचने नुसार पहिल्या टप्प्यात एम सी एल चा ५.०१६ एम एम टी कोळश्याची अदलाबदल एस ई सी एल (३.३१२ एम एम टी) व डब्ल्यु सी एल च्या समतुल्य प्रमाणात (१.५२८ एम एम टी) केली. या मुळे महानिर्मितीला वाहतुक खर्चाच्या बचतीमुळे ₹१८२ कोटीचा फायदा अपेक्षीत आहे. त्याप्रमाणे एम सी एल च्या कोळश्याच्या अदलाबदलीच्या करारावर एस इ सी एल व डब्ल्यु सी एल च्या सह्या झाल्या.

२) **प्रस्तावित अदलाबदल** : औ.वि. केंद्र चंद्रपुर (१.५२५ एम एम टी), भुसावळ (२.३१२) आणि पारस (१.२०४ एम एम टी) येथे एम सी एल ची ५.०४१ एम एम टी च्या कोळसा जोडणीची डब्ल्यु सी एल शी अदलाबदल करण्याचा प्रस्ताव महानिर्मितीने मांडला. डब्ल्यु सी एल च्या कोळश्याची ग्रेड व जास्त किंमतीतील साम्य विचारात घेता प्रस्तावित अदलाबदलीमुळे प्रभावी बचत ४२१.३६ कोटी अपेक्षीत आहे. मे. डब्ल्यु सी एल ने वरील प्रस्तावास तत्वत: संमती दिली आहे आणि पुढील काळात कोळसा पुरवठा वाढविण्यास तयार आहे.

**इ) कोळसा क्षेत्राचे वाटप**

१) **गारे पालमा कोळसा क्षेत्र** : महानिर्मितीच्या विविध औ.वि. केंद्रांच्या विस्तारासाठी लागणाऱ्या कोळशाची गरज पूर्ण करण्यासाठी भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने त्यांच्या कोळसा खाणी (विशेष तरतुदी) नियमावली २०१४ यातील नियम ११ (९) अंतर्गत एक आदेश काढून छत्तीसगड राज्यातील रायगड जिल्हयातील "गारे पालमा सेक्टर - २" हेच कोळसा खाणी साठ्याचे क्षेत्र, महानिर्मिती कडे सूपूर्द केले आहे. हे क्षेत्र "मंद- रायगड" कोळसा खाणीच्या प्रदेशात आहे. पूर्व परिसरातील "घरगोडा" रेल्वे स्थानकापासून ते १५ कि.मी. अंतरावर आहे. या गारे पालमा सेक्टर - २ कोळसा खाणीतून एकूण ६५३.४७ एम.टी साठा बाहेर काढण्यास योग्य असेल असा अंदाज आहे. (म्हणजे खुल्या जागेतून ५८२.२८२ एम टी आणि जमिनी खालून २०१,५१३ एम टी)

महानिर्मितीने हे क्षेत्र देण्याच्या समती पत्रावर सहया केल्या आहेत.

२) **महाजन वाडी कोळसा क्षेत्र** : महाजन वाडी कोळसा क्षेत्र हे महाराष्ट्रात नागपूर जवळ कामटी येथे असून कोळसा मंत्रालयाने ते महानिर्मितीस वीज निर्मितीसाठी दिले आहे. तेथे भूगर्भात ३४० एम एम टी कोळसा साठा असल्याचा अंदाज आहे. या करिता महानिर्मिती दि. १९/०४/२०१६ रोजी कोळसा साठा विकास व उत्पादकाचा करार केला. नागपूर जिल्हयातील कामटी परिसारातील सुमारे २६ चौरस किलोमीटर्स क्षेत्रात हा कोळसा साठा आहे. त्यात हिंगना / रायपूर, वाण डोंगरी, खारका आणि मोंढा ही चार गांवे आहेत.

**वार्षिक विवरण पत्राचा उतारा :**

कायद्याचे कलम ९२ यातील उपकलम (३) अंतर्गत वार्षिक विवरण पत्राचा उतारा एम जी टी-९ : या प्रपत्रात दिला असून तो 'जोडपत्र-१" यामध्ये संलग्न केला आहे.

**मंडळाच्या बैठकीची संख्या :**

वर्ष २०१५-१६ मध्ये कंपनीच्या संचालक मंडळाने एकूण अकरा (११) बैठका आयोजित केल्या होत्या.

**संचालकांच्या नियुक्तीचे धोरण** :

महानिर्मितीचे संचालक पदांवर, (स्वतंत्र संचालकासह) नियुक्त्या या मराविम सुत्रधारी कंपनी लि. तर्फे केल्या जातात. प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या संचालक पदावर, नियुक्ती करण्यासाठी लागणारी पात्रता, आणि अन्य निकष याची माहिती कंपनीच्या संस्थापन नियमावली यामध्ये दिलेली आहे.

**कलम १८६ नुसार कर्जे हमी व गुंतवणुकी याची माहिती :**

महानिर्मिती कंपनी ही पायाभूत सुविधांच्या व्यवसायांत काम करणारी कंपनी असल्यामुळे तिला, कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १८६ यात नमुद केलेल्या "कर्जे", हमी देणे, प्रतिभूती पुरविणे आदिसंबंधीत तरतुदी लागू होत नाहीत. गुंततवणूकी संबंधीची माहिती "स्वायत्त वित्तिय विवरणपत्राच्या" टिपा क्र. ९ मध्ये दिली आहे.

**संबंधित संस्थांसोबत केलेल्या करारांचा तपशील :**

महानिर्मिती कंपनीने निर्माण केलेली संपूर्ण वीज ही "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि." (महावितरण) या एकमेव ग्राहकांस विकण्यात येते. महावितरण ही कंपनी "मराविमं" सुत्रधारी कंपनी लि. या संस्थेची एक उपकंपनी आहे. तसेच वीज विक्रीचे दर विद्युत अधिनियम २००३ च्या तरतुदीनुसार "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग" या विद्युत नियामक संस्थेकडून निश्चित केले जातात.

**वित्तिय वर्ष समाप्ती आणि वित्तिय अहवालाची तारीख यामधील कालखंडात कंपनीच्या वित्तिय स्थितीवर परिणाम करणारे काही प्रत्यक्ष बदल झाले असल्यास त्याची माहिती :-**

वित्तिय वर्ष समाप्ती आणि अहवालाची तारीख या मधल्या कालावधीत कोणतेही प्रत्यक्ष बदल किंवा वचन बध्द होणे आदि घटना झाल्या नाहीत.

**मानव संसाधन व्यवस्थापन :**

कर्मचारी हे कोणत्याही संस्थेचे सर्वात मौल्यवान मत्ता असतात आणि त्यांची सर्जनशिलता, नवे काही करण्याची वृत्ती आणि कामिगरी सर्वोत्कृष्ट पणे पार पाडण्याची उमेद आदि गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी अनुकूल वातावरण असण्याची आवश्यकता असते. आपल्या कंपनीने कर्मचाऱ्यांची पात्रता वाढविण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. सक्षमता असलेले, प्रशिक्षित आणि बहुविध विषयांचा अभ्यास असलेले कर्मचारी हे महानिर्मितीचे मोठे भांडवल असून असे कर्मचारीच त्यांची आव्हानात्मक जबाबदाऱ्या पार पाडू शकतात. "संघचालक सर्वोत्कृष्टता" ही मानवी संसाधनापासून साध्य होईल असा आपल्या कंपनीचा दृढ विश्वास आहे. म्हणून "कर्मचारी जनांना सर्व प्रथम अग्रक्रम" देणे हे धोरण आपल्या कंपनीने अनुसरलेले आहे. त्यातूनच कंपनीच्या भव्य योजनाच्या पूर्तीच्या शक्ती मिळणार आहे.

**औद्योगिक संबंध :**

या वर्षभरातील कंपनी आणि आपले कर्मचारी यांचे संबंध स्नेहाचे व सुसंवादाचे राहिले आहेत. कर्मचाऱ्याच्या त्यांची कामाची स्थिती, कल्याण आदि क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत केले जाते प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींच्या कार्यशाळा आयोजिल्या जातात आणि त्यातुन सातत्याने बदल चाललेले औद्योगिक व्यवहाराचे क्षेत्र, त्यातील संधी आणि धोके, कंपनी पुढील आव्हाने आदि विषयाबद्दल त्यांना जागरुक केले जाते. औद्योगिक संबंधाचे एकूण वातावरण शांततामय होते तेथे परस्पर विश्वास आणि संवाद यातूनच सर्व कामे झाली.

**संचालक :**

श्री. मुकेश खुल्लर, माजी प्रधान सचिव, ऊर्जा, महाराष्ट्र राज्य हे दि. ०७/०५/२०१६ पासून कंपनीचे संचालक नाहीत.

**लेखा परिक्षण समिती :**

महानिर्मितीच्या लेखा परिक्षण समितीच्या श्री. विश्वास पाठक, अध्यक्ष असून श्री. व्ही. पी. सिंग आणि श्रीमती. इरावती दाणी हे सदस्य आहेत. वर्ष २०१५-१६ मध्ये या समितीच्या एकीण ८ बैठका झाल्या.

**कंपनीची सामाजिक जबाबदारी समिती.**

कंपनीची सामाजिक जबाबदारी पार पाडणे या हेतुसाठी कंपनीने एक समितीची स्थापना केली आहे. श्री. बिपीन श्रीमाळी हे या समितीचे अध्यक्ष आहेत. या शिवाय सर्वश्री. सी. एस. थोटवे, श्री. व्ही.पी. सिंग, श्री. जे. के. श्रीनिवासन आणि श्रीमती. इरावती दाणी हे सदस्य आहेत. कंपनीच्या सामाजिक जबाबदारीचे धोरण याला या समितीने तसेच महानिर्मितीच्या संचालक मंडळाने मंजुरी दिली आहे.

१ प्रकल्प ग्रस्त व्यक्तींची सामाजिक – आर्थिक स्थिती सुधारणे.

२ उत्पन्न निर्मिती, आरोग्य, शिक्षण, पाणी व वीज पुरवठा, स्वच्छता, संपर्क व अशा अन्य क्षेत्रात टिकाऊ सुधारणा करण्यासाठी संधी निर्माण करणे.

३ प्रकल्प ग्रस्त व्यक्तींचा सामुदायिक विकासासाठी विशेष दृष्टीकोन ठेवणे तसेच अशा क्षेत्रातील व्यक्तींच्या जीवनशैलीत सुधारणा घडविणे . त्यांना त्यांचे पूर्वीचे जीवनमान पून:प्राप्त होईल याची हमी देणे.

४ समुदायाच्या विकासाची कार्य पारदर्शक रित्या व सहभागी वृत्तीने करणे.

५ स्थानिक लोक प्रतिनिधी यांचा सहभाग आणि त्यांच्यातून सल्ला मसलत होईल याची हमी घेणे, प्रकल्पग्रस्त क्षेत्र आणि वीज निर्मिती केंद्राच्या भोवताल या क्षेत्रात कंपनीच्या सामाजिक जबाबदारीची कामे करण्यासाठी संस्थापक रचना स्थापना करणे.

कंपनीची सामाजिक जबाबदारी यावर तपशील अहवाल **जोडपत्र – २** येथे जोडला आहे.

**संचालकांच्या जबाबदारीचे निवेदन :-**

कंपनी अधिनियमाचे २०१३ चे कलम १३४ (३) (सी) नुसार संचालकांच्या जबाबदारीचे निवेदन यास येथे पुढील बाबींची निश्चिती देण्यात येते :

१ लागू होणाऱ्या लेखा मानकांचे अनुसरण करण्यात आले आहे. प्रत्यक्ष विचलन झाले असल्यास यासंबंधी योग्य स्पष्टीकरणे दिली आहेत.

२ निवडलेली लेखा धोरणे सातत्याने अमलात आणली आहेत. आणि दि. ३१/०३/२०१५ रोजीची कंपनीचा स्थितीचे रास्त व योग्य दर्शन घडावे यासाठी न्यायबुध्दीने व सुज्ञतेने निर्णय घेण्यात आले व अंदाज करण्यात आले.

३ कंपनीच्या मत्तांचे संरक्षण करणे तसेच लबाडी व अनियमितता रोखणे यासाठी कंपनी अधिनियम २०१३ मध्ये ज्या तरतुदी केल्या आहेत. त्यानुसार लेख्यांचे अभिलेखांचे जतन करण्यासाठी महानिर्मिती कंपनीच्या संचालकांनी योग्य प्रकारे आणि पुरेशी काळजी घेतली आहे.

४ "महानिर्मिती" ही 'सतत कार्यस्त असलेली संस्था आहे" या तत्वांच्या आधारे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले आहेत.

५ कंपनीला लागू होणारे सर्व कायद्यातील तरतूदीचे अनुपालन करण्याची हमी मिळावी या दृष्टीने योग्य कार्य पध्दतीची रचना, संचालकांनी केलेली आहे. आणि ही कार्यपध्दती पुरशी असुन प्रभावी पणे कार्यरत आहे.

**ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि परदेशी चलनातील मिळकत व खर्च : -**

कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १३४ (एम) – ज्याचे सहवाच कंपनी (लेखे) नियमावली १९८८ यातील नियम क्र. ८ (३) या सोबत होते, त्यानुसार "ऊर्जा, संवर्धन, तंत्रज्ञान स्वीकार आणि परदेशी चलनातील मिळकत व खर्च" या संबंधीची आवश्यक असलेली माहिती, या अहवालाचा भाग असलेले, "**जोडपत्र - ३**" यामध्ये दिलेली आहे.

**सांविधिक लेखा परिक्षक यांची निरिक्षणे / अभिप्राय यांची उत्तरे :-**

सांविधिक लेखा परिक्षक यांनी त्यांच्या लेखापरिक्षण अहवालात लिहिलेली निरिक्षणे व अभिप्राय यांना कंपनीने दिलेली उत्तरे या अहवालाचे **जोडपत्र - ४** यामध्ये जोडाली आहेत.

**मुदतीची ठेवी :-**

अहवालाच्या वर्षात कंपनीने जनतेकडुन कोणत्याही मुदतीच्या ठेवी मागविल्या नाहीत/ स्वीकारल्या नाहीत.

**खर्च लेखापरिक्षक :-**

महानिर्मिती कंपनीने दि. ३१/०३/२०१७ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी कंपनीचे "खर्च लेखा परिक्षक" म्हणून मेसर्स व्ही. जे. तलाठी अँड कंपनी, कॉस्ट अकांउटंट यांची नेमणूक केली आहे. ही नेमणूक भारत सरकारच्या कंपनी व्यवहार मंत्रालयाच्या मान्यतेच्या अधिन आहे.

**सांविधिक लेखापरिक्षक :**

भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखा परिक्षक यांनी मेसर्स. बोरकर मझूमदार अँड कंपनी. मुंबई, मेसर्स. उमेद जैन अँड कंपनी.मुंबई, आणि मेसर्स. एम. पी. चितळे अँड कंपनी. मुंबई, यांची वित्तिय वर्ष २०१५-१६ यावर्षासाठी संयुक्त सांविधिक लेखा परिक्षक म्हणून नेमणूक केलेली आहे.

**सेक्रेटरीयात ऑडिटर्स :-**

महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाने वित्तिय वर्ष २०१५-१६ साठी कंपनीचे "सेक्रेटेरीयात ऑडीटर्स" म्हणून **मेसर्स. ए. वाय. साठे अँड कंपनी, कंपन्यांचे सेक्रेटरी** सी / २०२ काहीनूर अपार्टमेंटस, दुसरा माळा, एन.सी. केळकर मार्ग, कबूतर खाना जवळ, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८ यांची नेमूणक केली आहे. सेक्रेटेरीयात ऑडीट रिपोर्ट **जोडपत्र - ५** यात दिला आहे.

**सेक्रेटेरीयल ऑडीट रिपोर्ट यातील निरिक्षणांना उत्तरे :-**

सेक्रेटेरीयल ऑडीट रिपोर्ट यातील निरिक्षणांना उत्तरे खालील प्रमाणे आहेत :-

अ) कंपनीच्या संस्थापन - नियमावलीतील नियम ७५ आणि ७७ यानुसार मंडळा मधील संचालकांची नियुक्ती मराविमं सुत्रधारी कंपनी कडून केली जाते. म्हणून 'स्वतंत्र संचालकांच्या नियुक्ती बाबतचे संदर्भ मराविमं सुत्रधारी कं. लि. " सही पाठविण्यात येतील.

ब) महानिर्मिती कंपनीची आस्थापना नियमावली यातील नियम ७८ (अ) यानुसार कंपनीचे पूर्ण वेळ संचालक (वित्त) म्हणून दि. २६/०५/२०१४ पासून श्री. जे. के. श्रीनिवासन यांची नियुक्ती करण्यात आली. ते कंपनीच्या वित्तिय बाबींचे प्रभारी आहेत. के. एम. पी तरतूदींच्या पूर्तीसाठी, दि. १०/१२/२०१५ पासून त्यांना कंपनीचे मुख्य वित्त अधिकारी म्हणून सुध्दा संबोधित करण्यात येत आहे.

क) अंतर्गत लेखा परिक्षकांची नियुक्ती करणे याबाबत एमजीटी१४ हे फॉर्म भरण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु करण्यात येईल.

**ऋणनिर्देश :**

महानिर्मिती कंपनीला विविध केंद्रिय आणि राज्य शासनाची मंत्रालये/विभाग/संस्था यांचे तसेच वित्तिय संस्था आणि बँका, सांविधिक लेखा परिक्षक, खर्च लेखापरिक्षक, भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक, नवी दिल्ली, तसेच महालेखापाल (वाणिज्य), मुंबई, केंद्रिय/राज्य विद्युत नियामक प्राधिकारी सेक्रेटेरीयल ऑडीटर्स, अपील करण्याची न्यायधिकरणे आणि कंपनीचे भागधारक यांनी जी मदत व सहकार्य केले त्याबद्दल संचालक त्यांची कृतज्ञतापूर्वक प्रशंसा येथे नोंदवित आहेत. तसेच कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यानी तळमळीने व समर्थन वृत्तीने त्यांचे कार्य केले त्याबद्दलही मंडळ त्यांना धन्यवाद देत आहेत.

संचालक मंडळाच्या वतीने

(बिपीन श्रीमाळी)
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

स्थळ - मुंबई
दि. ०२/१२/२०१६

## संचालकांचे अहवालाचे जोडपत्र - १
## फॉर्म नं. एम.जी.टी. - ९
### वार्षिक विवरणाचा सारांश

३१.०३.२०१६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाची स्थिती
(कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ९२ (३) आणि कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियमावली २०१४ यातील नियम १२ (१) याला अनुसरुन)

**१ नोंदणी व अन्य तपशील :**

| | | |
|---|---|---|
| १ | सी आय एन | यू ४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८ |
| २ | नोंदणीची तारीख | ३१.०५.२००५ |
| ३ | कंपनीचे नावं | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित |
| ४ | कंपनीची श्रेणी / उपश्रेणी | शासकीय कंपनी |
| ५ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व संपर्क तपशील | प्रकाशगड, प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांन्द्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ |
| ६ | कंपनी यादीवरील (लिस्टेड) आहे का ? होय/नाही | नाही |
| ७ | रजिस्टर व ट्रान्स्फर एजंटचे नाव पत्ता, जर असल्यास | लागू नाही. |

**२ कंपनीचे प्रमुख उद्योग कार्य :** कंपनीच्या उलाढालीमध्ये १० टक्के किंवा त्याहून जास्त योगदान देणाऱ्या सर्व औद्योगिक व्यवहाराची माहिती देणे.

| अनु. क्र. | मुख्य उत्पादित / सेवांची नांवे व वर्णन | उत्पादित वस्तु / सेवा यांचा एन आय सी कोड | कंपनीच्या एकूण उलाढालीत टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीज निर्मिती | लागु नाही | १०० टक्के |

**३ सुत्रधारी, उपकंपन्या व सहयोगी कंपन्याचा तपशील :**

| अनु. क्र. | कंपनीचे नाव व पत्ता | सी आय एन / जी एल एन | सुत्रधारी / उपकंपनी /सहयोगी | शेअर्सची टक्केवारी | लागु होणारा विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराविमं सुत्रधारी कं.लि. | यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४९ | सुत्रधारी | ९९.९९ | २(८७) |
| २ | महागुज कोलायरीज लि. | यु१०१०२एमएच२००६एसजीसी१६५३२७ | उपकंपनी | ६० | २(८७) |
| ३ | धोपावे कोस्टल पॉवर लि. | यु४०१०८एमएच२००७एसजीसी१६८८३६ | उपकंपनी | १०० | २(८७) |
| ४ | धुळे थर्मल पॉवर कं.लि. | यु४०१०५एमएच२००७एसजीसी१७३४३३ | उपकंपनी | १०० | २(८७) |

## ४ शेअर धोरणेचे स्वरुप (समभाग भांडवलाची विभागणी : एकूण समभागाची टक्केवारी) :

### १ श्रेणी निहाय भाग धारणा

| भाग धारकांची श्रेणी | वर्षाच्या आरंभी धारण केलेल्या भांगाची संख्या | | | | वर्षाच्या अखेरीस धारण केलेल्या भांगाची संख्या | | | | वर्षभरातील बदलाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | डीमॅट | प्रत्यक्ष | एकूण | एकूण भागांची टक्केवारी | डीमॅट | प्रत्यक्ष | एकूण | एकूण भागांची टक्केवारी | |
| अ) प्रर्वतक | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **१ भारतीय** | | | | | | | | | |
| अ) भारतीय व्यक्ती/एच.यु.एफ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ब) केंद्र सरकार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| क) राज्य शासन | ० | ५०००० | ५०००० | ०.००१ | ० | ० | ० | ० | ० |
| ड) संस्था कंपनी | ० | ८०५७२३४५६४ | ८०५७२३४५६४ | ९९.९९ | ० | २४०९८३५६७८८ | २४०९८३५६७८८ | १०० | १९९.०९ |
| इ) बँका/वित्तसंस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| फ) इतर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| उप बेरीज (अ) (१) | ० | ८०५७२८४५६४ | ८०५७२८४५६४ | १०० | ० | २४०९८३५६७८८ | २४०९८३५६७८८ | १०० | १९९.०९ |
| **२ परदेशी** | | | | | | | | | |
| अ) अनिवासी भारतीय | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| व्यक्तीगत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ब) इतर व्यक्ती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| क) संस्था, कंपन्या | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ड) बँका/वित्तसंस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| फ) इतर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **उप बेरीज (अ) (१)** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| एकूण प्रवर्तकांची भागाधारणा (अ) = (अ)(१) + (अ) (२) | ० | ८०५७२८४५६४ | ८०५७२८४५६४ | १०० | ० | २४०९८३५६७८८ | २४०९८३५६७८८ | १०० | १९९.०९ |
| **ब) सार्वजनिक भागाधारणा** | | | | | | | | | |
| १ संस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अ) म्युचअल फंड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ब) बँका / वित्त संस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| क) केंद्र सरकार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ड) राज्य शासन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इ) साहसी भांडवल निधी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| फ) विमा कंपन्या | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ग) वित्तिय संस्थाकडून | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ह) परदेशी साहसी भांडवल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ज) इतर (स्पष्ट करा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **उपबेरीज (बी) (१)** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| **२ संस्था व्यतिरिक्त** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| अ) महामंडळ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १ भारतीय | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ परदेशी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

| ब) व्यक्तिगत | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ व्यक्तिगत भागधारक नाम मात्र रु. १ लाखा पर्यंत भाग भांडवल धारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ व्यक्तिगत भागधारके रु. १ लाखा पेक्षा नाममात्र भाग धारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| क) इतर (स्पष्ट करा) उपबेरीज (बी) (२) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| बेरीज सार्वजनिक भागधारण (ब) = (ब)(१) + (ब)(२) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| क) जी डी आर आणि ए डी आर यांच्या रखवालदाराने धारण केलेले भाग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | लागू नाही |
| एकूण बेरीज (अ + ब + क) | ० | ८०५७२८४५६४ | ८०५७२८४५६४ | १०० | ० | २४०९८३५६७८८ | २४०९८३५६७८८ | १०० | १९९.०९ |

## २ प्रवर्तकांची भाग धारणा

| अनु. क्र. | भाग धारकांचे नाव | वर्षाप्रारंभाची भाग धारणा | | | वर्षाअखेरची भाग धारणा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | गहाण असलेल्या भागाची एकूण भांगामध्ये टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | गहाण असलेल्या भागांची एकूण भांगामध्ये टक्केवारी | वर्षभरातील बदलाची टक्केवारी |
| १ | मराविमं सुत्रधारी कं. लि. (राज्य शासनाची कंपनी) | ८०५७२३४५६४ | ९९.९९९ | ० | २४०९८३५६७८८ | १०० | ० | १९९.०९ |
| २ | राज्य शासन | ५०००० | ०.००१ | ० | ० | ० | ० | - |
| | एकूण | ८०५७२८४५६४ | १०० | ० | २४०९८३५६७८८ | १०० | ० | १९९.०९ |

## ३ प्रवर्तकांच्या भागधारणातील बदल (जर बदल नसेल तर कृपया तसे स्पष्ट करावे)

| अनु. क्र. | | वर्षाप्रारंभाची भाग धारणा | | वर्ष भरातील संचित भाग धारणा | |
|---|---|---|---|---|---|
| | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी |
| वर्षाच्या आरंभी | मराविम सुत्रधारी कंपनी लि. आणि राज्य शासन | ८,०५७,२८४,५६४ | १०० | - | - |
| दिलेले भाग (३०.०४.२०१५) | मराविम सुत्रधारी कंपनी लि. | १८३,९९५,४८९ | २.२८ | ८,२४१,२८०,०५३ | २.२८ |
| दिलेले भाग (२१.०७.२०१५) | मराविम सुत्रधारी कंपनी लि. | ७४६,३१६,३०० | ९.२६ | ८,९८७,५९६,३५३ | ११.५४ |
| दिलेले भाग (३१.०३.२०१६) | मराविम सुत्रधारी कंपनी लि. | १५,११०,७६०,४३५ | १८७.५४ | २४,०९८,३५६,७८८ | १९९.०९ |
| वर्षाच्या अखेरीस | मराविम सुत्रधारी कंपनी लि. आणि राज्य शासन | २४,०९८,३५६,७८८ | १०० | २४,०९८,३५६,७८८ | १०० |

## ४ वरच्या दहा भागधारकांच्या भागधारणेचे स्वरुप (संचालक, प्रवर्तक व जीडीआर आणि एडीआर धारक व्यतिरिक्त)

| अनु. क्र. | | वर्षाप्रारंभाची भाग धारणा | | वर्ष भरातील संचित भाग धारणा | |
|---|---|---|---|---|---|
| वरच्या १० भागाधारकांसाठी प्रत्येकी | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी |
| वर्षाच्या आरंभी | मराविमं सुत्रधारी कं. लि. | ८०५७२३४५६४ | ९९.९९९ | | |
| | राज्य शासन | ५०००० | ०.००१ | | |
| शेअर्सचे वाटप (३०.०४.२०१५) | मराविमं सुत्रधारी कं. लि. | १८३९९५४८९ | २.२८ | ८२४१२८००५३ | २.२८ |
| शेअर्सचे वाटप (२१.०७.२०१५) | मराविमं सुत्रधारी कं. लि. | ७४६३१६३०० | ९.२६ | ८९८७५९६३५३ | ११.५४ |
| शेअर्सचे वाटप (३१.०३.२०१६) | मराविमं सुत्रधारी कं. लि. | १५११०७६०४३५ | १८७.५४ | २४०९८३५६७८८ | १९९.९९ |
| वर्षाच्या अखेरीस किंवा जर वर्षभरात अलग झाले असतील तर अलग होण्याच्या तारखेला | मराविमं सुत्रधारी कं. लि. | २४०९८३५६७८८ | १०० | २४०९८३५६७८८ | १०० |

## ५ संचालक आणि व्यवस्थापनातील महत्वाचे कर्मचारी

| प्रत्येक संचालक आणि व्यवस्थापनातील महत्वाच्या कर्मचाऱ्यासाठी | | वर्षाप्रारंभाची भाग धारणा | | वर्ष भरातील संचित भाग धारणा | |
|---|---|---|---|---|---|
| | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी |
| वर्षाच्या आरंभी | १) श्री. मुकेश खुल्लर | ४९९४० | ०.००१९८ | ४९९४० | ०.००१९८ |
| | २) श्री. जे. के. श्रीनिवासन (महाराष्ट्र शासनाचे नामनियुक्त सदस्य) | १० | ०.०००००३९ | १० | ०.०००००३९ |
| वर्षभरात प्रवर्तकांच्या धारणेत झालेली वाढ / घड - तारीख निहाय वाढी / घट होण्याची कारणे स्पष्ट करावीत (उदा. वाटप / हस्तांतरण बोनस / स्वेट इक्विटी इ.) | | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| वर्षाच्या अखेरीस | श्री. बिपीन श्रीमाळी | १० | ०.०००००३९ | १० | ०.०००००३९ |
| | श्री. मुकेश खुल्लर | १० | ०.०००००३९ | १० | ०.०००००३९ |
| | श्री. जे.के. श्रीनिवासन | १० | ०.०००००३९ | १० | ०.०००००३९ |
| | श्री. विजय सिंग | १० | ०.०००००३९ | १० | ०.०००००३९ |
| | श्री. सी. एस. थोटवे (म.रा.वि.मं चे सदस्य) | १० | ०.०००००३९ | १० | ०.०००००३९ |

५ **कर्जबाजारीपणा कंपनीची कर्जे यामध्ये थकीत/ उपर्जित परंतु देय नसलेले व्याज समाविष्ट आहे.**

**(रक्कम ₹ कोटीत)**

| | प्रतिभूत कर्जे (ठेवी वगळता) | अप्रतिभूत कर्जे | ठेवी | एकूण कर्जे |
|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्षाच्या आरंभीचे कर्ज | | | | |
| १ मुद्दल | २९५४५.०४ | २०४७.०७ | ०.०० | ३१५९२.११ |
| २ देय पण न भरलेले व्याज | १६८.९५ | ०.०० | ०.०० | १६८.९५ |
| ३ उपर्जित पण देय नसलेले व्याज | ३५३.८४ | ४.४२ | ०.०० | ३५८.२६ |
| बेरीज (१+ २ + ३) | ३००६७.८३ | २०५१.४९ | ०.०० | ३२११९.३२ |
| आर्थिक वर्षात कर्ज बाजारीपणातील बदल | | | | |
| १ भर | ७८४.४६ | ४०१९.७६ | ०.०० | ४८०४.२२ |
| २ घट | ९८४.०५ | २२२.२४ | ०.०० | १२०६.२९ |
| निव्वळ बदल | (१९९.५९) | ३७९७.५२ | ०.०० | ३५९७.९३ |
| आर्थिक वर्षाच्या अखेरचे कर्ज | | | | |
| १ मुद्दल | २९३४५.४५ | ५८४४.५९ | ०.०० | ३५१९०.०४ |
| २ देय पण न भरलेले व्याज | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ उपर्जित पण देय नसलेले व्याज | ३३२.७१ | ५.५९ | ०.०० | ३३८.३० |
| बेरीज (१+२+ ३) | २९६७८.१६ | ५८५०.१८ | ०.०० | ३५५२८.३४ |

६ **संचालक व व्यवस्थापनातील महत्वाचे कर्मचारी यांचे परिश्रमिक**

**अ) व्यवस्थापकीय संचालक पूर्णवेळ संचालक आणि किंवा व्यवस्थापक यांचे परिश्रमिक**

| अनु. क्र | परिश्रमिकाचा तपशील | व्यवस्थापकीय संचालक / पूर्ण वेळ संचालक / व्यवस्थापक यांची नावे | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बिपीन श्रीमाळी (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक) | जे.के. श्रीनिवासन (संचालक वित्त) | सी. एस. थोटवे (संचालक प्रकल्प) | विजय सिंग (संचालक संचलन) | |
| १ | एकूण वेतन<br>अ) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (१) यातील तरतुदी नुसार वेतन | २४०७७२७ | २६२९६२७ | ३०११७६३ | ३७८६४६३ | ११८३५५८० |
| | ब) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (२) नुसार वेतने तर प्राप्ती | निरंक | ३८११८० | ४३८४३४ | ५६५८२० | १३८५४३४ |
| | क) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (३) नुसार वेतनाऐवजी नफा | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | स्टॉक पर्याय | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३ | स्वेट इक्विटी | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ४ | कमिशन, नफ्याची टक्केवारी इतर (स्पष्ट करावे) | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ५ | इतर – कृपया स्पष्ट करा | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | **बेरीज (अ)** | **२४०७७२७** | **३०१०८०७** | **३४५०१९७** | **४३५२२८३** | **१३२२१०१४** |
| | कायद्यानुसार मर्यादा | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**ब) इतर संचालकांचे परिश्रमिक**

| परिश्रमिकाचा तपशील | संचालकांची नावे | | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३ स्वतंत्र संचालक | श्री. विश्वास पाठक | श्रीमती इरावती दाणी | लागू नाही | लागू नाही |
| १ मंडळ / समिती यांच्या बैठकीस उपस्थित राहण्याचे शुल्क | ७५००० | १०५००० | निरंक | १८०००० |
| २ दलाली | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३ इतर कृपया स्पष्ट करावे | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| **बेरीज (१)** | **७५०००** | **१०५०००** | **निरंक** | **१८००००** |
| ४ इतर अकार्यकारी संचालक | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| १ मंडळ / समिती यांच्या बैठकीस उपस्थित राहण्याचे शुल्क | | | | |
| २ दलाली | | | | |
| ३ इतर कृपया स्पष्ट करावे | | | | |
| **बेरीज (२)** | **निरंक** | **निरंक** | **निरंक** | **निरंक** |
| **एकूण बेरीज = (१+२)** | **७५०००** | **१०५०००** | **निरंक** | **१८००००** |
| एकूण व्यवस्थापकीय परिश्रमिक | ७५००० | १०५००० | निरंक | १८०००० |
| कायद्याप्रमाणे एकूण मर्यादा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**क ) व्यवस्थापकीय संचालक /व्यवस्थापक / पूर्ण वेळ संचालक या व्यतिरीक्त महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांचे परिश्रमिक**

| अनु. क्र. | परिश्रमिकाचा तपशील | महत्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| | | कंपनी सेक्रेटरी | |
| १ | एकूण वेतन | | |
| अ) | आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (१) यातील तरतुदीनुसार वेतन | १६४५९६८ | १६४५९६८ |
| ब) | आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (२) याप्रमाणे वेतनेतर प्राप्तीचे मुल्य | १९९७३५ | १९९७३५ |

| | | | |
|---|---|---|---|
| क) | आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (३) नुसार वेतना ऐवजी नफा | निरंक | निरंक |
| २ | स्टॉक ऑप्शन | निरंक | निरंक |
| ३ | स्वेट इक्विटी | निरंक | निरंक |
| ४ | दलाली, नफ्याच्या टक्केवारी मध्ये इतर स्पष्ट करावे | निरंक | निरंक |
| ५ | इतर – कृपया स्पष्ट करावे | निरंक | निरंक |
| | **बेरीज (अ + ब)** | **१८४५७०३** | **१८४५७०३** |

७ **गुन्हे प्रशमन करण्याबद्दल दंड / शिक्षा**

| प्रकार | कंपनी कायद्याचे कलम | संक्षिप्त वर्णन | गुन्हे प्रशमन करण्याबद्दल दंड / शिक्षा | प्राधिकारी आर डी / एन सी एल टी न्यायालय | अपिल केले असल्यास (तपशील देणे) |
|---|---|---|---|---|---|
| दंड | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| शिक्षा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| गुन्हे प्रशमन | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**क) कसुर करणारे इतर अधिकारी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दंड | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| शिक्षा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| गुन्हे प्रशमन | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

संचालक मंडळाच्या वतीने

(बिपीन श्रीमाळी)
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

स्थळ : मुंबई
दि : १७/१०/२०१६

## संचालकांच्या अहवालाचे जोडपत्र - २
## महानिर्मिती कंपनीचे सामाजिक उत्तरदायित्वाच्या या कार्यक्रमाचे इतिवृत्त
### (संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट करण्यासाठी दिलेल्या नमुन्याप्रमाणे)

१. महानिर्मिती कंपनीने सामाजिक उत्तरदायित्वाच्या धोरणाची संक्षिप्त रुपरेषा येथे देण्यात आली आहे. यामध्ये घ्यावयाचे कार्यक्रम व प्रकल्प आणि या धोरणाची वेब लिंक यांचाही समावेश केला आहे.

आपल्या कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्वाचे ध्येय पुढीलप्रमाणे आहे :

स्थानिक समुदाय १ संपूर्ण समाज यांचा टिकाऊ स्वरुपाचा सामाजिक व आर्थिक विकास करण्यासाठी सक्रीय योगदान देणे, यामध्ये कंपनीचे कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांचाही अंतर्भाव असून त्यांच्या जीवनाचा दर्जा सुधारणे आणि राज्यातील मानव संसाधनाचा निर्देशांक उंचावणे. कंपनीच्या या विषयीच्या धोरणात शिक्षण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, आरोग्याची निगा, पर्यावरण, सामाजिक सबलीकरण, पायाभूत सोयींचा विकास करणे, खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम या क्षेत्रात लक्ष केंद्रीत केले जाईल. कंपनीच्या प्रकल्पाच्या परिसरातील समुदायाची जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रगती व्हावी; तो समृध्द व्हावा यासाठी सर्वांगिण विकासाचे काम करण्याचा प्रयत्न राहील. कंपनीचे सामाजिक उत्तरदायित्वाचे धोरण पुढील वेबसाईट वरही उपलब्ध आहे.
http:/www.mahagenco.in/uploads/csr/mspgcl% 20 New % 20 policy. PDF.

२. संचालक मंडळाची सी एस आर समिती ३१ मार्च २०१६ रोजी गठीत करण्यात आली, ती अशी

श्री. बिपीन श्रीमाळी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

श्री. सी. एस. थोटवे (संचालक प्रकल्प)

श्री. विजय सिंग, संचालक (संचलन)

श्री. जे.के. श्रीनिवासन (संचालक वित्त)

श्रीमती. इरावती दाणी, स्वतंत्र संचालक

३. कंपनीची मागील तीन वर्षातील सरासरी निव्वळ नफा ₹ ३४४.९४ कोटी.

४. विहित कंपनीचे सामाजिक उत्तरादायित्वे यासाठी विहित खर्च (वरील बाब क्र. ३ मधील रकमेच्या २ टक्के: ₹ ६.८९ कोटी)

५. वित्तिय वर्षातील सी एस आर कार्यक्रमावरील खर्चाचा तपशील

अ) वित्तिय वर्षात खर्च करावयाची रक्कम: ₹ ६.२० कोटी

ब) खर्च न केलेली रक्कम (जर काही असल्यास) : ₹ ०.६९ कोटी

क) वित्तिय वर्षात खर्च केलेल्या रकमेचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.

| अनु. क्र. | सी एस आर प्रकल्प निश्चित केलेले कार्य | प्रकल्पात समावेश केलेले क्षेत्र | प्रकल्प किंवा कार्यक्रम १) स्थानिक क्षेत्र किंवा इतर २) जेथे सदर प्रकल्प आहे तो जिल्हा व राज्य (₹ लाखात) स्पष्ट करा | प्रकल्प कार्यक्रमाच्या खर्चाची रक्कम (₹ लाखामध्ये) | प्रकल्प कार्यक्रम यावर खर्च केलेली रक्कम उपशीर्षक: १) प्रकल्पावरील थेट खर्च २) ओव्हर हेड्स (₹ लाखात) | अहवाल मुदतीमधील संचित खर्च (₹ लाखात) | खर्च केलेली रक्कम थेट किंवा अन्य अमंल बजावणी संस्थेमार्फत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रसाधन गृह बांधणे | आरोग्य निगा | कोराडी २४० | १०७.४१ | थेट खर्च १०७.४१ | १०७.४१ | थेट |
| २. | विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | शिक्षण | भुसावळ १०५ | १.०९ | थेट खर्च १.०९ | १.०९ | थेट |
| ३. | शाळेच्या इमारतीचे रंगकाम करणे. | पायाभूत सोयी | कोराडी २४० | २४.२९ | थेट खर्च २४.२९ | २४.२९ | थेट |
| ४. | शाळेची दुरुस्ती करणे | पायाभूत सोयी | कोराडी २४० | ६.७२ | थेट खर्च ६.७२ | ६.७२ | थेट |
| ५. | पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे | पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे | कोराडी २४० | ४८.२८ | थेट खर्च ४८.२८ | ४८.२८ | थेट |
| ६. | वृक्ष लागवाड | पर्यावरण | कोराडी २४० | १.५९ | थेट खर्च १.५९ | १.५९ | थेट |
| ७. | रस्त्याचे बांधकाम | पायाभूत सोयी | चंद्रपुर ११० | १०.२३ | थेट खर्च १०.२३ | १०.२३ | थेट |
| | | | खापरखेडा१३६ | १.५३ | थेट खर्च १.५३ | १.५३ | थेट |
| | | | कोराडी २४० | ७७.८५ | थेट खर्च ७७.८५ | ७७.८५ | थेट |
| | | | चंद्रपूर २५० | ८४.६२ | थेट खर्च ८४.६२ | ८४.६२ | थेट |
| ८. | आवाराच्या भिंतीचे बांधकाम | पायाभूत सोयी | कोराडी २४० | ११.१२ | थेट खर्च ११.१२ | ११.१२ | थेट |
| ९. | रस्त्याच्या बाजूला आर.सी.सी. निचरा बांधकाम | पायाभूत सोयी | चंद्रपूर २५० | ०६.०५ | थेट खर्च ०६.०५ | ०६.०५ | थेट |
| १०. | समाज भवनाचे बांधकाम | पायाभूत सोयी | कोराडी २४० | ५५.४५ | थेट खर्च ५५.४५ | ५५.४५ | थेट |
| ११. | १५० एम एम व्यासाची बोअरवेल खोदून देणे व २ एच पी सबमर्सिबल पंप लावणे | पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे | कोराडी २४० | ४.४२ | थेट खर्च ४.४२ | ४.४२ | थेट |
| १२. | अंभोरा, भताली, पायली या ३ ठिकाणी (प्रकल्पग्रस्त गावे) बस स्टॉप शेडचे बांधकाम | पायाभूत सोयी | चंद्रपूर ११० | २.९८ | थेट खर्च २.९८ | २.९८ | थेट |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | अंभोरा, भताली, पायली या ठीकाणी (प्रकल्प ग्रस्त गावे) सामाजिक हॉलचे बांधकाम | पायाभूत सोयी | चंद्रपूर ११० | ७.७९ | थेट खर्च ७.७९ | ७.७९ | थेट |
| १४. | भूबाधित ३ गांवासाठी हँडपंप व प्लॅटफॉर्मसह ट्युबवेल / बोअरवेल बांधकाम | पिण्याच्या पाण्याचा पुरवठा | चंद्रपूर ११० | ५.०३. | थेट खर्च ५.०३ | ५.०३ | थेट |
| १५. | शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधणे | पायाभूत सोयी | कोराडी २४० | ८.८७ | थेट खर्च ८.८७ | ८.८७ | थेट |
| १६. | सामाजिक उत्तर दायित्वविषयक विविध कामांची माहिती देणारे माहिती दर्शक फलक तयार करुन लावणे. | पायाभूत सोयी | कोराडी २४० | १.३२ | थेट खर्च १.३२ | १.३२ | थेट |
| १७. | नांदा येथील समाजभवनासाठी चौथरा संरक्षक व ह्युम पाईप सेप्टिक टँकचे बांधकाम | पायाभूत सोयी | कोराडी २४० | १२.६२ | थेट खर्च १२.६२ | १२.६२ | थेट |
| १८. | पाणी पुरवठा योजनेतील सध्याच्या विंधन विहिरी ६.५० मी. डाय खोल करणे. | पिण्याच्या पाण्याचा पुरवठा | कोराडी २४० | ६.५७ | थेट खर्च ६.५७ | ६.५७ | थेट |
| १९. | जलयुक्त शिवार योजना | पिण्याच्या पाण्याचा पुरवठा | कोराडी २३३ | ८०.६२ | थेट खर्च ८०.६२ | ८०.६२ | थेट |
| २०. | जलतळ्यांचे सौंदर्यीकरण | पायाभूत सोयी | उरण १७० | २०.२९ | थेट खर्च २०.२९ | २०.२९ | थेट |
| २१. | स्मशानभूमीचे बांधकाम | पायाभूत सोयी | उरण १७० | ३१.३८ | थेट खर्च ३१.३८ | ३१.३८ | थेट |
| | | | कोराडी २४० | २.०२ | थेट खर्च २.०२ | २.०२ | थेट |
| | **एकूण** | | | **६२०.१४** | **६२०.१४** | **६२०.१४** | |

*अमलबजावणी करणाऱ्या संस्थेचे नाव द्यावे : लागू नाही

६. जर कंपनी मागील ३ वर्षानंतर सरासरी निव्वळ नफ्याच्या २ टक्के रक्कम खर्च करण्यास अयशस्वी झाली असेल तर त्याची कारणे द्यावेत – संचालकाच्या अहवालात दिल्याप्रमाणे

७. धोरणाची अमलबजावणी आणि त्याकडे लक्ष देण्याचे काम कंपनीच्या सी एस आर ध्येया व धोरणानुसार केले या बद्दलच्या उत्तरदायित्वाचे निवेदन.

**बिपीन श्रीमाळी**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
अध्यक्ष सी.एस.आर.समिती

## संचालकच्या अहवालाचे जोडपत्र ३

**(कंपनी (लेखे) नियमावली २०१४ अनुसार आवश्यक तपशील)**

**अ) ऊर्जा संवर्धन**

वर्ष २०१५-१६ दरम्यान ऊर्जा संवर्धनासाठी खालीलप्रमाणे कार्य करण्यात आली आहेत.

- पुढील क्षेत्रामध्ये अंतर्गत ऊर्जा अंकेक्षण करण्यात आले. क्राँम्प्रेस्डे एअर, फिड वॉटर, कुलींग वॉटर सिस्टम, हिटर्स इ.क्षेत्रे.
- वीज निर्मिती केद्रांत कर्मचाऱ्यांची जागरुकता वाढावी म्हणून सतकर्तता/ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले.
- ऊर्जा संवर्धनाची जागृती निर्माण करण्यासाठी भित्ती पत्रके/ निबंध स्पर्धा इ. आयोजन.
- महानिर्मिती कंपनीकडे प्रशिक्षित अभियंताचा ताफा आहे. ते ऊर्जा अंकेक्षण आणि प्रमाणित ऊर्जा व्यवस्थापक आहेत. त्यांचे ज्ञान केंद्राच्या संचालन व सुव्यवस्थेच्या नित्य कामात उपयोगात आण्यात येते.
- कर्मचाऱ्यांना वर्षातून २ वेळा सी.एफ.एल बल्बचे विनामूल्य वाटप केले जाते. कर्मचाऱ्यांना एल.इ.डी. बल्ब सवलतीच्या दराने देण्यात येतात.

**सहाय्यक वीज वापर**

- साह्यकारी वीज वापराची अचूक मोजणी करण्याकरीता ०.२ क्लास एनर्जी मिटर्स वापरले जातात.
- दिवसाच्या प्रकाशाचा पूरेपूर उपयोग करण्यात येतो.
- यंत्र व उपकरणे यांचा निरउपयोगी वापर टाळणे.
- ऊर्जा कार्यक्षम दिव्यांचा वापर करण्यासाठी प्रकाश यंत्रणेत सुधारणा केल्या जातात.
- कॉम्प्रेस्ड एअर, स्टिम पाईप, कुलींग वॉटर सिस्टम व इलेक्ट्रीक सिस्टम यातील गळतीला आळा घालण्यात येतो.
- डी.एम. वॉटर फ्लो मिटर्सची स्थापना केली.
- उरण येथील जी.टी.युनीट्स साठी नैसर्गिक शितकरणाची व्यवस्था.
- सर्व स्थितीवर लक्ष देणे व साहयकारी सामग्रीची प्रतिबंधात्मक देखभाल करणे.

**प्रकाश योजना**

- एच.पी.एम.व्ही. लॅम्प बदलून त्याजागी एच.पी.एस.व्ही. लॅम्पचा वापर.
- इलेक्ट्रॉनीक बलास्ट व सी.एफ.एल. प्रकाश साधनांचा वापर.
- सेवेच्या इमारतीमध्ये जीने, टरबाई बेसमेन्ट आदी क्षेत्रात प्रकाश व्यवस्थेची व्यक्तीशा चालू/ बंद करता येणारी बटणे लावण्यात आली.

**उष्णता उर्जा**

- ऑन लाइन कंडेसर ट्यूब क्लिनिंग सिस्टीमवर योग्य लक्ष.
- औष्णिक रोधके वेळेवर दुरुस्ती करणे.

- एअर-प्रीहिटर्स व भट्टया शक्य तेव्हा स्वच्छ करणे.
- बॉयलर एक्सेस एअरचा जास्तीत जास्त वापर.
- हिटरेटकडे नियमीतपणे एस इ/जीएम/सी जी एम स्तरावरुन अनुक्रमे साप्ताहिक/पंधरवडयाने/मासिक मुदतीत लक्ष देणे.

**वंगन**

- सर्व वीज केंद्रात शून्य गळतीची संकल्पना सुरु केली.
- गळणारे इंधन तेल पून:प्राप्त करण्यासाठी ऑईल स्किमर्स व्यवस्था करुन विकसित केली.
- भुसावळ व नाशिक केंद्रात टर्बाइन व बी एफ पी तेल केंद्रावर्ती पध्दतीने गाळून घेणे.

**डीएम वॉटर**

- डी.एम.वॉटर, फिड लाईन व स्टिम गळती यांच्याकडे अग्रक्रमाने लक्ष दिले.
- खापरखेडा केंद्रात सोनिक बॉयलर डिटेक्टशन सिस्टीम स्थापन केली.

**संकीर्ण पाणी**

- कोराडी, नाशिक, खापरखेडा, चंद्रपूर केंद्रातील राखेच्या पाण्याचा पूर्नवापर केला जातो.
- आग विझविण्यासाठी लावलेले पाण्याचे नळ पूर्वी जमिनीच्या आत असत. त्यातील गळती तात्काळ दुरुस्ती करता यावी म्हणून ते जमिनीच्या वर लावण्यात आले.

**ब) तंत्रज्ञानाचा अंगिकार आणि नवीन शोध स्वीकार**

अ) तंत्रज्ञान समाविष्ट करण्याचे प्रयत्न केले जातात.

**समावेशना संबंधीच्या माहितीचे प्रकटन.**

- अमोनिया इंजेक्शन फल्यू गॅस कंडीशनींग सिस्टम (ए.एफ.जी.सी) स्थापित केला.
- परळी केंद्रातील युनीट क्र. ३ येथील संचालन प्रणालीचा (डि.सी.एस.) दर्जा उंचावला.
- महानिर्मिती मुख्यालय व वीज केंद्रे येथे साहित्य प्रापणासाठी निविदा संकल्पना सुरु केली.

**संशोधन व विकास**

१ **कंपनीने संशोधन व विकासाची क्षेत्रे निश्चित केली :**

कुलींग वॉटरचे अझोनायझेशन, ए एफ जी सी सिस्टीम, आयलँडींग व ब्लॅकस्टार्ट सुविधा उरण येथे सुरु केल्या. निरॉफॅन ॲकॉस्टीक क्लिनिंग सिस्टम ॲट एअर हिटर्स, ट्यूब गळतीसाठी शोध यंत्रणा, कोळसा गिरण्यासाठी एम पी एस पी सिस्टम, तेल गाळण्यासाठी व तेल पूर्नवापरासाठी ऑईल स्किस्पर्स मशीन व खाली पडणारे तेल पून: मिळविण्यासाठी प्रयत्न.

२ **वरील संशोधन व सुव्यवस्थेमुळे झालेले लाभ**

**ओझोनायझेशन :** परंपरागत पध्दतीपेक्षा खर्च कमी लागतो. धातूची झीज कमी होते, हाताळणी सुरक्षित, कुलींग वॉटर सिस्टीमधील लिजीओनेला जंतुचा स्तर नष्ट होतो.

**ए.एफ.जी.सी. :** औ.वि.केंद्रातील एस पी एम चा स्तर प्रदुषण नियंत्रण मंडळाणे प्रमाणित केल्याप्रमाणे, १५० एमजी/एन एम क्युब पेक्षा कमी राखला जातो.

**आयलॅडींग सिस्टम :** प्रणालीत अडथळे येणे / बंद पडणे अशा प्रकरणी अलग करण्याची आयलॅडींग सिस्टम यंत्रणा संबंधी येईल व जी टी पी एस स्थानिक व क्षेत्र ग्रीड पासुन वेगळे होईल.

**ब्लॅक स्टार्ट फॅसिलीटी :** जर वीज जाळयाला काही धक्का बसला किंवा ते अलग झाले नाही तर ब्लॅक स्टार्ट सुविधामुळे युनिट्स पूर्वपदावर आणता येतात व क्षेत्रातील वीज पुरवठा अल्प वेळेत सुरु करता येतो.

३ **भविष्यातील योजना**

ऑनलाईन ऊर्जा व्यवस्थापन सुरु करण्यासाठी ए.एफ.जी.सी. प्रणाली अन्य औ.वि. केंद्रात स्थापित करण्यात येईल.

४ **संशोधन व सुव्यवस्था खर्च**

निरंक

ब) कंपनीने कोणतेही आयात केलेले तंत्रज्ञान वापरलेले नाही.

## क) परकीय चलनातील मिळकत व खर्च

अ) निर्यातीची कामे, निर्यात वाढीसाठी प्रयत्न, उत्पादित व सेवांसाठी नवी निर्यात बाजारपेठे आणि निर्यात योजना : निरंक.

ब) परकीय चलनाचा वापर व कमाई

| वापरलेले / कमावलेले एकूण परकीय चलन | | ₹ |
|---|---|---|
| १ | परकीय चलनातील खर्च | |
| | अ) सी.आय.एफ तत्त्वानुसार भांडवली मालाचे मुल्य | २,२६४,३५५,०२१ |
| | ब) भांडारातील सुटे भाग व घटक | २०,९९७,५०८ |
| २ | मिळालेले परकीय चलन | निरंक |

# जोडपत्र ४
# वित्तिय वर्ष २०१५-१६ चा सांविधिक लेखापरिक्षक यांचा अहवाल व त्यास व्यवस्थापनाने सादर केलेली उत्तरे

| अनु क्र. | सांविधिक लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|---|
| १. | **कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रांवर अहवाल.**<br>आम्ही, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिती) कंपनीने सोबत जोडलेल्या कंपनीच्या वित्तीय विवरण पत्राचे लेखापरिक्षण केले आहे. या विवरणपत्रांमध्ये कंपनीचे दि.३१ मार्च २०१६ रोजीचा ताळेबंद, तसेच त्या दिवशी संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक, रोकडता प्रवाह आणि त्यासोबत कंपनीच्या लेखा धोरणांचा सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहिती या कागदपत्रांचा समावेश आहे. | कंपनी अधिनियम २०१३ यातील तरतुदी आणि या अंतर्गत दिलेली व कंपनीला लागू होणारी लेखा मानके यांना अनुसरुन महानिर्मिती कंपनीने सदर वित्तिय विवरणपत्रे म्हणजेच कंपनीचा ३१/०३/२०१६ रोजीचा ताळेबंद व रोकडता प्रवाह आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ चे नफा व तोटा पत्रक तयार केले आहे. |
| २. | **वित्तीय अहवालासंबंधी कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी :**<br>कंपनी अधिनियम २०१३ (अधिनियम) यांच्या कलम १३४ (५) यामध्ये नमूद केल्याप्रमाणे, कंपनी अधिनियम २०१३ (अधिनियम) ज्याचे सहवाचन कंपनी ("लेखा") नियमावली २०१४ मधील नियम ७ सोबत केले जाते, त्यात अधिसूचित केलेल्या लेखा मानकांशी सुसंगत असणारी आणि कंपनीची आर्थिक स्थिती, वित्तीय कामगिरी व रोकडता प्रवाह यांचे सत्य व योग्य चित्र दर्शविणारी स्वायत्त वित्तीय विवरण पत्रे तयार करणे ही कंपनीच्या संचालक मंडळाची जबाबदारी असते. या जबाबदारीमध्ये कंपनीच्या सर्व मत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी अधिनियमावलीतील तरतुदींनुसार ठरण्यांचे दस्तऐवज व्यवस्थितपणे जतन करणे, आणि कोणत्याही लबाडीस आळा घालणे व लबाडीस शोधणे, योग्य लेखा धोरणांचे निवड करुन ती लागू करणे, रास्त व सुज्ञ निर्णय घेणे व अंदाज करणे, अंर्तगत वित्तीय नियंत्रणाची रचना, कार्यवाही करुन त्यांचा अंमल चालू ठेवणे, लेख्यांचे दस्तऐवज अचूक व संपूर्ण असण्याची हमी मिळविण्याकरिता प्रभावी संचलन करणे आपण कोणतेही लबाडी किंवा चूक नसलेली व कोणत्याही गैर विवरणांपासून मुक्त तसेच सत्य व योग्य दर्शन घडविणारी वित्तीय विवरणपत्रके तयार करुन ती सादर करणे - यांचा समावेश आहे. | |
| ३. | **लेखापरिक्षकांची जबाबदारी :** | |
| १. | आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारे या वित्तीय विवरणपत्रांवर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. | लेखा परिक्षक यांनी मानणी केलेली सर्व माहिती स्पष्टीकरण व त्याला पुष्टि देणारी कागदपत्रे कंपनीने उपलब्ध करुन दिली आहेत. |
| २. | अधिनियम व त्यासाठी केलेली नियमावली यातील तरतुदींनुसार आवश्यक असणारी माहिती आमच्या लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट | |

| | | |
|---|---|---|
| | करण्यासाठी आम्ही अधिनियमाच्या तरतुदी लेखांची व लेखपरिक्षणांची मानके याबाबी लक्षात घेतल्या आहेत. | |
| ३. | आम्ही आमचे लेखा परिक्षण, अधिनियमाच्या कलम १४३ (१०) यात विनिर्देशित केलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकांनुसार केले आहे. या लेखा मानकांनुसार आम्ही नैतीक गरजांची पुर्तता करणे तसेच ही वित्तीय विवरणपत्रके कोणत्याही प्रत्यक्ष गैर विवरणांपासुन मुक्त आहेत किंवा कसे याबद्दल योग्य प्रकारे आश्वासन मिळविण्याच्या दृष्टिने आमच्या लेखा परिक्षणाचे नियोजन करणे व ते पार पाडणे आवश्यक आहे. | |
| ४. | कोणत्याही लेखापरिक्षणात वित्तिय विवरणपत्राातील रकमा व प्रकटने यासाठी लेखापरिक्षणात्मक पुरावे मिळविण्याच्या दृष्टिने एका पध्दतीनुसार कार्य करावे लागते. यासाठी लेखा परिक्षक त्यांच्या न्यायबुध्दीवर अवलंबुन योग्य पध्दत निवडतात.त्यामध्ये लबाडी किंवा नजरचुका यामुळे वित्तिय विवरणपत्रांचे गैर विवरण होणाऱ्या धोक्याचे मुल्यांकन करणे समाविष्ट असते. | |
| ५. | या धोक्याचे मुल्यमापन करण्यासाठी, परिस्थितीस अनुरुप अशा लेखा परिक्षणाची रचना ठरविताना, लेखा परिक्षक सत्य व रास्त दर्शन घडविणारी वित्तिय विवरणपत्रे तयार करण्यासाठी, कंपनीच्या अंतर्गत वित्तिय नियंत्रणाचा विचार करतात. लेखा परिक्षणांमध्ये कंपनीच्या संचालकांनी वापरलेल्या लेखाधोरणांच्या योग्यतेबाबत आणि त्यांनी केलेल्या लेखांच्या अंदाजाबाबत तसेच वित्तिय विवरणापत्रांचे सर्वांगिण सादरीकरणाचे मुल्यंकन करणे, याचाही समावेश होतो. | |
| ६. | आमच्या मते आम्ही मिळविलेले लेखा परिक्षणात्मक पुरावे हे या वित्तिय विवरणपत्रांवर आमचे लेखा परिक्षणात्मक मत व्यक्त करण्यासाठी पुरेसा व योग्य आधार देतात. | |
| ४.<br><br>१. | **पात्रतेच्या मतांचा आधार**<br>*आम्ही खालील बाबींवर लक्ष वेधतो*<br>*कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि. सोबत वीज खरेदी कराराच्या अटीनुसार ग्राहकांकडून अधिभाराची रक्कम या लेखाशीर्षाखाली थकीत भरण्यावरील व्याजाची रक्कम ₹१०३९.२६ कोटी वर्षभरातील अधिभाराचे उत्पन्न म्हणून मान्य केली आहे. महावितरणाने अधिभाराचे रक्कम ₹ २६३८.२७ कोटी दि.३१ मार्च २०१६ पर्यंत भरली नव्हती. तसेच बहु - वर्षीय वीज दर विनियम, २०११ आणि त्यानंतर आलेल्या सुधारणेनुसार कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीला ₹६२.३७ कोटीचे रिॲक्टीव पॉवर चे बिल केले. परंतु ते महापारेषण ने मान्य केले नाही. महावितरण व महापारेषणने ही देयके स्वीकारले नसल्याने आणि लेखांचा मेळ झाला नसल्याने आम्ही या उत्पन्नाची विश्वासर्हता व त्याचा कंपनीचा या वर्षीचा* | महानिर्मिती कंपनीने वीज खरेदी करारातील अटीनुसार महावितरण कंपनीकडे अधिभाराचे देयक पाठविले आहे आणि ते महावितरणाला बंधनकारक आहे. ही खरीखुरी वैध येणी आहेत. या उलट या देयकांचे लेखे न केल्याने महावितरणाच्या खर्चाची आणि दायित्वाची कमी नोंद झाली आहे. कंपनीने महावितरण सोबत मेळ केला व अहवाल वर्षात तो लेखापरिक्षकांना दिला. तसेच महानिर्नितीने पाठवलेल्या वैध देयकाची नोंद महापारेषणने त्यांच्या लेखापुस्तकात केली नाहीं. |

| | | |
|---|---|---|
| | *तोटा, व्यापारी येण्याचे मुल्य, महसुल व राखीव व अधिक्य या बाबींवरील परिणाम यावर अभिप्राय देण्यास असमर्थ आहेत.* | |
| २. | *टिपा क्र ३१ लेखावरील टिप यात नमुद केल्याप्रमाणे कर्ज व अग्रीमे यांच्या शिल्लकी ठेवी, जागतिक बँकेकडील कर्जे व माल पुरवठ्याचे दायित्व या प्रकरणांप्रमाणे संबंधित संस्था व्यक्ति यांचेकडून कायम होणे आणि किंवा त्यांच्या अभिलेखांशी त्यांचा मेळ होणे यांच्या अधीन आहेत. असे कायम होणे व मेळ करणे प्रलंबित असल्याने त्याचे परिणाकारक समायोजना करणे शक्य झालेले नाही. याशिवाय कर्ज व अग्रिमे यांच्या काही शिलकींच्या समजयोग्य मुदतीपेक्षा अधिक काळ थकीत रकमांचा लेखा निहाय तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे जर त्यातील विशिष्ट खात्यांसाठी तरतुद करणे आवश्यक असेल तर निश्चित करता येत नाही, यामुळे या शिलकींवर पडू शकणारा प्रभाव व कंपनीचा नफा याबाबत आम्ही अभिप्राय व्यक्त करण्यास असमर्थ आहोत* | कंपनीने सॅप इंटिग्रेटेड सिस्टम वापरात आणली. त्यामध्ये विक्रेता निहाय, ग्राहक निहाय, कर्मचारी निहाय देय व प्राप्य शिलकीची माहिती उपलब्ध असते. या सिस्टमचा एक भाग म्हणजे लेखा पद्धतीत उपकंपन्यांचे अभिलेख स्वंयचलितरीत्या निर्माण होतात. परंतु महाराष्ट्र शासनाने सुचित केलेल्या अंतिम हस्तातरण योजनेच्या अंमल बजावणीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न केल्यामुळे वेळेच्या अभावी नोंदीशी मेळ घालण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही.<br>येत्या वर्षात आम्ही उपकंपन्याच्या अभिलेखांचा नियंत्रण लेजर सोबत मेळ घालण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहोत या संबधी शिलकीची खात्री व्हावी यासाठी कंपनीने त्याबद्दल पत्रे काही ठिकाणाहून यापूर्वीच जारी केली आहेत. चालू वर्षी सर्व लेखा विभागातून शिलकी कायम करण्याची पत्रे पाठविली जातील, याची खातरजमा केली जाईल. जेव्हा खूप जुन्या झालेल्या शिलकींची सूत्रे सापडत नसतील तेव्हा त्या निर्लेखित/ पूनर्लिखित करण्याच्या दृष्टीने योग्य कृती केली जाईल व त्याचे योग्य समर्थन दिले जाईल. अशा प्रकारे नियंत्रण लेजरशी सुसंगत स्वच्छ शिलकी निर्माण होतील. |
| ३. | *लेखांवरील टिपा क्र.३२ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, कर्ज व अग्रिमे यांत कोळसा कंपन्यांना अग्रिमापोटी दिलेल्या ₹ ७६०.८८ कोटी समावेश आहे. या अग्रिमाबाबत कंपनीने कोळसा पुरवठ्यासंबंधी ₹३७३.५२ कोटीचे दायित्वाची तरतूद केली आहे. याच्या देयकांचे अंतिमीकरण प्रलंबित असल्याने कंपनीने दिलेल्या आग्रिमा दायित्व काढले नाही यामुळे कंपनीच्या मत्ता व दायित्व यांचे जादा विवरण झाले आहे. यावरील बाबींचा कंपनीच्या नफ्यावर होणारा परिणाम निश्चित करता आलेला नाही.* | कोळसा कंपन्यांना अग्रीमे देणे व त्याचा निपटारा करणे हे एक सतत चालणारे काम आहे. प्रंलबित आग्रीमे व दायीत्वे ₹५५०० कोटी पर्यंत होती. ती ₹२७०० कोटी इतपत कमी केली व नंतर यावर्षी ₹१२०० कोटीपर्यंत खाली आणली. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये कोळसा अग्रिमे व दायित्व कमी करण्याचे प्रयत्न करुन आणखी सुधारणा करण्यात येईल व ती पर्याप्त स्तरावर आणण्यात येतील. |
| ५. | **पात्र मत**<br>*आमच्या मते व आमची सर्वोत्तपरी योग्य माहिती व आम्हांस दिलेली स्पष्टीकरणे यानुसार ही वित्तिय विवरणपत्रे, अधिनियमानुसार आवश्यक असणारी माहिती त्यासाठीच्या विहित नमुन्यात देतात. मात्र वरील परिच्छदे क्र. ४ मधील मुद्दे क्र १ ते ३ यामध्ये दि. ३१ मार्च २०१६ रोजी वर्षाचा नफा व निव्वळ मत्ता यांच्यावर होणाऱ्या परिणाम अनिश्चित असल्याचे आमचे मताच्या अधीन राहुन ही विवरणपत्रे भारतात सर्व साधारणपणे स्विकारल्या जाणारी लेखा मानके याच्यांशी सुसंगत असुन ती कंपनीची दि.३१ मार्च* | महानिर्मिती कंपनीने लागू होणारी सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखा तत्त्वे, मानके तसेच नियमावली व विनिमयने यास सुसंगत अशी लेख्यांची पुस्तके जतन केली आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | *२०१६ रोजी असलेली स्थिती आणि त्या दिवशी संपलेल्या वर्षाचा कंपनीचा* | |
| | *तोटा व रोकड प्रवाह यांचे यथार्थ व योग्य दर्शन घडवितात.*<br>**भर देण्याची प्रकरणे** | |
| ६.<br>अ) | आम्ही खालील टिपांवर लक्ष वेधू इच्छितो :<br>टिपा क्र. ३५ (अे) (२) जर काही तुट / नफा असल्यास त्याचा लेखा करणे याबाबत भविष्य निर्वाह निधीच्या हंगामी खात्याच्या आधारित आवश्यक तो तपशिल व माहिती उपलब्ध नसल्यामुळे. | भविष्य निर्वाह निधी यांच्या गुंतवणूकीचे विमागणिती शास्त्रानुसार मूल्यांकन करणे शक्य झालेले नाही. कारण त्यासाठी आवश्यक असणारे तपशील सी.पी.एफ.ट्रस्ट वेळेमध्ये देऊ शकली नाही मात्र येत्या वर्षात सी.पी.एफ.ट्रस्टकडे त्याचा पाठपुरावा केला जाईल. |
| ब) | टिपा क्र. ३५ (डी): कंपनीची (लेखा मानके) नियमावली २००६ अंतर्गत लेखा मानक १९- भाडेपट्टी संबंधी अंतर्गत आवश्यक जी माहिती दिलेली नाही. कारण विविध जल विद्युत केंद्राच्या वीज निर्मिती सुविधाबाबत महाराष्ट्र शासनाच्या सोबत करावयाचा भाडेपट्टी कराराची कार्यवाही प्रलंबित आहे. | महानिर्मितीने महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जलविद्युत केंद्राची भाडेपट्टी निश्चित करण्यासाठी म.वि.नि. आयोगाच्या आधारे भाडेपट्टी – खंड यांचा लेखा केला आहे. |
| क) | टिपा क्र ३५ (आय): महागुज कोलायरीज लि. या उपकंपनीच्या गुंतवणूकीतील तोट्याचा लेखा न करण्याबद्दलचे समर्थना संबंधी. | |
| ड) | टिपा क्र ३५ (के): महाराष्ट्र विद्युत प्रथम सुधारणा हस्तांतरण योजना अंतर्गत काढलेल्या महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३१ मार्च २०१६ रोजीच्या जाहिरनाम्यानुसार स्थिर मत्ताचे वाढीव मूल्य, वाढीव मूल्यावरील घसारा व त्यामुळे झालेली समभागातील वाढ यांच्या लेखा संबंधी. | |
| ७. | **इतर कायदे विषयी व नियमन यांच्या आवश्यकतांवर अहवाल**<br>कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) यातील आवश्यकतेनुसार व भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी दिलेल्या आदेशानुसार सुचित केलेली लेखा परिक्षणाची कार्यपद्धती त्यावर केलेली कृती, त्याच्या कंपनीच्या लेखांवर व वित्तिय विवरणपत्रांवर झालेला प्रभाव यांची पूर्तता याबाबतचे आमचे निवेदन परिशिष्ट -१ मध्ये दिले आहे. | |
| ८. | सदर अधिनियमाच्या कलम १४३ (११) यातील अटीनुसाद केंद्रीय सरकारने दिलेली कंपनीच्या (लेखा परिक्षण अहवाल) आदेश २०१६ (आदेश) यांतील परिच्छेद क्र. ३ व ४ यामध्ये निर्देशित केलेल्या विषयांवर एक निवेदन परिशिष्ट- २ येथे आम्ही दिले आहे. | |
| ९. | अधिनियमाच्या कलम १४३ (३) च्या अवश्यकतेनुसार आम्ही अहवाल देतो की :-<br>अ) *पात्रतेच्या मतांसाठी आधार या विषयाचा उपपरिच्छेद ४ यात वर्णन केलेली बाब वगळता,* आमच्या लेखा परिक्षणासाठी, आमचे सर्वोतपरी ज्ञान व विश्वास यानुसार आम्हाला आवश्यक अशी सर्व माहिती शोधली व तिची स्पष्टीकरणे मिळवली आहेत. | महानिर्मितीत लागु होणारे कंपनी अधिनियम २०१३ यातील तरतुदी व त्यात दिलेली लेखा मानके यांना अनुसरुन वित्तिय विवरणपत्रे म्हणजे ३१-०३-२०१६ रोजी ताळेबंद व रोकडता प्रवाह विवणपत्रे आणि आ. वर्ष २०१५-१६ चे नफा व तोटा पत्रक तयार करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | ब) *आमच्या मते, उपरिनिर्दिष्ट पात्रतेच्या मतांसाठी आधाराचा परिच्छेद वगळता,* कंपनीने, कायद्यानुसार आवश्यक ती योग्य लेखांच्या वह्या, पुस्तके व्यवस्थित ठेवलेली आहेत, असे या वह्या-पुस्तकांच्या आम्ही केलेल्या तपासणी परिक्षेत दिसून आले आहे.<br>क) या अहवालसोबत दिलेली ताळेबंद पत्रक, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह पत्रक ही वित्तीय विवरणपत्रे लेखावह्यांशी सुसंगत आहेत.<br>ड) *उपपरिच्छेद ४ यात वर्णन केलेल्या आमचे निरीक्षण वगळता* आमच्या मते उपनिरिर्दिष्ट स्वायत्त स्वरुपाची, वित्तिय विवरणपत्रे, सदर कायद्याचे कलम १३३- ज्याचे सहवाचन कंपनी (लेखा) नियमावली २०१४ च्या नियम ७ सोबत होते, यामध्ये विनिर्देशित केलेल्या लेखा मानकांचे अनुपालन करतात.<br>इ) महानिर्मिती ही शासकीय कंपनी असल्यामुळे भारत सरकारची अधिसुचना क्रमांक जी.एस.आर. ४६३ (इ) दि ५ जुन २०१५ यानुसार कंपनी अधिनियम २०१३चे कलम १६४ (२) या कंपनीत लागु नाही.<br>फ) कंपनीच्या वित्तिय अहवालावरील पुरेसे अंतर्गत वित्तिय नियंत्रण आणि ह्या नियंत्रणाची प्रर्वतनातील परिणामकारकता याबाबतच आमचे निवेदन परिशिष्ट-३ मध्ये दिले आहे.<br>ग) कंपनी (लेखा परिक्षण व लेखा परिक्षक) नियमावली २०१४ यातील नियम ११ यांनुसार समाविष्ट करण्याची अन्य प्रकरणे याबाबत आमची सर्वोत्तम माहिती व आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आमची मते खालीलप्रमाणे आहेत.<br>१) कंपनीने प्रलंबित न्यायालयीन वादांचे वित्तिय विवरणपत्रांमधील आर्थिक स्थितीवर होऊ शकणारे परिणाम प्रकट केले आहेत. संदर्भ : वित्तीय विवरणपत्रांना दिलेली टिपा क्र. २३ पहावी<br>२) कंपनीला ज्या प्रत्यक्ष पुढील तोट्यांसाठी आर्थिक तरतुद करण्याची आवश्यकता भासेल असे दिर्घ मुदतीचे कोणतेही करार कंपनीने केलेले नाहीत. तसेच कंपनीने कोणताही डेरीव्हेटीव करार केलेला नाही.<br>३) कंपनीस गुंतवणुकदार शिक्षण व रक्षण निधीसाठी स्थानांतरीत करणे आवश्यक आहे अशी कोणतीही रक्कम नाही. | |
| | **स्वतंत्र्य लेखापरिक्षक यांच्या अहवालास जोडपत्र – १**<br>**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. दि. ३१मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता आमच्या समान तारखेच्या अहवालातील इतर कायदेशीर व नियमानाच्या आवश्यकता यांच्या विभागात परिच्छेद** | |

| | | |
|---|---|---|
| १. | **क्र. ७ यात दिलेल्या संदर्भानुसार.**<br>कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १४३ (५) यातील आदेशांवर अभिप्रय :<br>जर कंपनीची निर्गुंतवणुक करण्यासाठी निवड करण्यात आली तर मत्ता (अमुर्त मत्ता व जमीनी यासह) आणि दायित्वे (बांधीलकी असलेली व सर्वसामान्य राखीव यासह) यांच्या मुल्यांकनाबत संपुर्ण स्थितीदर्शक अहवालचे परिक्षण करावे, त्यामध्ये निर्गुंतवणूक बाबीची कार्यपध्दती व सहयाच्या कार्याचा टप्पा यांचा समावेश करावा. | र्निगुंवणुक या हेतुसाठी या कंपनीची निवड झालेली नाही. म्हणून यासाठीची माहिती देणे कंपनीला लागू नाही. |
| २. | जर काही कर्जे / उसनवारी / व्याज इ. सोडुन देणे / निर्देशित करणे याची काही प्रकरणे असली तर त्याची कारणे व त्यात असलेली रक्कम यांचा अहवाल देणे. | लेखा परिक्षणाच्या काळात व आहांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणतेही कर्जे उसनवारी / व्याज इ. सोडुन देणे / निर्देशित करणे याचे कोणतेही प्रकरणे वर्षे २०१५-१६ दरम्यान उदभवलेली नव्हती. कंपनीला मराविंम सुत्रधारी कंपनी मर्यादीत (तिची सुत्रधारी कंपनी) कडून एक पत्र प्राप्त झाले. ज्यात पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विज मंडळाच्या लेखापुस्तकात नमुद असलेल्या अज्ञात मत्ता व दायित्वे कंपनीच्या लेखा पुस्तकात घेण्याचे नमुद केले होते. पालक कंपनीने हे अज्ञात मत्ता / दायित्वे कंपनी व इतर उपकंपन्याना तर्क निर्देशक न वापरता एका ठराविक प्रमाणात हस्तांतरण केली. पालक कंपनीने ह्या अज्ञात मत्ता / दायित्त्वे पुनर्लिखीत / करण्यास कंपनीस कळविले. या शिल्लकीत ₹ २६५ कोटी भांडवली राखीवाचा (कंपनीचा भाग ₹ ६६ कोटी) समावेश आहे. कंपनीन ह्या मत्ता / दायित्वाला (निव्वळ ₹ ८६ कोटी) अद्याप मान्यता दिली नाही व व्यवस्थापनाने आम्हास कळविले आहे की, पालक कंपनीकडून याबाबतीत अधिक माहिती मिळवू |
| ३. | तिसऱ्या पक्षाकडे असलेला वस्तुमाल आणि शासन व अन्य प्राधिकरणे यांच्याकडून देणगांच्या स्वरुपात मिळालेल्या मत्ता यासाठी योग्य अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे ? | कंपनी तिचा वस्तुमाल / सामान तिसऱ्या पक्षाकडे फक्त प्रवर्तनासाठी किंवा जोडणी करण्यासाठीच पाठविते. आम्हांस दिलेले माहितीनुसार कंपनीने अशा कृतीसाठी योग्य अभिलेख नीट जतन केले आहेत. आम्हांस असे सांगणयात आले की, वर्षभरात शासनाकडून कोणत्याही मत्ता देणगी स्वरुपात कंपनीला मिळालेली नाही |
| ४. | कायदेशीर / लवादाकडे प्रलंबित खटल्यांचे वर्ष निहाय विश्लेषणाचा अहवाल देणे त्यात प्रलंबित असल्याची कारणे व सर्व कायदेशीर खटल्यांवरील खर्चावर लक्ष देणारी यंत्रणा अस्तित्वात असल्याबद्दल तिच्या प्रभावी उपयोगाबद्दल माहितीचा समावेश करणे (यात परदेशातील | कंपनीने प्रलंबित / लवादाकडील प्रकरणे यांना आकस्मित दायित्वे म्हणून निश्चित केली असुन ती प्रकट केली आहेत. एकूण ३८० प्रलंबित कायदेशीर / लवादाकडील खटल्यांचे वर्ष निहाय विश्लेषण खालील प्रमाणे आहेत. |

<table>
<tr><td></td><td>व स्थानिक खटल्यांची ही माहिती देणे.)</td><td>

| प्रकरणाचे वय | प्रकरणाची संख्या |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | ३८ |
| १ ते २ वर्षे | ५८ |
| २ ते ३ वर्षे | १९ |
| ३ ते ५ वर्षे | ४० |
| ५ वर्षापेक्षा जास्त | १९५ |
| इतर अनुपस्थित राहिलेली | ३० |
| **एकूण** | **३८०** |

योग्य माहितीच्या अनुपलब्धतेमुळे खटले कोणत्या कारणास्तव प्रलंबित आहेत ह्या बाबतीतील माहीती सह, आम्ही कायदेशीर खटल्यावरील खर्चाच्या परिणामकारक नियंत्रण व प्रलंबिताच्या कारणावर भाष्य करु शकत नाही.</td></tr>
<tr><td>५.</td><td>कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५)यातील उप निर्देशांवर अभिप्राय :-<br>औष्णिक विद्युत प्रकल्पांच्या प्रकरणी, विविध प्रदुषण नियंत्रण कायदे यांची अनुपालन तसेच त्याचे परिणाम -यामध्ये राखेचा वापर व विल्हेवाट आणि त्याबाबत कंपनीचे धोरण याची तपासणी करुन त्यावर अभिप्राय देणे.</td><td>कंपनीने कळविले आहे की, वर्ष २०१५-१६ मध्ये विविध प्रदुषण नियंत्रण कायद्याचे अनुपालन केले आहे. त्यात राखेचा वापर व विल्हेवाट यांचा सुध्दा समावेश आहे. प्रदुषण नियंत्रणाचे विविध कायदे त्याचे परिणाम - यात राखेचा वापर व विल्हेवाट यांचा समावेश केला आहे. यासंबंधी वर दिलेली माहितीचे आम्ही स्वतंत्र्यपणे पडताळणी केलेली नाही.</td></tr>
<tr><td>६.</td><td>या कंपनीने कोळशाच्या पिटहेडसपाशी उत्खनन करण्यासाठी खाजगी संस्थांसोबत महसुल वाटणीचा करार केला आहे का? आणि केला असल्याचा असे करार कंपनीच्या आर्थिक हितांचे पुरेसे रक्षण करते काय?</td><td>नाही, कंपनीने कोळसा बाहेर काढण्यासाठी कोणत्याही खाजगी संस्थासोबत कसलेही करार केलेली नाहीत.</td></tr>
<tr><td>७.</td><td>कोळशासाठी दिलेले आदेश प्राप्ती यांचा मेळ करणारी योग्य कार्यप्रणाली कंपनीकडे आहे का? आणि कोळसा दर्जा त्यातील ओलसरपणा आणि विलंब आकार इ.ची नोंद लेखा पुस्तकात योग्य प्रकारे केली जाते का?</td><td>होय, कंपनीकडे आदेश दिलेल्या कोळशाची संख्या / दर्जा व त्याची त्याप्रमाणे प्राप्ती यांचा मेळ करण्याची प्रणाली आहे. मात्र सध्याची पध्दत अधिक बळकट करण्याची गरज आहे. कंपनी कोळशाच्या श्रेणीची निश्चित संबधित युनिटस् अंतर्गत रसायन शास्त्रज्ञ यांचेकडून करण्याऐवजी पुरवठाद्वाराच्या बीजकातील नोंदणीप्रमाणे कोळशाचे दायित्व मान्य करते. कोळशाचा दर्जा कमी असल्याचे दावे कोळसा भरण्याचा जागी कंपनीचे प्रतिनिधी व पुरवठादारांचे प्रतिनिधी यांच्या तर्फे संयुक्तपणे व कोळसा खाणीने दिलेला दर्जा याबाबत केले जातात परंतु हे दावे कोळसा पुरवठादाऱ्याने मान्य केलेले नाहीत यामुळे व इतर काराणांमुळे अश्या कंपन्याच्या शिल्लकीत फरक आढळतो.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | तसेच चालू वर्षी महानिर्मितीने करारानुसार कोळशाच्या श्रेणी बाबत कोळसा कंपन्या विरुद्ध ₹ ८०३.३८ कोटीचे दावे दाखल केले. परंतु पुरवठादाऱ्यांनी मालाच्या कमी उचल यासाठी कंपनीवर ₹ ५० कोटीचा दावा लावला कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसल्यामुळे कोणत्याही एका पक्षाचा दावा खरा असण्याच्या निर्णयापर्यंत पोहचणे कठीण आहे. कंपनीने कोळसा पुरवठादाऱ्यांचे दावे आकस्मीत देणी म्हणून उघड केली आहेत. तसेच ह्याच कोळसा पुरवठादाऱ्यांने केलेल्या कामगीरी प्रोत्साहनाच्या दाव्याचा लेखाही कंपनीने केलेला नाही. |
| ८. | राज्य शासनाला देय असलेला विनामुल्य विजेचा वाटा किती आहे, आणि त्याची संमतीच्या करारानुसार हिशेब केला जातो का? आणि तो स्विकारलेल्या लेखा मानकांनुसार लेखामध्ये दाखविण्यात येतो का? | कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, राज्य शासनाच्या कोणत्याही करारानुसार विजेचा विनामुल्य वाटा नाही. |
| ९. | जल विद्युत प्रकल्पांच्या बाबतीत जैविक विविधता जतन करण्यासाठीचे धोरण / सुचना यानुसार पाणी सोडले जाते का? असे जतन केले नाही म्हणून काही दंड भरला / भरावयाचा असेल तर त्याची माहिती द्यावी. | पाणी सोडण्याच्या पध्दतीवर राज्य शासनाची जल संसाधन विभागाचा अंमल आहे. आम्हांस दिलेल्या माहितीनुसार कंपनीची यात काहीही भुमिका नाही. पाणी सोडण्याबाबत कोणताही दंड देणे / दिलेला नाही. |
| १. | स्थिर मत्तांच्या संदर्भात:<br>अ) कंपनीने स्थिर मत्तांच्या संख्यात्मक तपशिल स्थिती यांच्यावर संपूर्ण माहितीचे अभिलेख योग्य प्रकारे जतन केले आहेत फक्त काही ठिकाणच्या थोड्या मत्तांचा याला अपवाद आहे. तेथील स्थिर मत्तांचे प्रत्येक बाबींसह माहिती संकल व संहिताकरण करुन त्याचा स्थिर मत्तांच्या नोंदवही सोबत सुसंगत मेळ करणे ही प्रक्रिया चालू आहे.<br>ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार, कंपनीचे धोरण असे आहे की, तीन वर्षांमध्ये एकदा स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करावी. या वर्षी विश्रामाचे वर्ष असल्याने व्यवस्थापनाने स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणीचे आयोजन केले नाही.<br>क) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि आम्ही केलेल्या अभिलेख्यांच्या पडताळणीनुसार सर्व स्थिर मालमत्ता कंपनीच्या नावे आहेत किंवा नाहीत हे निर्धारित करण्यासाठी टायटल डिड्स मिळवण्याची प्रक्रिया चालू आहे मिळलेल्या माहितीनुसार खालील स्थिर मालमत्तेचे टायटल डिड्स कंपनीच्या नावे नाहीत.<br>१) ४ लेखा युनिट मधील मुक्त जमिनीचा एकुण गट ₹ ४५.६२ कोटी आणि १ लेखा युनिट मधील भाडेपट्टी जमिनीचा एकूण गट ₹ १३१.०२ कोटी आणि निव्वळ गट ₹ १०१.७३ हा अजूनही | याबाबत लेखांचा परिणाम यापूर्वीच पूर्ण केला असला तरी काही जागी रजिस्टर मधील लेखा नोंदणीच्या आधारे स्थिर मत्ता माहिती अद्यावत करण्याचे काम प्रगती पथावर आहे. मत्तांची आधारभूत माहिती सॅप सिस्टिममध्ये अद्यावत केली आहे व सिस्टिममध्ये रजिस्टर पडताळणी करण्यासाठी उपलब्ध आहे.<br><br>चालु वर्षात स्थिर मत्ताचे टायटल डिड कंपनीच्या नावे करण्याचा उपक्रम कंपनी हाती घेईल. |

| | | |
|---|---|---|
| | पुर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या नावे आहेत.<br>२) २लेखा युनिट मधील मुक्त जमिनीचा एकुण गट ₹ ३९५.८८ कोटी हा महानिर्मितीच्या नावे आहे. | |
| २. | कंपनी वस्तुसुचीच्या संदर्भात :<br>अ) आम्हांस दिलेल्या स्पष्टीकरणानुसार कंपनीच्या व्यवस्थापनाने या वर्षी रास्त कालांतराने सुचींची प्रत्यक्ष पडताळणी केली. वस्तुसुचींची ही प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापणाने नेमलेल्या सनदी लेखापाल्यांच्या बाह्य संस्थानी पार पाडली.<br>ब) आम्ही केलेल्या वस्तुसुचींच्या अभिलेखांचे परिक्षण यावरुन कंपनीने वस्तुसुचींचे अभिलेखन योग्य प्रकारे जतन केलेले आहे. वस्तुसुचींच्या या प्रत्यक्ष पडताळणीनंतर त्याचा अभिलेख नोंदीशी तुलना केल्यानंतर दिसलेल्या विसंगतींचे योग्य समायोजन लेखावह्यात योग्य प्रकारे केले आहे. | कंपनी भांडारातील वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी दरवर्षी करते व त्यात विसंगती आढळल्यास त्याचा लेखा केला जातो. |
| ३. | आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३, कलम २खंड (७६) यातील यादीतील कंपन्या, फर्म्स किंवा इतर व्यक्ति संस्था यांना महानिर्मिती कंपनीने कोणतीही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्जे या वर्षी दिलेली नाहीत. यामुळे या संबंधीच्या आदेशातील परिच्छेद -३ मधील खंड (३) (अ) आणि खंड (३) (ब) यात दिलेल्या तरतुदी कंपनीस लागु नाही | कंपनीने कलम १८९ अंतर्गत असलेल्या यादीवरील फर्म्सकडून कोणतेही कर्ज घेतले नाही किंवा त्यांना दिलेले नाही. त्यामुळे संबधित व्यक्ति- संस्था सोबतची प्रकटने करणे कंपनीला लागू होत नाहीत. |
| ४. | आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कर्जे, गुंतवणूक व हमी याबाबतितील, कंपनी अधिनियम २०१३ ची कलमे १८५ व १८६ ची पूर्तता कंपनीने केलेली आहे. | आवश्यक त्या तरतुदीचे पालन झाले आहे. |
| ५. | आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३ ची कलमे ७३ ते ७६ आणि त्या अंतर्गत केलेली नियमावली या तरतुदीच्या अर्थानुसार या कंपनीने जनतेकडून ठेवी स्विकारलेल्या नाहीत. | कंपनीने या वर्षी जनतेकडून ठेवी स्वीकारल्या नाहीत. |
| ६. | केंद्र सरकारने कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४८ (१) अन्वये खर्चाचे अभिलेख जतन करण्याचे विहित केले आहे. आम्ही या संदर्भात कंपनीच्या या अभिलेखाचा स्थुल स्वरुपाने आढावा घेतला आणि आमच्यामते व आम्हांस दिलेही माहिती व स्पष्टीकरणे यानुसार प्रथम दर्शनी असे दिसते की, कंपनीने असे विहित अभिलेखांचे जतन केले आहेत. मात्र हे खर्च अभिलेख अचुक व संपुर्ण आहेत किंवा कसे व ते कंपनी (खर्च लेखा अभिलेखा) नियमावली, २०१४ अंतर्गत दिलेल्या आवश्यकतेनुसार असल्याचे निश्चित करण्याच्या दृष्टीने आम्ही त्याचे परिक्षण केलेले नाही. | कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४८ (१) नुसार कंपनी खर्चाचे अभिलेख जतन करते या अभिलेखांचे लेखापरिक्षण कंपनीने नियुक्त केलेले कॉस्ट ऑडीटर्स करतात. |
| ७. | सांविधिक देणीच्या संदर्भात :<br>अ)आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरुन आणि कंपनीच्या दैनंदिन वह्या व अभिलेख यानुसार सामान्यत: कंपनी ज्यांच्या बद्दल वाद | कंपनी कायदेशीर व संविधिक देणीचा भरणा तत्परतेने करते फक्त वादग्रस्त कर बाबींचा अपवाद केला जातो. |

<table>
<tr><td></td><td>नाही अशी पुढील सांविधिक देणी नियमीतपणे भरते भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा आयकर, संपत्तीकर , विक्रीकर, सेवाकर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, मुल्यवर्धिक कर, उपकर, आणि अन्य कोणतीही सांविधिक देणी योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडे जातात. आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे नुसार भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा आयकर, संपत्ती कर, विक्रीकर, सेवाकर, सीमा शुल्क ,उत्पादन शुल्क मुल्य वर्धीत कर उपकर,भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा यांची वाद नसलेली देणी दि. ३१ मार्च २०१६ रोजी देण्यात तारखेपासून सहा महिन्यापेक्षा जास्त काळ थकीत नव्हती.<br>ब) आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे या नुसार आयकर,विक्रीकर, सेवाकर, सीमाशुल्क मुल्य वर्धीत कर आणि उपकर यांची खालील अपवाद वगळता कोणतीही वादग्रस्त देणी देय नाही.
<table>
<tr><th>संविधानाचे नाव</th><th>देण्याचे स्वरुप</th><th>रक्कम (₹ कोटीमध्ये)</th><th>रक्कमेचा संबधीचा कालावधी</th><th>प्रलंबित असलेल्या मंचाचे नाव</th></tr>
<tr><td>आयकर अधिनियम</td><td>दंड (₹११३.५१ कोटी)</td><td>५०.३८</td><td>निर्धारण वर्ष २००६-०७</td><td>आय. टीए. टी मुंबई (विभागाने केलेल अपील्स)</td></tr>
<tr><td>आयकर अधिनियम</td><td>दंड (₹१०७.३२ कोटी)</td><td>१०७.३२</td><td>निर्धारण वर्ष २००७-०८</td><td>आय. टीए. टी मुंबई (विभागाने केलेले अपील्स)</td></tr>
<tr><td>आयकर अधिनियम</td><td>सेवाकराची स्त्रोतापाशी कपात करणे</td><td>०.०९</td><td>निर्धारण वर्ष २००९-१०</td><td>आय.टी.ए.टी पुणे खंडपीठ</td></tr>
<tr><td>केंद्रीय उत्पादन शुल्क</td><td>जुळणीकेलेल्या रचनेच्या अधिनियम पोलादी साहित्यावर लावलेले शुल्क</td><td>३.०१</td><td>१९९१-९२ ते १९९४-९५</td><td>सी.ई.एस.टी.ए. टी. मुंबई</td></tr>
<tr><td>केंद्रीय विक्रीय अधिनियम</td><td>मुल्य वर्धित कर</td><td>०.३५</td><td>२००५-०६</td><td>विक्रीकर आयुक्त (अपील्स) नागपूर</td></tr>
</table>
</td><td></td></tr>
<tr><td>८.</td><td>आमच्या मते तसेच आम्हांला दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्थेचे देण्याची परतफेड थकवलेली नाही. कंपनीने कर्ज रोखे स्वरुपात कोणतेही कर्जाऊ रक्कम घेतलेली नाही.</td><td>सामन्यता कंपनी देणी सेवा मध्ये तत्पर असते.</td></tr>
<tr><td>९.</td><td>कंपनीने इनिशिअल पब्लिक ऑफर किंवा पुढील पब्लिक ऑफर (कर्ज साधने समावेश) आणि मुदत कर्ज याव्दारे कोणताही पैसा उभा केला नाही.त्यानुसार संबधीत आदेशा मधील परिच्छेद ३(९) लागू नाही.</td><td>कंपनीने इनिशिअल पब्लिक ऑफर ने कोणताही पैसा उभारला नाही.</td></tr>
<tr><td>१०.</td><td>आमचे सर्वोतपरी ज्ञान व विश्वास तसेच आम्हांस दिलेली माहिती व</td><td>कंपनीमध्ये दक्षता व सुरक्षा यासाठी एक वेगळी शाखा आहे</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | स्पष्टीकरणे यावरुन या वर्षांच्या काळात कंपनीकडून किंवा कंपनीबाबत त्यांच्या अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडून लबाडी झाल्याचे दिसून आलेली नाही, किंवा तसा कोणताही अहवाल आलेला नाही. | आणि कंपनीस यावर्षी कोणतीही लबाडी झाल्याचे दिसून आलेले नाही. |
| ११. | आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार ही एक सरकारी कंपनी असल्यामूळे, भारत सरकारने जारी केलेली अधिसूचना क्रमांक जी एस आर ४६३ (ई) दि ५ जून २०१५, या नुसार संबंधीत अधिनियमाचे कलम १९७ मधील तरतुदी या कंपनीला लागू होत नाही. | कंपनीस लागू नाही. |
| १२. | आमच्या मते व आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, हि कंपनी निधी कंपनी नाही. त्यामुळे संबंधीत आदेशाचे खंड (१२) कंपनीला लागू होत नाही. | कंपनी निधी कंपनी नाही. |
| १३. | आम्हाला दिलेल्या माहितीव स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या अभिलेख्यांच्या पडताळणीनुसार संबंधीत संस्थाशी व्यवहार हा कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १७७ व १८८ चे पालन करतो. संबंधीत संस्थातील व्यवहाराचा तपशील वित्तीय विवरणपत्रकात लेखा मानकाच्या मान्यतेनुसार उघड केलेले आहे. | कंपनीने संबंधीत संस्थेशी केलेला व्यवहार उघड केला आहे. |
| १४. | आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या अभिलेख्यांच्या पडतळणीनुसार या वर्षी कंपनीने कोणतेही पसंती वाटप किंवा खाजगी स्थान असलेले शेअर्स किंवा पूर्णत: किंवा अंशत: परिवर्तननीय ऋण विमोचन पत्र (डिबेंचर्स)दिलेली नाहित. त्यानुसार या आदेशचा खंड (१४) लागु होत नाही. | आदेशाचा खंड १४ लागू नाही. |
| १५. | आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या अभिलेख्यांच्या पडताळणीनुसार कंपनीने, कंपनी अधिनियम,२०१३ कलम १९२ नुसार संचालक किंवा त्यांच्याशी संबंधीत व्यक्तीशी कोणतेही रोख व्यवहार केलेला नाही. त्यानुसार या आदेशाचा खंड (१५) कंपनीला लागू होत नाही. | आदेशाचा खंड १५ लागू नाही. |
| १६. | कंपनीला, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ कलम ४५-आय ए नुसार नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. | लागु नाही. |

## संचालकांचे अहवालाचे जोडपत्र - ५

## सेक्रेटेरीयल लेखापरिक्षण अहवाल

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम २०४ (१) आणि कंपन्याची नियमावली २०१४ यातील नियम क्र. ९ (व्यवस्थापकीय कर्मचारी वृंदाची नियुक्ती व परिश्रमिक) यानुसार
३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वित्तिय वर्षासाठी.

प्रती,
मा. सदस्य,
महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी लि.
प्रकाशगड, भूखंड जी-९,
प्रा. अंनत काणेकर मार्ग, वांन्द्रे (पूर्व),
मुंबई - ४०००५१.

महोदय,
मी अजित वाय. साठे, मालक ए. वाय. साठे अँड कंपनी आणि व्यावसायिक कंपनी सेक्रेटरी, मुंबई, आपणास नमुद करतो की, मी **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. (सीआयएन - यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)** (यापुढील मजकुरात हिचा उल्लेख कंपनी असा केला आहे.) याकंपनी कडून तिला लागु होणाऱ्या सांविधिक तरतूदीचे पालन आणि कंपनी व्यवसायाला धरुन राहण्याची निष्ठा यासाठी सेक्रेटेरीयल ऑडीट केले. या कंपनीच्या व्यावसायिक वर्तनाचे/ सांविधिक अनुपालनाचे मुल्यांकन करण्यासाठी मला योग्य आधारतत्व मिळावे आणि त्यावर अभिप्राय द्यावा या प्रकारे मी हे परिक्षण केले.

मी कंपनीची लेखा वह्या – पुस्तके, कागदपत्र, इतिवृत्त नोंदणीच्या वह्या, प्रपत्रे आणि कंपनीने दाखल केलेली विवरणपत्रे व इतर अभिलेख नोंदी यांची पडताळणी केली. तसेच कंपनी आणि तिचे अधिकारी, अधिकृत प्रतिनिधी, आणि एजंट यांनी मला माहिती दिली. त्या सर्वांच्या आधारे मी, अहवाल देतो की, या परिक्षणाच्या कालावधीत म्हणजे दि. ३१ मार्च २०१६ (परिक्षण कालावधी) रोजी संपलेल्या वित्तिय वर्षात, महानिर्मिती कंपनीने येथे खालील यादीमध्ये नमुद केलेल्या सांविधिक तरतूदींची पूर्तता केलेली आहे. तसेच या कंपनीकडे योग्य प्रकारची मंडळ – प्रक्रीया आहे आणि त्या मर्यादेत आणि कार्यपध्दतीत अनुपालन करण्याची यंत्रणा अस्तित्वात आहे आणि ती खालील अहवालाच्या अधीन आहे.

या कंपनीने ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वित्तिय वर्षसाठी जी लेखा पुस्तके – वह्या, कागदपत्र, इतिवृत्त नोंद वह्या, प्रपत्रे विवरणे आणि अन्य अभिलेखांचे जतन केली आहेत, त्याचे मी, पुढील कायदे व नियामके आदिच्या तरतुदीनुसार परिक्षण केले :-

१. कंपनी अधिनियम २०१३ (हा कायदा), कंपनी अधिनिमय १९५६ (लागु होणाऱ्या मर्यादे पर्यंत) आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमावली.
२. दि सिक्युरीटीज कॉंट्रक्ट (रेग्युलेशन) अक्ट १९५६ आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमावली, (मात्र ही कंपनी पब्लीक लिमिटेड कंपनी असल्याने तिला लागू नाहीत).
३. दि डिपॉझीटरी ॲक्ट १९९६, त्याची नियमावली आणि उप-निधी (कंपनीचे शेअर्स प्रत्यक्ष स्वरुपात असल्याने लागू नाही.)
४. परकीय चलन व्यवस्थापन अधिनियम १९९९ आणि परदेशी थेट गुंतवणूक, परकीयांची थेट गुंतवणूक आणि बाहय देशातून केलेले

वाणिज्यक स्वरुपात उसनवारी (कंपनीला लागू नाहीत.)

५. सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया कायदा १९९२ (सेबी कायदा), यातील खालील नियामके आणि मार्गदर्शक सुचना या महानिर्मिती कंपनी ही पब्लीक लिमिटेड कंपनी असल्याने तिला लागू नाहीत.

ए) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर्स संपादन व ताब्यात घेणे) नियामके २०११.

बी) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (प्रोहीबिशन ऑफ इनसायडर ट्रेडींग) रेग्युलेशन्स २०१५.

सी) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (भांडवल देणे व प्रकटने यांच्या आवश्कता) नियमने २००९

डी) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सुची बंधने आणि आवश्यक प्रकटने) नियम २०१५.

इ) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (एम्प्लॉयी स्टॉफ ऑप्शन स्कीम अँड एम्प्लॉयी स्टाफ परचेस स्किम गाईड लाईन १९९९) आता त्यांचे नाव दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर्स बेस्ड एम्प्लॉयी बेनिफिट रेग्युलेशन २०१४) आणि दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर्स बेस्ड एम्प्लॉयी बेनिफिट ॲमेडमेंट रेग्युलेशन २०१५)

एफ) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (कर्जे व प्रतिभूत देणे व त्याचे लिस्टींग करणे)

जी) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (रजिस्टर टू ॲन इशू अँड शेअर ट्रान्सफर एजंट्स) रेग्युलेशन १९९३ – कंपनी अधिनियम व अशील सोबत व्यवहार या संबंधी

एच) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (डीलिस्टींग ऑफ एक्सचेंज ऑफ शेअर्स) रेग्युलेशन २००९ आणि

आय) दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (बाय बँक ऑफ सिक्युरिटीज) रेग्युलेशन १९९८.

६. कंपनीस स्पष्टपणे लागू होणारा इतर कायद्याच्या संदर्भात खाली नमुद केलेले इतर कायदे निश्चितपणे लागू होतात.

**विद्युत अधिनियम २००३ :-**

मी खालील बाबींच्या लागू होणाऱ्या खंडाच्या पूर्ततेचेही परिक्षण केले :-

१. इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया यांनी जारी केलेले सेक्रेटरीयल मानके (**०१ जुलै २०१५ पासून लागू**)

२. कंपनीने बी एस इ लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि. यांचे सोबत यादीवर घेण्याबाबतचे (लिस्टींग) करार (**हे करार ऑडीट कालावधी मध्ये लागू नव्हते. कारण कंपनी पब्लिक लिमिटेड आहे.**)

आढावा वर्षात कंपनीने उपरोक्त कायदे नियमावली, नियमाके, मार्गदर्शक सूचना, मानके, इ. ची पूर्तता केली असून ती खालील निरिक्षणे/ पूर्तता न होणे याच्या अधीन आहे :-

**कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत :-**

- कायद्यानुसार दोन स्वतंत्र संचालक असणे आवश्यक असताना कंपनीकडे एकच स्वतंत्र संचालक आहे. त्यामुळे लेखा परिक्षण समिती, नाम निर्देशन आणि परिश्रमिक समिती यांची रचना योग्य नाही. स्वतंत्र संचालकाचे कार्यालयातील रिक्त जागा अद्याप भरलेली नाही.
- दि. ०१ एप्रिल २०१५ ते ९ डिसेंबर २०१५ पर्यंत, कंपनीने मुख्य वित्त अधिकारी नियुक्त केला नव्हता.
- वित्तिय वर्ष २०१५-१६ करिता अंतर्गत लेखा परिक्षक यांची नियुक्ती करण्यासाठी एम जी टी -१४ हा फॉर्म कंपनीतर्फे अद्याप भरावयाचा

आहे.

मी, माझ्या ऑडीटच्या कालावधीत कंपनीने दिलेली माहिती / आणि अभिलेख यावर विसंबून होतो. आणि माझा अहवाल त्या मर्यादित आहे.

**यापुढे मी खालील प्रमाणे अहवाल देत आहे :-**

कंपनीच्या संचालक मंडळाची रचना योग्य प्रकारे केली आहे. त्यात कार्यकारी संचालक, अ-कार्यकारी संचालक आणि स्वतंत्र संचालक यांच्या योग्य समतोल साधला आहे. *फक्त वरती नमुद केलेले निरिक्षण वगळता.* या कालावधीत संचालक मंडळाच्या रचनेमध्ये करण्यात आलेले बदल हे कायद्यातील तरतूदीनुसार करण्यात आले आहेत.

सर्व संचालकांना मंडळाच्या बैठकीचे वेळापत्रक, कार्यक्रम पत्रिकेवर आणि त्यावरील विषयाबाबत तपशीलवार टिपा या, बैठकीचे किमान सात दिवस आधी पाठविण्यात आल्या होत्या. तसेच कार्यक्रम पत्रिकेवरी विषयांबद्दल अधिक माहिती व स्पष्टीकरणे मंडळाच्या बैठकीपूर्वी देण्यासाठी आणि अर्थपूर्ण याची व्हावी यासाठी दक्ष असलेली कार्यपध्दती या कंपनीस प्रभावीरीत्या अस्तित्वात आहे.

निर्णय हे बहुमताने घेतले जातात आणि काही सदस्याची असहमती दर्शक मते जर असली तर ती विचारात घेतली जातात. त्यांची नोंद इतिवृत्तात करण्यात येते.

**मी, यापुढे अहवाल देतो की :** कंपनीस लागू होणारे कायदे, नियमावली नियामके आणि मार्गदर्शक सूचना यांच्या अनुपालनाची खातर जमा करणारी आणि कंपनीच्या आकारमानाशी आणि प्रवर्तनाशी अनुरुप असलेली प्रणाली व कार्यपध्दती पुरेशा प्रमाणात आहे.

**मी यापूढे अहवाल देतो की :** महानिर्मिती कंपनी ही मराविमं सुत्रधारी कंपनीच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे. आणि मराविमं सुत्रधारी कंपनी ही संपूर्णत: महाराष्ट्र शासनाच्या मालकीची संस्था आहे आणि शासन हक्काच्या तत्वावर दर्शनी ₹ १० /- प्रत्येकी या किमतीचे समभाग काढून देण्यात आलेले आहेत. त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| वाटणी दिल्याची तारीख | शेअर्सची संख्या | स्वरुप | शासन निर्णय क्र. |
|---|---|---|---|
| ३०/०४/२०१५ | १८३९९५४८९ | रोख | समभाग / २०१४/पी आर के-९/ एनर्जी ३/दि. १०/०६/२०१४ |
| २१/०७/२०१५ | ७४६३१६३०० | रोख | संकीर्ण २०१५/ पी आर के-६३/ एनर्जी-३/दि. १८/०५/२०१५ |
| ३१/०३/२०१६ | १५११०७६०४३५ | रोख व्यतिरीक्त | शासन निर्णय क्र. २०१०पी आर के-११७/ एनर्जी ३/ दि.३१/०३/२०१६ |

**मी, यापुढे अहवाल देतो की :** परिक्षणाच्या कालावधीत या कंपनीने कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १८० (१) (सी) अनुसार दि. १ जून २०१५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधरण सभेमध्ये एक विशेष ठराव मंजूर केला. त्या ठरावानुसार कर्जे – उसनवारी याची मर्यादा रु. ५०,००० कोटी पर्यंत वाढविण्यात आली आहे.

मी, यापुढे अहवाल देतो की: या परिक्षणाच्या कालावधीत पुढील प्रकार घडलेले नाहीत :-

१. सार्वजनिक/प्राधान्याने शेअर्स / ऋणपत्रे/स्वेट इक्विटी इ. वाटप

२. प्रतिभूती /विमोचन/पूनर्खरेदी.

३. विलीनीकरण/ एकत्रीकरण/ पूनर्रचना इ.

४. परदेशीय तांत्रिक सहयोग करणे

**ए. वाय.साठे अँड कं. यांचे करिता**
कंपनी सेक्रेटरीज

सी एस अजित साठे
मालक
एफ सी एस न. २८९९ सी ओ पी न. ७३८

स्थळ : मुंबई,
दि. २८/१०/२०१६
हा अहवाल आमचे समान तारखेचे पत्र या सोबत वाचावा. हे पत्र जोडपत्र १ येथे दिले असून ते या अहवालाचा अविभाज्य भाग आहे.

## जोडपत्र – १

प्रति,
मा. सदस्य
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि
प्रकाशगड, भूखंड क. जी – ९,
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०००५.

आमचा समान तारखेच्या अहवाल या पत्रासोबत वाचण्यात यावा

१. सेक्रेटरीयल संबंधित कामाचे अभिलेख जतन करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या अभिलेखांचे परिक्षण करुन त्या आधारे अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

२. सेक्रेटरीयल संबंधित अभिलेखामधील आशय अचूक असल्याची हमी मिळविणे या हेतुसाठी आम्ही परिक्षणाच्या कार्यपध्दती व प्रक्रीया यांचे अनुसरण केले. या अभिलेखात दर्शविलेल्या बाबींची वस्तूनिष्ठता अचूक असल्याची खात्री मिळावी म्हणून आम्ही प्रायोगिक तत्वांवर पडताळणी केली. आम्ही अनुसरलेल्या प्रक्रीया व पध्दती या आमची मते तयार करण्यासाठी पुरेसा व योग्य प्रमाणात तत्वाधार देतात असा आमचा विश्वास आहे.

३. या कंपनीचे वित्तिय अभिलेख आणि लेख्यांची वह्या- पुस्तके यातील अचुकता व योग्यता यांची आम्ही तपासणी/ पडताळणी केलेली नाही.

४. जेथे आवश्यकता आहे तेथे, कायदे, नियमावली, नियामक व घडलेल्या घटना इत्यादी. यांच्या पूर्तते बद्दल आम्ही व्यवस्थापनाची निवेदने मिळविली आहेत.

५. कंपनी कायदा आणि इतर लागु होणारे कायदे, नियम, मानके इ. यातील तरतूदींची पूर्तता करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. आमचे परिक्षण या प्रक्रीयांची प्रायोगिक तत्वावर पडताळणी करणे यासाठी मर्यादित आहे.

६. हे सेक्रेटेरीयल ऑडीट म्हणजे कंपनीच्या भविष्यातील जीवन क्षमता याची हमी नाही किंवा कंपनीच्या व्यवस्थापनातर्फे तिचे व्यवहार किती कार्यक्षमतेने अथवा प्रभावीपणे करते आहे या बद्दलचे आश्वासन नाही.

**ए.वाय.साठे अँड कं. यांचे करिता**
कंपनी सेक्रेटरीज

सी एस अजित साठे
मालक
एफ सी एस न. २८९९ सी ओ पी न. ७३८

स्थळ : मुंबई,
दि. २८/१०/२०१६

## भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी, कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (ब) नुसार महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या वित्तिय विवरणपत्रावर दिलेले अभिप्राय.

कंपनी अधिनियम २०१३ यात विहित केलेल्या वित्तिय अहवाल देण्याच्या कृतीबंधानुसार **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि**. मुंबई या कंपनीचे **दि. ३१ मार्च २०१६** रोजी संपलेल्या वर्षाचे वित्तिय विवरण पत्रे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी या अधिनियमाच्या कलम १३९ (५) अंतर्गत नियुक्त केलेले संविधिक लेखापरिक्षक हे या अधिनियमाच्या कलम १४३ नुसार, या अधिनियमाच्या कलम १४३ (१०) यात विहित केलेल्या लेखा मानकांशी सुसंगत पध्दतीने केलेल्या स्वतंत्र लेखापरिक्षणाच्या आधारे या वित्तिय विवरण पत्रावर अभिप्राय देण्यास जबाबदार आहेत. **त्यांनी हे कार्य पार पाडल्याचे त्यांचा लेखा परिक्षण अहवाल दि. ०३ सप्टेंबर २०१६ नुसार दिसुन येते.**

मी भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक याच्यांवतीने अधिनियमाच्या कलम (१४३) (६) (अ) याप्रमाणे, **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि. च्या ३१ नार्च २०१६** रोजी संपलेल्या वर्षाचे पूरक लेखापरिक्षण केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रणे आणि सांविधिक लेखा परिक्षक यांचेकडील कामाची कागदपत्रे न मिळविता मुख्यत्त्वे केले आहे. या लेखापरिक्षकांकडे तसेच कंपनीच्या संबंध कर्मचारी वृंदाकडे चौकशी करणे आणि काही लेखांच्या दस्तऐवजाचे निवडक परिक्षण करणे या मर्यादेत करण्या आलेले आहे. या माझ्या पुरक अहवालाच्या आधारे, मला कंपनी अधिनियमाच्या कलम १४३ (६) (ब) नुसार, माझ्या लक्षात आलेल्या बाबींकडे लक्ष वेधू इच्छिते कारण माझ्या मते कंपनीची वित्तिय विवरणपत्रे व संबंधित लेखापरिक्षण अहवाल योग्यप्रकारे समजावून घेण्यासाठी ते आवश्यक आहे,

१. **नफ्या विषयी अभिप्राय :**

**१. इतर उत्पन्न (टिपा क्र. १६)**

**भाडे यांपासून मिळणारे उत्पन्न ₹ ६.४३ कोटी**

वरील उत्पन्नामध्ये भारतीय विद्या भवन यांनी नोव्हेंबर २०१५ ते ऑक्टोबर २०१६ या काळासाठी दिलेल्या ₹ २० लाख या शाळेच्या इमारतीच्या भाड्यामध्ये ₹ ११.६७ लाख हे वित्तिय वर्ष २०१६-१७ शी संबंधित आहेत. (औष्णिक विद्युत केंद्र कोराडी) यांमुळे इतर उत्पन्नाचे ज्यादा विवरण ₹ ११.६७ लाख यांनी झालेले असून चालू दायित्वाचे तेवढ्याच कमी प्रमाणात विवरण झालेले आहे.

**खर्च :**

**वापरलेल्या मालाच्या खर्च (टिपा क्र. १७)**

**२. तेल - ₹ ११७.९४ कोटी**

वरील खर्चामध्ये मेसर्स एचपीसील, मेसर्स बीपीसील आणि मेसर्स आयओसील या कंपन्याना त्यांना उशिरा देयकांचा परतावा मिळाल्यामुळे व्याजापोटी मागणी केलेल्या ₹ १२८२ लाख इतक्या रक्कमेच्या समावेश नाही. संबंधित देयके ही लाइट डिझेल ऑईल, फरनेस ऑईल आणि हाय स्पिड डिझेल हे औष्णिक केंद्रांना वित्तिय वर्ष २०१५-१६ मधिल खरेदिशी संबधित आहेत व त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | ऑईल कंपनीचे नाव | मागणी केलेली रक्कम |
|---|---|---|
| १ | मे. एचपीसीएल | ₹ ७२० लाख |
| २ | मे. बीपीसीएल | ₹ ३८५ लाख |
| ३ | मे. आयओसीएल | ₹ १७७ लाख |
| | एकूण | ₹ १२८२ लाख |

वरील मागणी केलेल्या रक्कमेचा लेखांमध्ये अंतर्भाव न केल्यामुळे मालाचा खर्चाचे विवरण व तोट्याचे विवरण वित्तिय वर्ष २०१५-१६ करिता रु. १२८२ लाख एवढ्या रक्कमेने कमी झालेले आहे.

**३. कर्मचारी लाभ खर्च (टिप क्र. १८)**

**वेतन, भत्ते, बोनस इत्यादि. ₹ ९४४.३० कोटी.**

यांमध्ये निवृत्त/ मृत कर्मचारी यांच्या रजा रोखीकरणासंबंधी ₹ ३७.१५ लाख इतक्या रक्कमेची अतिरिक्त नोंद झालेली आहे. सदर रक्कम ही वित्तिय वर्ष २०१५-१६ मध्ये औष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर येथे कर्मचाऱ्यांना अगोदरच दिलेली आहे. यामुळे कंपनीच्या तोट्यांची नोंद व खर्चापोटी केलेली तरतूद ही ₹ ३७.१५ लाख इतक्या रक्कमेनी अतिरिक्त झालेली आहे.

**४. कायदे व व्यवसाय विषयक खर्च ₹ ८ कोटी**

यांमध्ये औष्णिक विद्युत केंद्र, नाशिक येथील वकीलांच्या देयकांपोटी देय असलेल्या ₹७.८४ लाख इतक्या रक्कमेचा अंतर्भाव नाही.

वकीलांच्या देयकांची एकूण दायित्व हे ₹ ७७.१२ लाख इतके होते पण कंपनीने यांपैकी ₹६९.२८ लाख इतक्या रक्कमेचीच नोंद लेखापुस्तकांमध्ये केली. यांमुळे कायदे व व्यवसायिकांविषयी खर्चाचे आणि व्यापार देणी यांची नोंद ₹ ७.८४ लाख इतक्या रक्कमेनी कमी झाली.

**२. वित्तीय स्थितीवर अभिप्राय**

**५. चालु मत्ता :**

**अ) वस्तुसुची टिपा क्र. ११**

**कच्चा माल**

**कोळसा ₹ १०२३.४६ कोटी**

औष्णिक विद्युत केंद्र कोराडी येथील कोळसा विभागाच्या नोंदीप्रमाणे वर्षाअखेरीचा कोळसासाठा हा ४६२५३१.३१७ मेट्रीक टन इतका असून त्याची किंमत ₹ १४३.०९ कोटी इतका होता परंतु लेखापुस्तकामध्ये हा कोळसासाठा ₹१४३.३४ इतक्या मुल्याचा दर्शविण्यात आला आहे परिणामी वर्षाअखेरीचा कोळसासाठा हा ₹२५.२३ लाख इतक्या रक्कमेने वाढीव दर्शविण्यात आला आहे आणि तोटा तेवढ्याच प्रमाणात कमी दर्शविण्यात आला आहे.

**३. प्रकटीकरणावरील अभिप्राय :**

**वित्तिय निवेदनावरील टिपा (एकत्रित)**

**दि. ३१ मार्च २०१६ अखेरीस वित्तिय निवेदनातील महत्त्वाची लेखा धोरणा आणि लेखावरील टिपा :**

**अ) उत्पन्नाची मान्यता :**

महानिर्मिती व महावितरण या कंपन्याना नियंत्रित करणाऱ्या एमएससीबी कंपनीने महानिर्मिती कंपनीस महावितरण कंपनीकडून ३१-०७-२०१५ या दिवशीच्या प्रलंबित मुद्दलावर आकारलेल्या व्याजातून सूट देण्याचे आदेश संचालक मंडळाच्या दि. २७-०८-२०१५ निर्णय क्र.४५० अन्वये दिलेले आहेत. म्हणून कंपनीने तिच्या येणी रक्कममध्ये असलेल्या आणि कंपनीस पूर्णपणे न मिळालेल्या प्रलंबित आकाराचे ₹ २६३८.२७ कोटी (₹ १०३९.२६ कोटी वित्तीय वर्ष २०१५-२०१६ करिता) इतक्या रक्कमेचे प्रकटीकरण करणे आवश्यक होते.

**भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक**
**यांचेसाठी व त्यांच्यावतीने**

स्थळ : मुंबई
दिनांक : २ डिसेंबर, २०१६

**प्रधान महालेखापाल**
**(लेखापरिक्षण) - ३**

## सरकारी लेखापरिक्षणातील परिच्छेदाना उत्तरे

| | अंतिम लेखा परिक्षणाची अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर | सांविधिक लेखापरिक्षकांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | **नफ्या विषयी अभिप्राय :**<br>**१. इतर उत्पन्न (टिपा क्र. १६)**<br>**भाडे यांपासून मिळणारे उत्पन्न ₹६.४३ कोटी**<br>वरील उत्पन्नामध्ये भारतीय विद्या भवन यांनी नोव्हेंबर २०१५ ते ऑक्टोबर २०१६ या काळासाठी दिलेल्या ₹ २० लाख या शाळेच्या इमारतीच्या भाड्यामध्ये ₹११.६७ लाख हे वित्तिय वर्ष २०१६-१७ शी संबंधित आहेत. (औष्णिक विद्युत केंद्र कोराडी) यांमुळे इतर उत्पन्नाचे ज्यादा विवरण ₹११.६७ लाख यांनी झालेले असून चालू दायित्वाचे तेवढ्याच कमी प्रमाणात विवरण झालेले आहे. | कंपनी त्यात्या वर्षाचे उत्पन्न त्याच वर्षीच्या लेख्यांमध्ये नोंदवत असते. चालु आर्थिक वर्षामध्ये कंपनीने ₹१०३.६४ कोटीचे इतर उत्पन्न नोंदविले आहे. परंतु नोव्हेंबर २०१५ ते ऑक्टोबर २०१६ या कालावधी करिता मिळालेले ₹ २० लाख उत्पन्नापैकी ३१-०३-२०१६ पर्यंतची अंशत: रक्कम या वर्षीच्या लेख्यांमध्ये नोंदवावयास हवी होती. परंतु नजरचुकिने पुर्ण रक्कम या आर्थिक वर्षात नोंदवली गेली. परिणामी ₹११.६७ लाखाचे उत्पन्न जास्त नोंदले गेले. तथापी कंपनीच्या ₹१९३९७.०६ कोटी इतक्या एकुण उत्पन्नाचा विचार करिता, वरील नोंदीमुळे विशेष परिणाम दिसत नाही. | कंपनी पुढील वर्षात या ₹ ११.६७ उत्पन्नाच्या चुकीची दुरुस्ती करणार आहे. तसेच कंपनीचे एकुण ₹१९३९७.०६ कोटी उत्पन्न विचारात घेता, ₹११.६७ लाखाची नोंद विशेष परिणामकारक नाही. |
| | **खर्च :**<br>**वापरलेल्या मालाच्या खर्च (टिपा क्र. १७)**<br>**२. तेल - ₹११७.९४ कोटी**<br>वरील खर्चामध्ये मेसर्स एचपीसील, मेसर्स बीपीसील आणि मेसर्स आयओसील या कंपन्याना त्यांना उशिरा देयकांचा परतावा मिळाल्यामुळे व्याजापोटी मागणी केलेल्या ₹१२८२ लाख इतक्या रक्कमेच्या समावेश नाही. संबंधित देयके ही लाइट डिझेल ऑईल, फरनेस ऑईल आणि हाय स्पिड डिझेल हे औष्णिक केंद्रांना वित्तिय वर्ष २०१५-१६ मधिल खरेदिशी संबधित आहेत व त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | तेल कंपन्यानी मागणी केलेल्या रक्कमे बाबत तडजोड करण्यासाठी कंपनी पाठपुरावा करीत होती. याबाबत अंतिम निर्णय सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात झाला व ₹ १२.८२ कोटी पैकी ₹ ९.२५ कोटी इतकीच रक्कम देय ठरविण्यात आली. परिणामी अंतिम निर्णय व रकमेचे प्रदान सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात करण्यात आलेने, त्याची लेखा नोंद सन २०१६-१७ मध्ये करण्यात आली. | एचपीसीएल, बीपीसीएल आणि आयओसिएल या कंपनी कडुन खरेदी करण्यात आलेल्या तेलांवरील व्याजाबाबत कंपनीला साशंकता होती. ₹१२.८२ कोटी पैकी ₹ ९.२५ कोटी इतकीच रक्कम अंतिमत: ठरवण्यात आली. या रक्कमेबाबत निर्णय सन २०१६-१७ मध्ये घेण्यात आलेने कंपनीने त्याची लेखानोंद २०१६-१७ या आर्थिक वर्षात केली. |

<table>
<tr>
<td></td>
<td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>ऑईल कंपनीचे नाव</th><th>मागणी केलेली रक्कम</th></tr>
<tr><td>१</td><td>मे. एचपीसीएल</td><td>₹ ७२० लाख</td></tr>
<tr><td>२</td><td>मे. बीपीसीएल</td><td>₹ ३८५ लाख</td></tr>
<tr><td>३</td><td>मे. आयओसीएल</td><td>₹ १७७ लाख</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>₹ १२८२ लाख</td></tr>
</table>
वरील मागणी केलेल्या रक्कमेचा लेखांमध्ये अंतर्भाव न केल्यामुळे मालाचा खर्चाचे विवरण व तोट्याचे विवरण वित्तिय वर्ष २०१५-१६ करिता ₹ १२८२ लाख एवढ्या रक्कमेने कमी झालेले आहे.
</td>
<td></td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>३. कर्मचारी लाभ खर्च (टिप क्र. १८)<br>वेतन, भत्ते, बोनस इत्यादि. ₹ ९४४.३० कोटी.<br>यांमध्ये निवृत्त/मृत कर्मचारी यांच्या रजा रोखीकरणासंबंधी ₹ ३७.१५ लाख इतक्या रक्कमेची अतिरिक्त नोंद झालेली आहे. सदर रक्कम ही वित्तिय वर्ष २०१५-१६ मध्ये औष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर येथे कर्मचाऱ्यांना अगोदरच दिलेली आहे. यामुळे कंपनीच्या तोट्यांची नोंद व खर्चापोटी केलेली तरतूद ही ₹ ३७.१५ लाख इतक्या रक्कमेनी अतिरिक्त झालेली आहे.</td>
<td>कंपनीमध्ये निवृत्त कर्मचाऱ्यांच्या रजेचे रोखीकरणाबाबत लेखा तरतुद नियमितपणे करण्यात येते. चालु आर्थिक वर्षात कंपनीने ₹ १०.८८ कोटी इतकी तरतुद केली परंतु नजरचुकीने यापैकी ₹ ३७.१५ लाख इतक्या रकमेची तरतुद झाली. तथापी कंपनीचा एकुण कर्मचारी खर्च ₹ १२६८.३४ कोटी विचारात घेता, ₹ ३७.१५ लाख ही रक्कम विशेष परिणामकारक नाही.</td>
<td>कंपनी व्यवस्थापनाने दिलेल्या उत्तराशी आम्ही सहमती दर्शवितो यास्तव कोणतेही अतिरिक्त अभिप्राय देण्याची आवश्यकता नाही.</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>४. कायदे व व्यवसाय विषयक खर्च ₹ ८ कोटी<br>यांमध्ये औष्णिक विद्युत केंद्र, नाशिक येथील वकीलांच्या देयकांपोटी देय असलेल्या ₹ ७.८४ लाख इतक्या रक्कमेचा अंतर्भाव नाही.<br>वकीलांच्या देयकांची एकूण दायित्व हे ₹ ७७.१२ लाख इतके होते पण कंपनीने यांपैकी ₹६९.२८ लाख इतक्या रक्कमेचीच नोंद लेखापुस्तकांमध्ये केली. यांमुळे कायदे व व्यवसायिकांविषयी खर्चाचे</td>
<td>प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अखेरीस, त्यावर्षीच्या देय असलेल्या देण्याबाबत कंपनी लेखा तरतुद करते. त्या अनुषंगाने कंपनीने या वर्षी देखील ₹३,८०४८,७९४ इतकी तरतुद केलेली आहे, ज्यामध्ये ₹ ६९,२८,५९७ इतकी तरतुद वकीलांच्या मानधनाबाबत समाविष्ठ केलेली आहे. यावर्षीचे लेखे अंतिम करताना कंपनीकडे असणाऱ्या माहितीच्या आधारे सदर तरतुद केलेली आहे. परंतु ₹ ७,८४,१३० इतकी तरतुद लेख्या मध्ये</td>
<td>कंपनीचे लेखापरिक्षण हे निवडक व्यवहारांची चाचणी करुन केले जाते. या चाचणी मध्ये सदरील व्यवहार समाविष्ठ नव्हता.</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | आणि व्यापार देणी यांची नोंद ₹ ७.८४ लाख इतक्या रक्कमेनी कमी झाली. | समाविष्ठ नाही असे आढळले. तथापी कंपनीच्या ₹१७६१८.८६कोटी इतक्या एकुण खर्चाच्या विचार करिता ₹ ७.८४ लाखाची तरतुद परिणाम कारक दिसत नाही. | |
| २. | **वित्तीय स्थितीवर अभिप्राय**<br>**५. चालु मत्ता :**<br>**अ) वस्तुसुची टिपा क्र. ११**<br>**कच्चा माल**<br>**कोळसा ₹ १०२३.४६ कोटी**<br>औष्णिक विद्युत केंद्र कोराडी येथील कोळसा विभागाच्या नोंदीप्रमाणे वर्षाअखेरीचा कोळसासाठा हा ४६२५३१.३१७ मेट्रीक टन इतका असून त्याची किंमत ₹ १४३.०९ कोटी इतका होता परंतु लेखापुस्तकामध्ये हा कोळसासाठा ₹१४३.३४ इतक्या मुल्याचा दर्शविण्यात आला आहे परिणामी वर्षाअखेरीचा कोळसासाठा हा ₹२५.२३ लाख इतक्या रक्कमेने वाढीव दर्शविण्यात आला आहे आणि तोटा तेवढ्याच प्रमाणात कमी दर्शविण्यात आला आहे. | लेखा नोंदींप्रमाणे वर्षा अखेरचा कोळशाचा साठा ₹१४३.३४ कोटी इतका होता. परंतु कोळशाच्या सामग्रीच्या नोंदींप्रमाणे सदर साठा ₹ १४३.०८ कोटी इतका होता. यातील ₹ २५.२३ लाखाचा फरक हा गत वर्षात नोंदलेल्या लेखा नोंदींमुळे जाणवत आहे. जेव्हा प्रणाली मधील सामग्रीच्या नोंदी घेण्याचा काळ संपतो परंतु लेखा मानकांच्या तरतुदीचे पालन करण्यासाठी अथवा चुकांची दुरुस्ती करण्यासाठी लेखा नोंदी घेतल्या जातात, त्यावेळी असा फरक संभवतो तथापी कंपनीचा इंधनाचा एकुण खर्च ₹ ११३७५.१६ कोटी विचारात घेता, ₹२५.२३ लाखाचा फरक परिणाम कारक दिसत नाही. | कंपनीच्या लेखा नोंदीप्रमाणे कोळशाचा साठा ₹१४३.३४ कोटी दिसत असुन, सामग्रीच्या नोंदी प्रमाणे ₹ १४३.०८ कोटी दिसत आहे. यातील ₹२५.२३ लाखाचा फरक हा गत वर्षात नोंदलेल्या लेखा नोंदीमुळे जाणवत आहे. जेव्हा प्रणाली मधील सामग्रीच्या नोंदी घेण्याचा काळ संपतो. परंतु लेखा मानकांच्या तरतुदीचे पालन करण्यासाठी अथवा चुकांची दुरुस्ती करण्यासाठी लेखा नोंदी घेतल्या जातात. त्यावेळी असा फरक संभवतो. |
| ३.<br><br><br><br><br>अ) | **प्रकटीकरणावरील अभिप्राय :**<br>**वित्तिय निवेदनावरील टिपा (एकत्रित)**<br>**दि. ३१ मार्च २०१६ अखेरीस वित्तिय निवेदनातील महत्त्वाची लेखा धोरणा आणि लेखावरील टिपा :**<br>**उत्पन्नाची मान्यता :**<br>महानिर्मिती व महावितरण या कंपन्याना नियंत्रित करणाऱ्या एमएससीबी कंपनीने महानिर्मिती कंपनीस महावितरण कंपनीकडून ३१-०७-२०१५ या दिवशीच्या प्रलंबित मुद्दलावर आकारलेल्या व्याजातून सूट देण्याचे आदेश संचालक मंडळाच्या दि. २७-०८-२०१५ निर्णय | लेखा परिक्षणाच्या परिच्छेदामध्ये नमुद केलेल्या मंडळाच्या निर्णया मध्ये असे नमुद केले आहे की, वीज नियमक आयोगाच्या दिनांक २६.०६.२०१५ च्या विरोधात दाखल केलेल्या अपिलीय प्राधीकरणाकडील अपिलाबाबत निर्णय झाल्या नंतर, विलंब आकार माफ करावा की कसे याबाबत निर्णय घेतला जाईल. यावरुन असे निर्देशित होते की विलंब आकार माफ करण्याबाबत कोणताही विशिष्ट निर्णय झालेला नाही. तसेच सदरहु निर्णय ही अपिलीय प्राधीकरणाने दिलेल्या निर्णयावर अवलंबुन आहे ज्याबाबत कोणतीही माहिती सध्या उपलब्ध नाही. | संदर्भीत उत्पन्न मोजण्याच्या धोरण असे सुचित करते की '...... याबरोबरच, उत्पन्नामध्ये महावितरण कंपनीकडून आकारलेले विलंब शुल्क अंतर्गत असून ते महावितरण कंपनीबरोबर झालेल्या वीज खरेदी कराराच्या अटींप्रमाणे आहे." यासंबंधीचे लेखा धोरण यावर्षी काढलेले नाही. विलंब शुल्क माफ करण्याबाबतचा निर्णय हा महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या दि.२६-०६-२०१५ च्या आदेशाविरुध्द अपीलीय प्राधीकरणाकडे दाखल केलेल्या अपीलाच्या निकालानंतर घेण्यात येईल. यास्तव विलंब |

| | | | |
|---|---|---|---|
| | क्र.४५० अन्वये दिलेले आहेत. म्हणून कंपनीने तिच्या येणी रक्कममध्ये असलेल्या आणि कंपनीस पूर्णपणे न मिळालेल्या प्रलंबित आकाराचे ₹ २६३८.२७ कोटी (₹ १०३९.२६ कोटी वित्तीय वर्ष २०१५-२०१६ करिता) इतक्या रक्कमेचे प्रकटीकरण करणे आवश्यक होते. | यास्तव, कोणताही विशिष्ट निर्णयाबाबत सादर करण्याकरीता माहिती उपलब्ध नसलेने सदरहु निर्णयाबाबत ज्या आर्थिक वर्षामध्ये माहिती उपलब्ध होईल, त्या आर्थिक वर्षात माहिती सादर करण्यात येईल. | आकार माफ करण्याचा निर्णय कंपनीने घेतलेला नाही आणि हा निर्णय अपीलीय प्राधीकरणाच्या निकालावर अवलंबून असून याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नाही. परिणामी 'विलंब शुल्का बाबतचे उत्पन्न मोजण्यासंबंधीचे धोरण" बदललेले नाही.<br>याबरोबरच प्रकटीकरणाकरिता कोणताही विशिष्ट निर्णय उपलब्ध नसल्यामुळे कंपनीने अशा कोणत्याही निर्णयाचे वित्तिय वर्ष २०१५-१६ मध्ये प्रकटीकरण केलेले नाही. |

## स्वतंत्र लेखापरिक्षक याचां अहवाल

प्रति,

सर्व सदस्य,

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. मुंबई

**कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रांवर अहवाल.**

१. आम्ही, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिती) कंपनीने सोबत जोडलेल्या कंपनीच्या वित्तीय विवरण पत्राचे लेखापरिक्षण केले आहे. या विवरणपत्रांमध्ये कंपनीचे दि. ३१ मार्च २०१६ रोजीचा ताळेबंद, तसेच त्या दिवशी संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक, रोकडता प्रवाह आणि त्यासोबत कंपनीच्या लेखा धोरणांचा सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहिती या कागदपत्रांचा समावेश आहे.

**वित्तीय अहवालासंबंधी कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी :**

२. कंपनी अधिनियम २०१३ (अधिनियम) यांच्या कलम १३४ (५) यामध्ये नमूद केल्याप्रमाणे, कंपनी अधिनियम २०१३ (अधिनियम) ज्याचे सहवाचन कंपनी (“लेखा”) नियमावली २०१४ मधील नियम ७ सोबत केले जाते, त्यात अधिसूचित केलेल्या लेखा मानकांशी सुसंगत असणारी आणि कंपनीची आर्थिक स्थिती, वित्तीय कामगिरी व रोकडता प्रवाह यांचे सत्य व योग्य चित्र दर्शविणारी स्वायत्त वित्तीय विवरण पत्रे तयार करणे ही कंपनीच्या संचालक मंडळाची जबाबदारी असते. या जबाबदारीमध्ये कंपनीच्या सर्व मत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी अधिनियमावलीतील तरतुदींनुसार ठरण्यांचे दस्तऐवज व्यवस्थितपणे जतन करणे, आणि कोणत्याही लबाडीस आळा घालणे व लबाडीस शोधणे, योग्य लेखा धोरणांचे निवड करुन ती लागू करणे, रास्त व सुज्ञ निर्णय घेणे व अंदाज करणे, अंर्तगत वित्तीय नियंत्रणाची रचना, कार्यवाही करुन त्यांचा अंमल चालू ठेवणे, लेख्यांचे दस्तऐवज अचूक व संपूर्ण असण्याची हमी मिळविण्याकरिता प्रभावी संचलन करणे आपण कोणतेही लबाडी किंवा चूक नसलेली व कोणत्याही गैर विवरणांपासून मुक्त तसेच सत्य व योग्य दर्शन घडविणारी वित्तीय विवरणपत्रके तयार करुन ती सादर करणे - यांचा समावेश आहे.

३. **लेखापरिक्षकांची जबाबदारी :**

आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारे या वित्तीय विवरणपत्रांवर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

अधिनियम व त्यासाठी केलेली नियमावली यातील तरतुदींनुसार आवश्यक असणारी माहिती आमच्या लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट करण्यासाठी आम्ही अधिनियमाच्या तरतुदी लेखांची व लेखपरिक्षणांची मानके याबाबी लक्षात घेतल्या आहेत.

आम्ही आमचे लेखा परिक्षण, अधिनियमाच्या कलम १४३ (१०) यात विनिर्देशित केलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकांनुसार केले आहे. या लेखा मानकांनुसार आम्ही नैतीक गरजांची पुर्तता करणे तसेच ही वित्तीय विवरणपत्रके कोणत्याही प्रत्यक्ष गैर विवरणांपासुन मुक्त आहेत किंवा कसे याबद्दल योग्य प्रकारे आश्वासन मिळविण्याच्या दृष्टिने आमच्या लेखा परिक्षणाचे नियोजन करणे व ते पार पाडणे आवश्यक आहे.

कोणत्याही लेखापरिक्षणात वित्तिय विवरणपत्राातील रकमा व प्रकटने यासाठी लेखापरिक्षणात्मक पुरावे मिळविण्याच्या दृष्टिने एका पध्दतीनुसार कार्य करावे लागते. यासाठी लेखा परिक्षक त्यांच्या न्यायबुध्दीवर अवलंबुन योग्य पध्दत निवडतात.त्यामध्ये लबाडी किंवा नजरचुका यामुळे वित्तिय विवरणपत्रांचे गैर विवरण होणाऱ्या धोक्याचे मुल्यांकन करणे समाविष्ट असते.

या धोक्याचे मुल्यपालन करण्यासाठी, परिस्थितीस अनुरुप अशा लेखा परिक्षणाची रचना ठरविताना, लेखा परिक्षक सत्य व रास्त दर्शन घडविणारी वित्तिय विवरणपत्रे तयार करण्यासाठी, कंपनीच्या अंतर्गत वित्तिय नियंत्रणाचा विचार करतात. लेखा परिक्षणांमध्ये कंपनीच्या संचालकांनी वापरलेल्या लेखाधोरणांच्या योग्यतेबाबत आणि त्यांनी केलेल्या लेखांच्या अंदाजाबाबत तसेच वित्तिय विवरणापत्रांचे सर्वांगिण सादरीकरणाचे मुल्यंकन करणे, याचाही समावेश होतो.

आमच्या मते आम्ही मिळविलेले लेखा परिक्षणात्मक पुरावे हे या वित्तिय विवरणपत्रांवर आमचे लेखा परिक्षणात्मक मत व्यक्त करण्यासाठी पुरेसा व योग्य आधार देतात.

४. **पात्रतेच्या मतांचा आधार**

आम्ही खालील बाबींवर लक्ष वेधतो

*१. कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि. सोबत वीज खरेदी कराराच्या अटीनुसार ग्राहकांकडून अधिभाराची रक्कम या लेखाशीर्षाखाली थकीत भरण्यावरील व्याजाची रक्कम ₹१०३९.२६ कोटी वर्षभरातील अधिभाराचे उत्पन्न म्हणून मान्य केली आहे. महावितरणाने अधिभाराचे रक्कम ₹ २६३८.२७ कोटी दि.३१ मार्च २०१६ पर्यंत भरली नव्हती. तसेच बहु - वर्षीय वीज दर विनियम, २०११ आणि त्यानंतर आलेल्या सुधारणेनुसार कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीला ₹६२.३७ कोटीचे रिॲक्टीव पॉवर चे बिल केले. परंतु ते महापारेषण ने मान्य केले नाही. महावितरण व महापारेषणने ही देयके स्वीकारले नसल्याने आणि लेखांचा मेळ झाला नसल्याने आम्ही या उत्पन्नाची विश्वासर्हता व त्याचा कंपनीचा या वर्षीचा तोटा, व्यापारी येण्याचे मुल्य, महसुल व राखीव व अधिक्य या बाबींवरील परिणाम यावर अभिप्राय देण्यास असमर्थ आहेत.*

*२. टिपा क्र ३१ लेखावरील टिप यात नमुद केल्याप्रमाणे कर्ज व अग्रीमे यांच्या शिल्लकी ठेवी, जागतिक बँकेकडील कर्जे व माल पुरवठ्याचे दायित्व या प्रकरणांप्रमाणे संबंधित संस्था व्यक्ति यांचेकडून कायम होणे आणि किंवा त्यांच्या अभिलेखांशी त्यांचा मेळ होणे यांच्या अधीन आहेत. असे कायम होणे व मेळ करणे प्रलंबित असल्याने त्याचे परिणाकारक समायोजना करणे शक्य झालेले नाही. याशिवाय कर्ज व अग्रिमे यांच्या काही शिलकींच्या समजयोग्य मुदतीपेक्षा अधिक काळ थकीत रकमांचा लेखा निहाय तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे जर त्यातील विशिष्ट खात्यांसाठी तरतुद करणे आवश्यक असेल तर निश्चित करता येत नाही, यामुळे या शिलकींवर पडू शकणारा प्रभाव व कंपनीचा नफा याबाबत आम्ही अभिप्राय व्यक्त करण्यास असमर्थ आहोत*

*३. लेखांवरील टिपा क्र.३२ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, कर्जे व अग्रिमे यांत कोळसा कंपन्यांना अग्रिमापोटी दिलेल्या ₹७६०.८८ कोटी समावेश आहे. या अग्रिमाबाबत कंपनीने कोळसा पुरवठ्यासंबंधी ₹३७३.५२ कोटीचे दायित्वाची तरतूद केली आहे याच्या देयकांचे अंतिमीकरण प्रलंबित असल्याने कंपनीने दिलेल्या आग्रिमा दायित्व काढले नाही यामुळे कंपनीच्या मत्ता व दायित्व यांचे जादा विवरण झाले आहे. यावरील बाबींचा कंपनीच्या नफ्यावर होणारा परिणाम निश्चित करता आलेला नाही.*

**पात्र मत**

*५. आमच्या मते व आमची सर्वोत्तपरी योग्य माहिती व आम्हांस दिलेली स्पष्टीकरणे यानुसार ही वित्तिय विवरणपत्रे, अधिनियमानुसार आवश्यक असणारी माहिती त्यासाठीच्या विहित नमुन्यात देतात. मात्र वरील परिच्छदे क्र. ४ मधील मुद्दे क्र १ ते ३ यामध्ये दि. ३१ मार्च २०१६ रोजी वर्षाचा नफा व निव्वळ मत्ता यांच्यावर होणाऱ्या परिणाम अनिश्चित असल्याचे आमचे मताच्या अधीन राहुन ही विवरणपत्रे भारतात सर्व साधारणपणे स्विकारल्या जाणारी लेखा मानके याच्यांशी सुसंगत असुन ती कंपनीची दि.३१ मार्च २०१६ रोजी असलेली स्थिती आणि त्या दिवशी संपलेल्या वर्षाचा कंपनीचा तोटा व रोकड प्रवाह यांचे यथार्थ व योग्य दर्शन घडवितात.*

**भर देण्याची प्रकरणे**

६. आम्ही खालील टिपांवर लक्ष वेधू इच्छितो :

अ) टिपा क्र. ३५ (अे) (२) जर काही तुट / नफा असल्यास त्याचा लेखा करणे याबाबत भविष्य निर्वाह निधीच्या हंगामी खात्याच्या आधारित आवश्यक तो तपशिल व माहिती उपलब्ध नसल्यामुळे.

ब) टिपा क्र. ३५ (डी): कंपनीची (लेखा मानके) नियमावली २००६ अंतर्गत लेखा मानक १९- भाडेपट्टी संबंधी अंतर्गत आवश्यक जी माहिती दिलेली नाही. कारण विविध जल विद्युत केंद्राच्या वीज निर्मिती सुविधाबाबत महाराष्ट्र शासनाच्या सोबत करावयाचा भाडेपट्टी कराराची कार्यवाही प्रलंबित आहे.

क) टिपा क्र ३५ (आय): महागुज कोलायरीज लि. या उपकंपनीच्या गुंतवणूकीतील तोट्याचा लेखा न करण्याबद्दलचे समर्थना संबंधी.

ड) टिपा क्र ३५ (के): महाराष्ट्र विद्युत प्रथम सुधारणा हस्तांतरण योजना अंतर्गत काढलेल्या महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३१ मार्च २०१६ रोजीच्या जाहिरनाम्यानुसार स्थिर मत्ताचे वाढीव मूल्य, वाढीव मूल्यावरील घसारा व त्यामुळे झालेली समभागातील वाढ यांच्या लेखा संबंधी.

**इतर कायदे विषयी व नियमन यांच्या आवश्यकतांवर अहवाल**

७. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) यातील आवश्यकतेनुसार व भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी दिलेल्या आदेशानुसार सुचित केलेली लेखा परिक्षणाची कार्यपद्धती त्यावर केलेली कृती, त्याच्या कंपनीच्या लेखांवर व वित्तिय विवरणपत्रांवर झालेला

प्रभाव यांची पूर्तता याबाबतचे आमचे निवेदन परिशिष्ट - १ मध्ये दिले आहे.

योग्य माहितीच्या अनुपलब्धतेमुळे, खटले कोणत्या कारणास्तव प्रलंबित आहेत ह्या बाबतीतील माहितीसह, आम्ही कादयेशीर खटल्यावरील खर्चाच्या परीणामकारक नियत्रंण यंत्रणेवर व प्रलंबिताच्या कारणावर भाष्य करु शकत नाही.

८. सदर अधिनियमाच्या कलम १४३ (११) यातील अटीनुसाद केंद्रीय सरकारने दिलेली कंपनीच्या (लेखा परिक्षण अहवाल) आदेश २०१६ (आदेश) यांतील परिच्छेद क्र. ३ व ४ यामध्ये निर्देशित केलेल्या विषयांवर एक निवेदन परिशिष्ट- २ येथे आम्ही दिले आहे.

९. अधिनियमाच्या कलम १४३ (३) च्या अवश्यकतेनुसार आम्ही अहवाल देतो की :-

**अ)** *पात्रतेच्या मतांसाठी आधार या विषयाचा उपपरिच्छेद ४ यात वर्णन केलेली बाब वगळता,* आमच्या लेखा परिक्षणासाठी, आमचे सर्वोतपरी ज्ञान व विश्वास यानुसार आम्हाला आवश्यक अशी सर्व माहिती शोधली व तिची स्पष्टीकरणे मिळवली आहेत.

**ब)** आमच्या मते, *उपरिनिर्दिष्ट पात्रतेच्या मतांसाठी आधाराचा परिच्छेद वगळता, कंपनीने, कायद्यानुसार आवश्यक ती योग्य लेखांच्या वह्या, पुस्तके व्यवस्थित ठेवलेली आहेत,* असे या वह्या-पुस्तकांच्या आम्ही केलेल्या तपासणी परिक्षेत दिसून आले आहे.

**क)** या अहवालसोबत दिलेली ताळेबंद पत्रक, नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह पत्रक ही वित्तीय विवरणपत्रे लेखावह्यांशी सुसंगत आहेत.

**ड)** *उपपरिच्छेद ४ यात वर्णन केलेल्या आमचे निरीक्षण वगळता*आमच्या मते उपनिरिर्दिष्ट स्वायत्त स्वरुपाची, वित्तिय विवरणपत्रे, सदर कायद्याचे कलम १३३- ज्याचे सहवाचन कंपनी (लेखा) नियमावली २०१४ च्या नियम ७ सोबत होते, यामध्ये विनिर्देशित केलेल्या लेखा मानकांचे अनुपालन करतात.

**इ)** महानिर्मिती ही शासकीय कंपनी असल्यामुळे भारत सरकारची अधिसुचना क्रमांक जी.एस.आर. ४६३ (इ) दि ५ जुन २०१५ यानुसार कंपनी अधिनियम २०१३चे कलम १६४ (२) या कंपनीत लागु नाही.

फ) कंपनीच्या वित्तिय अहवालावरील पुरेसे अंतर्गत वित्तिय नियंत्रण आणि ह्या नियंत्रणाची प्रर्वतनातील परिणाम कारकर्ता याबाबतच आमचे निवेदन परिशिष्ट - ३ मध्ये दिले आहे.

**ग)** कंपनी (लेखा परिक्षण व लेखा परिक्षक) नियमावली २०१४ यातील नियम ११ यांनुसार समाविष्ट करण्याची अन्य प्रकरणे याबाबत आमची सर्वोत्तम माहिती व आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आमची मते खालीलप्रमाणे आहेत.

१) कंपनीने प्रलंबित न्यायालयीन वादांचे वित्तिय विवरणपत्रांमधील आर्थिक स्थितीवर होऊ शकणारे परिणाम प्रकट केले आहेत. संदर्भ : वित्तीय विवरणपत्रांना दिलेली टिपा क्र. २३ पहावी

२) कंपनीला ज्या प्रत्यक्ष पुढील तोट्यांसाठी आर्थिक तरतुद करण्याची आवश्यकता भासेल असे दिर्घ मुदतीचे कोणतेही करार कंपनीने केलेले नाहीत. तसेच कंपनीने कोणताही डेरीव्हेटीव करार केलेला नाही.

३) कंपनीस गुंतवणुकदार शिक्षण व रक्षण निधीसाठी स्थानांतरीत करणे आवश्यक आहे अशी कोणतीही रक्कम नाही.

**बोरकर ॲन्ड मुझुमदार करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन.१०१५६९ डब्ल्यु

सीए देवांग वाघानी
भागीदार
आय सी ए आय एम. नं. १०९३८६
स्थळ : मुंबई
दिनांक : ३ सप्टेंबर २०१६

**उम्मेद जैन ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. ११९२५० डब्ल्यु

सीए यु. एम. जैन
भागीदार
आय सी ए आय एम नं. ०७०८६३

**एम.पी. चितळे ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. १०१८५१ डब्ल्यु

सीए आशुतोष पेडणेकर
भागीदार
आ सी ए आय एम नं. ०४१०३७

## स्वतंत्र्य लेखापरिक्षक यांच्या अहवालास जोडपत्र – १

### महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. दि. ३१मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता आमच्या समान तारखेच्या अहवालातील इतर कायदेशीर व नियमानाच्या आवश्यकता यांच्या विभागात परिच्छेद क्र. ७ यात दिलेल्या संदर्भानुसार.

**कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १४३ (५) यातील आदेशांवर अभिप्रय :**

१. **जर कंपनीची निर्गुंतवणुक करण्यासाठी निवड करण्यात आली तर मत्ता (अमुर्त मत्ता व जमीनी यासह) आणि दायित्वे (बांधीलकी असलेली व सर्वसामान्य राखीव यासह) यांच्या मुल्यांकनाबत संपुर्ण स्थितीदर्शक अहवालचे परिक्षण करावे, त्यामध्ये निर्गुंतवणूक बाबीची कार्यपध्दती व सहयाच्या कार्याचा टप्पा यांचा समावेश करावा.**

ही कंपनी निर्गुंतवणूकीसाठी निवडलेली नाही. म्हणून यासाठी माहिती देणे कंपनीला लागु नाही.

२. **जर काही कर्जे / उसनवारी / व्याज इ. सोडुन देणे / निर्देशित करणे याची काही प्रकरणे असली तर त्याची कारणे व त्यात असलेली रक्कम यांचा अहवाल देणे.**

लेखा परिक्षणाच्या काळात व आहांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणतीही कर्जे उसनवारी / व्याज इ. सोडून देणे / निर्देशित प्रकरणे वर्षे २०१५-१६ दरम्यान उद्‌भवलेली नव्हती.

३. **तिसऱ्या पक्षाकडे असलेला वस्तुमाल आणि शासन व अन्य प्राधिकरणे यांच्याकडून देणगांच्या स्वरुपात मिळालेल्या मत्ता यासाठी योग्य अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे ?**

कंपनी तिचा वस्तुमाल / सामान तिसऱ्या पक्षाकडे फक्त प्रवर्तनासाठी पाठविते. आम्हांस दिलेले माहितीनुसार कंपनीने अशा कृतीसाठी योग्य अभिलेख नीट जतन केले आहेत. आम्हांस असे सांगणयात आले की, वर्षभरात शासनाकडून कोणत्याही मत्ता देणगी स्वरुपात कंपनीला मिळालेली नाही

४. **कायदेशीर / लवादाकडे प्रलंबित खटल्यांचे वर्ष निहाय विश्लेषणाचा अहवाल देणे त्यात प्रलंबित असल्याची कारणे व सर्व कायदेशीर खटल्यांवरील खर्चावर लक्ष देणारी यंत्रणा अस्तित्वात असल्याबद्दल तिच्या प्रभावी उपयोगाबद्दल माहितीचा समावेश करणे (यात परदेशातील व स्थानिक खटल्यांची ही माहिती देणे.)**

कंपनीने प्रलंबित / लवादाकडील प्रकरणे यांना आकस्मित दायित्वे म्हणून निश्चित केली असुन ती प्रकट केली आहेत. एकूण ३८० प्रलंबित कायदेशीर / लवादाकडील खटल्यांचे वर्ष निहाय विश्लेषण खालील प्रमाणे आहेत.

| प्रकरणाचे वय | प्रकरणाची संख्या |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | ३८ |
| १ ते २ वर्षे | ५८ |
| २ ते ३ वर्षे | १९ |
| ३ ते ५ वर्षे | ४० |
| ५ वर्षापेक्षा जास्त | १९५ |
| इतर अनुपस्थित राहिलेली | ३० |
| **एकूण** | **३८०** |

खटले सामान्यत: पुढील कारणास्तव प्रंलबित आहेत : १) सुनवणी चालु आहे किंवा लवाद / न्यायाधिकरणे न्यायालये यांना अधिक माहिती / कागदोपत्री पुरावे हवी असल्याने अपुर्ण आहेत २) न्यायालयांनी तारखा निश्चित केल्या नसल्याने किंवा स्थगीत केल्याने खटले प्रलंबित आहेत. कंपनीने प्रत्येक खटल्यातील खर्चाचे तपशील मांडले आहेत. योग्य माहितीच्या अनुपलब्धतेमुळे खटले कोणत्या कारणास्तव प्रलंबित आहेत ह्या बाबतीतील माहीती सह, आम्ही कायदेशीर खटल्यावरील खर्चाच्या परिणामकारक नियत्रंण व प्रलंबिताच्या कारणावर भाष्य करु शकत

नाही.

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५)यातील उप निर्देशांवर अभिप्राय :-**

५. **औष्णिक विद्युत प्रकल्पांच्या प्रकरणी, विविध प्रदुषण नियंत्रण कायदे यांची अनुपालन तसेच त्याचे परिणाम -यामध्ये राखेचा वापर व विल्हेवाट आणि त्याबाबत कंपनीचे धोरण याची तपासणी करुन त्यावर अभिप्राय देणे.**

कंपनीने कळविले आहे की, वर्ष २०१५-१६ मध्ये विविध प्रदुषण नियंत्रण कायद्याचे अनुपालन केले आहे. त्यात राखेचा वापर व विल्हेवाट यांचा सुध्दा समावेश आहे. प्रदुषण नियंत्रणाचे विविध कायदे त्याचे परिणाम - यात राखेचा वापर व विल्हेवाट यांचा समावेश केला आहे. यासंबंधी वर दिलेली माहितीचे आम्ही स्वतंत्र्यपणे पडताळणी केलेली नाही.

६. **या कंपनीने कोळशाच्या पिटहेडसपाशी उत्खनन करण्यासाठी खाजगी संस्थांसोबत महसुल वाटणीचा करार केला आहे का? आणि केला असल्याचा असे करार कंपनीच्या आर्थिक हितांचे पुरेसे रक्षण करते काय?**

नाही, कंपनीने कोळसा बाहेर काढण्यासाठी कोणत्याही खाजगी संस्थासोबत कसलेही करार केलेली नाहीत.

७. **कोळशासाठी दिलेले आदेश प्राप्ती यांचा मेळ करणारी योग्य कार्यप्रणाली कंपनीकडे आहे का? आणि कोळसा दर्जा त्यातील ओलसरपणा आणि विलंब आकार इ.ची नोंद लेखा पुस्तकात योग्य प्रकारे केली जाते का?**

होय, कंपनीकडे आदेश दिलेल्या कोळशाची संख्या / दर्जा व त्याची त्याप्रमाणे प्राप्ती यांचा मेळ करण्याची प्रणाली आहे. मात्र सध्याची पध्दत अधिक बळकट करण्याची गरज आहे. कंपनी कोळशाच्या श्रेणीची निश्चित संबधित युनिटस् अंतर्गत रसायन शास्त्रज्ञ यांचेकडून करण्याऐवजी पुरवठाद्वाराच्या बीजकातील नोंदणीप्रमाणे कोळशाचे दायित्व मान्य करते. कोळशाचा दर्जा कमी असल्याचे दावे कोळसा भरण्याचा जागी कंपनीचे प्रतिनिधी व पुरवठादारांचे प्रतिनिधी यांच्या तर्फे संयुक्तपणे व कोळसा खाणीने दिलेला दर्जा याबाबत केले जातात परंतु हे दावे कोळसा पुरवठादाऱ्याने मान्य केलेले नाहीत यामुळे व इतर कारणांमुळे अश्या कंपन्याच्या शिल्लकीत फरक आढळतो.

तसेच चालू वर्षी महानिर्मितीने करारानुसार कोळशाच्या श्रेणी बाबत कोळसा कंपन्या विरुद्ध ₹ ८०३.३८ कोटीचे दावे दाखल केले. परंतु पुरवठादाऱ्यांनी मालाच्या कमी उचल यासाठी कंपनीवर ₹ ५० कोटीचा दावा लावला, कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसल्यामुळे कोणत्याही एका पक्षाचा दावा खरा असण्याच्या निर्णयापर्यंत पोहचणे कठीण आहे. कंपनीने कोळसा पुरवठादाऱ्यांचे दावे आकस्मीत देणी म्हणून उघड केली आहेत. तसेच ह्याच कोळसा पुरवठादाऱ्यांने केलेल्या कामगीरी प्रोत्साहनाच्या दाव्याचा लेखाही कंपनीने केलेला नाही.

८. **राज्य शासनाला देय असलेला विनामुल्य विजेचा वाटा किती आहे, आणि त्याची संमतीच्या करारानुसार हिशेब केला जातो का? आणि तो स्विकारलेल्या लेखा मानकांनुसार लेखामध्ये दाखविण्यात येतो का?**

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, राज्य शासनाच्या कोणत्याही करारानुसार विजेचा विनामुल्य वाटा नाही.

९. **जल विद्युत प्रकल्पांच्या बाबतीत जैविक विविधता जतन करण्यासाठीचे धोरण / सुचना यानुसार पाणी सोडली जाते का? असे जतन केले नाही म्हणून काही दंड भरला / भरावयाचा असेल तर त्याची माहिती द्यावी.**

पाणी सोडण्याच्या पध्दतीवर राज्य शासनाची जल संसाधन विभागाचा अंमल आहे. आम्हांस दिलेल्या माहितीनुसार कंपनीची यात काहीही भुमिका नाही. पाणी सोडण्याबाबत कोणताही दंड देणे / दिलेला नाही.

**बोरकर ॲन्ड मुझुमदार करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन.१०१५६९ डब्ल्यु

सीए देवांग वाघानी
भागीदार
आय सी ए आय एम. नं. १०९३८६
स्थळ : मुंबई
दिनांक : ३ सप्टेंबर २०१६

**उम्मेद जैन ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. ११९२५० डब्ल्यु

सीए यु एम जैन
भागीदार
आय सी ए आय एम नं. ०७०८६३

**एम.पी. चितळे ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. १०१८५१ डब्ल्यु

सीए आशुतोष पेडणेकर
भागीदार
आ सी ए आय एम नं. ०४१०३७

## स्वातंत्र्य लेखापरिक्षक यांच्या अहवालास जोडपत्र – २

### महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. च्या ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता आमच्या समान तारखेच्या अहवालातील इतर कायदेशीर व नियमनाच्या आवश्यकता यांच्या विभागात परिच्छेद क्र. ८ यात दिलेल्या संदर्भानुसार.

१. स्थिर मत्तांच्या संदर्भात:

अ) कंपनीने स्थिर मत्तांच्या संख्यात्मक तपशिल स्थिती यांच्यावर संपूर्ण माहितीचे अभिलेख योग्य प्रकारे जतन केले आहेत फक्त काही ठिकाणच्या थोड्या मत्तांचा याला अपवाद आहे. तेथील स्थिर मत्तांचे प्रत्येक बाबींसह माहिती संकल व संहिताकरण करुन त्याचा स्थिर मत्तांच्या नोंदवही सोबत सुसंगत मेळ करणे ही प्रक्रिया चालू आहे.

ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार, कंपनीचे धोरण असे आहे की, तीन वर्षांमध्ये एकदा स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करावी. या वर्षी विश्रामाचे वर्ष असल्याने व्यवस्थापनाने स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणीचे आयोजन केले नाही.

क) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि आम्ही केलेल्या अभिलेख्यांच्या पडताळणीनुसार सर्व स्थिर मालमत्ता कंपनीच्या नावे आहेत किंवा नाहीत हे निर्धारित करण्यासाठी टायटल डिड्स मिळवण्याची प्रक्रिया चालू आहे मिळलेल्या माहितीनुसार खालील स्थिर मालमत्तेचे टायटल डिड्स कंपनीच्या नावे नाहीत.

i) ४ लेखा युनिट मधील मुक्त जमिनीचा एकुण गट ₹४५.६२ कोटी आणि १ लेखा युनिट मधील भाडेपट्टी जमिनीचा एकूण गट ₹ १३१.०२ कोटी आणि निव्वळ गट ₹ १०१.७३ हा अजूनही पुर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या नावे आहेत.

ii) २ लेखा युनिट मधील मुक्त जमिनीचा एकुण गट ₹ ३९५.८८ कोटी हा महानिर्मितीच्या नावे आहे.

२. कंपनी वस्तुसुचीच्या संदर्भात :

अ) आम्हांस दिलेल्या स्पष्टीकरणानुसार कंपनीच्या व्यवस्थापनाने या वर्षी रास्त कालांतराने सुचींची प्रत्यक्ष पडताळणी केली. वस्तुसुचींची ही प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापणाने नेमलेल्या सनदी लेखापाल्यांच्या बाह्य संस्थानी पार पाडली.

ब) आम्ही केलेल्या वस्तुसुचींच्या अभिलेखांचे परिक्षण यावरुन कंपनीने वस्तुसुचींचे अभिलेखन योग्य प्रकारे जतन केलेले आहे. वस्तुसुचींच्या या प्रत्यक्ष पडताळणीनंतर त्याचा अभिलेख नोंदीशी तुलना केल्यानंतर दिसलेल्या विसंगतींचे योग्य समायोजन लेखावह्यात योग्य प्रकारे केले आहे.

३. आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३, कलम २ खंड (७६) यातील यादीतील कंपन्या, फर्म्स किंवा इतर व्यक्ति संस्था यांना महानिर्मिती कंपनीने कोणतीही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्जे या वर्षी दिलेली नाहीत. यामुळे या संबंधीच्या आदेशातील परिच्छेद - ३ मधील खंड (३) (अ) आणि खंड (३) (ब) यात दिलेल्या तरतुदी कंपनीस लागु नाही

४. आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कर्जे, गुंतवणूक व हमी याबाबतितील, कंपनी अधिनियम २०१३ ची कलमे १८५ व १८६ ची पूर्तता कंपनीने केलेली आहे.

५. आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३ ची कलमे ७३ ते ७६ आणि त्या अंतर्गत केलेली नियमावली या तरतुदीच्या अर्थानुसार या कंपनीने जनतेकडून ठेवी स्विकारलेल्या नाहीत.

६. केंद्र सरकारने कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४८ (१) अन्वये खर्चाचे अभिलेख जतन करण्याचे विहित केले आहे. आम्ही या संदर्भात कंपनीच्या या अभिलेखाचा स्थुल स्वरुपाने आढावा घेतला आणि आमच्यामते व आम्हांस दिलेही माहिती व स्पष्टीकरणे यानुसार प्रथम दर्शनी असे दिसते की, कंपनीने असे विहित अभिलेखांचे जतन केले आहेत. मात्र हे खर्च अभिलेख अचुक व संपुर्ण आहेत किंवा कसे व ते कंपनी (खर्च लेखा अभिलेखा) नियमावली, २०१४ अंतर्गत दिलेल्या आवश्यकतेनुसार असल्याचे निश्चित करण्याच्या दृ**ष्टीने आम्ही त्याचे परिक्षण केलेले नाही.**

७. सांविधिक देणीच्या संदर्भात :

अ) आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरुन आणि कंपनीच्या दैनंदिन वह्या व अभिलेख यानुसार सामान्यत: कंपनी ज्यांच्या बद्दल वाद नाही अशी पुढील सांविधिक देणी नियमीतपणे भरते भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा आयकर, संपत्तीकर , विक्रीकर, सेवाकर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, मुल्यवर्धिक कर, उपकर, आणि अन्य कोणतीही सांविधिक देणी योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडे जातात. आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे नुसार भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा आयकर, संपत्ती कर, विक्रीकर, सेवाकर, सीमा शुल्क ,उत्पादन शुल्क मुल्य वर्धीत कर उपकर,भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा यांची वाद नसलेली देणी दि. ३१ मार्च २०१६ रोजी देण्यात तारखेपासून सहा महिन्यापेक्षा जास्त काळ थकीत नव्हती.

ब) आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे या नुसार आयकर,विक्रीकर, सेवाकर, सीमाशुल्क मुल्य वर्धीत कर आणि उपकर यांची *खालील अपवाद वगळता कोणतीही वादग्रस्त देणी देय नाही.*

| *संविधानाचे नाव* | *देण्याचे स्वरुप* | *रक्कम (₹ कोटीमध्ये )* | *रक्कमेचासंबधीचा कालावधी* | *प्रलंबित असलेल्या मंचाचे नाव* |
|---|---|---|---|---|
| *आयकर अधिनियम* | *दंड (₹११३.५१ (कोटी)* | *५०.३८* | *निर्धारिण वर्ष २००६-०७* | *आय. टी ए. टी मुंबई (विभागाने केलेल अपील्स)* |
| *आयकर अधिनियम* | *दंड (₹१०७.३२ कोटी)* | *१०७.३२* | *निर्धारिण वर्ष २००७-०८* | *आय. टी ए. टी मुंबई (विभागाने केलेले अपील्स)* |
| *आयकर अधिनियम* | *सेवाकराची स्त्रोतापाशी कपात करणे* | *०.०९* | *निर्धारिण वर्ष २००९-१०* | *आय.टी.ए.टी पुणे खंडपीठ* |
| *केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियम* | *जुळणीकेलेल्या रचनेच्या पोलादी साहित्यावर लावलेले शुल्क* | *३.०१* | *१९९१-९२ ते १९९४-९५* | *सी.ई.एस.टी.ए. टी.मुंबई* |
| *केंद्रीय विक्रीय अधिनियम* | *मुल्य वर्धित कर* | *०.३५* | *२००५-०६* | *विक्रीकर आयुक्त (अपील्स) नागपूर* |

८. आमच्या मते तसेच आम्हांला दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्थेचे देण्याची परतफेड थकवलेली नाही. कंपनीने कर्ज रोखे स्वरुपात कोणतेही कर्जाऊ रक्कम घेतलेली नाही.

९. कंपनीने इनिशिअल पब्लिक ऑफर किंवा पुढील पब्लिक ऑफर (कर्ज साधने समावेश) आणि मुदत कर्ज याव्दारे कोणताही पैसा उभा केला नाही.त्यानुसार संबधीत आदेशा मधील परिच्छेद ३(९) लागू नाही.

१०.आमचे सर्वोतपरी ज्ञान व विश्वास तसेच आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरुन या वर्षांच्या काळात कंपनीकडून किंवा कंपनीबाबत त्यांच्या अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडून लबाडी झाल्याचे दिसून आलेली नाही, किंवा तसा कोणताही अहवाल आलेला नाही.

११.आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार ही एक सरकारी कंपनी असल्यामूळे, भारत सरकारने जारी केलेली अधिसूचना क्रमांक जी एस आर ४६३ (ई) दि ५ जून २०१५, या नुसार संबंधीत अधिनियमाचे कलम १९७ मधील तरतुदी या कंपनीला लागू होत नाही.

१२.आमच्या मते व आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार, हि कंपनी निधी कंपनी नाही. त्यामुळे संबंधीत आदेशाचे खंड (१२) कंपनीला लागू होत नाही.

१३.आम्हाला दिलेल्या माहितीव स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या अभिलेख्यांच्या पडताळणीनुसार संबंधीत संस्थाशी व्यवहार हा कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १७७ व १८८ चे पालन करतो. संबंधीत संस्थातील व्यवहाराचा तपशील वित्तीय विवरणपत्रकात लेखा मानकाच्या मान्यतेनुसार उघड केलेले आहे.

१४.आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या अभिलेख्यांच्या पडतळणीनुसार या वर्षी कंपनीने कोणतेही पसंती वाटप

किंवा खाजगी स्थान असलेले शेअर्स किंवा पूर्णत: किंवा अंशत: परिवर्तननीय ऋण विमोचन पत्र (डिबेंचर्स)दिलेली नाहित. त्यानुसार या आदेशचा खंड (१४) लागु होत नाही.

१५. आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या अभिलेख्यांच्या पडताळणीनुसार कंपनीने, कंपनी अधिनियम, २०१३ कलम १९२ नुसार संचालक किंवा त्यांच्याशी संबंधीत व्यक्तीशी कोणतेही रोख व्यवहार केलेला नाही. त्यानुसार या आदेशाचा खंड (१५) कंपनीला लागू होत नाही.

१६. कंपनीला, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ कलम ४५-आय ए नुसार नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

**बोरकर अॅन्ड मुझुमदार करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन.१०१५६९ डब्ल्यु

सीए देवांग वाघानी
भागीदार
आय सी ए आय एम. नं. १०९३८६
स्थळ : मुंबई
दिनांक : ३ सप्टेंबर २०१६

**उम्मेद जैन अॅन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. ११९२५० डब्ल्यु

सीए यु.एम.जैन
भागीदार
आय सी ए आय एम नं. ०७०८६३

**एम.पी. चितळे अॅन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. १०१८५१ डब्ल्यु

सीए आशुतोष पेडणेकर
भागीदार
आ सी ए आय एम नं. ०४१०३७

## स्वातंत्र्य लेखापरिक्षक यांच्या अहवालास जोडपत्र – ३

### जोडपत्र : ३ महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित च्या दि. ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता संबंधीत अधिनियमाच्या कलम १४३ (३) मध्ये आवश्यक असलेला स्वतंत्र लेखा परिक्षकाच्या अहवालातील परिच्छेद ९(फ) मध्ये दिलेले संदर्भ.

**कंपनी अधिनियम २०१३ (सदर कायदा) चे कलम १४३ यातील उपकलम ३ च्या खंड १ खालील अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील अहवाल.**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित च्या दि. ३१ मार्च २०१६ रोजीच्या आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत आर्थिक नियंत्रण व स्वायत्त विवरण पत्रकाच्या परिक्षणाकरीता संयुक्त पणे आमची नियुक्ती झाली आहे.

**अंतर्गत आर्थिक नियंत्रणाकरीता व्यवस्थापनाची जबाबदारी**

दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्स ऑफ इंडिया यांनी विहित केलेली आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील मार्गदर्शन टीप (सदर मार्गदर्शन टीप) यात नमुद केलेल्या अंतर्गत नियंत्रणासाठी आवश्यक घटकाचा विचार करुन तयार केलेले आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत नियंत्रणाच्या निष्कर्षावर आधारीत अंतर्गत आर्थिक नियंत्रण स्थापन करणे व त्याची देखरेख करणे ह्यासाठी कंपनीचे व्यवस्थापन जबाबदार आहे. या जबाबदारी मध्ये पुरेशी अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची स्थापना करणे, अंमलबजावणी करणे आणि देखभाल करणे, जे व्यवसायाची कार्यक्षमता व शिस्तबद्धता सुनिश्चित करण्याचे कार्य प्रभावीपणे करणे, कंपनीच्या धोरणाशी एकनिष्ठ असणे, सर्व मत्तांची देखभाल करणे, कोणत्याही लबाडीस आळा घालणे व लबाडीस शोधणे, लेख्यांचे दस्तऐवज अचूक व संपूर्ण करणे, आणि कंपनी अधिनियम २०१३ प्रमाणे आवश्यक खात्री लायक आर्थिक माहिती वेळेत बनवणे याचा समावेश होतो.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी**

आयसीएआय ने जारी केलेली आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील मार्गदशक टिप व लेखापरिक्षण मानके ज्या प्रमाणात लागू होतील त्यानुसार आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे कंपनीचे आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत आर्थिक नियंत्रणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

*खालील अस्विकृती संबंधीच्या अभिप्रयाप्रमाणे, आम्हांला अंकेक्षण संबंधीचे पुरेसे पुरावे नसल्यामुळे, आम्ही कंपनीतील वित्तिय अहवालावरील अंतर्गत वित्तिय नियंत्रणासंबंधी अंकेक्षण अभिप्राय देऊ शकत नाही.*

**वित्तिय अहवालावरील अंतर्गत वित्तिय नियंत्रणाचा अर्थ :**

कंपनीचे वित्तिय अहवालावरील अंतर्गत वित्तिय नियंत्रण ही पद्धत कंपनीच्या वित्तिय अहवालचा विश्वसनीयते संबंधीची आणि कंपनीचे वित्तिय अहवाल हे सर्वसाधारण पणे मान्य असलेल्या लेखा तत्वांप्रमाणेच तयार केलेले आहेत यासंबंधीची खात्री देण्यासाठी आहे. कंपनीच्या वित्तिय अहवालावरील अंतर्गत वित्तिय नियंत्रणात अंतर्भुत असलेली धोरणे आणि पद्धती :

१) कंपनीच्या मालमत्ताच्या संबंधीत व्यवहार आणि मालमत्तांची विल्हेवाट यासंबंधी विस्तृत, अचूक आणि न्याय रीतीने माहिती देणारे लेखे तयार करण्यासंबंधी.

२) कंपनीतील व्यवहार हे वित्तिय लेख्यांमध्ये सर्वसाधारणपणे मान्य असलेल्या लेखा तत्त्वांनुसार नोंदलेले आहेत आणि कंपनीतील जमा व खर्च हे व्यवस्थापनाने आणि कंपनीच्या संचालकांनी दिलेल्या अधिकृत परवानगीप्रमाणेच केलेले आहेत याची रास्तपणे खात्री देतात.

३) कंपनीच्या वित्तिय लेख्यांवरती मोठ्या प्रमाणात परिणाम करणाऱ्या कंपनीच्या मालमत्ता संपादन, वापर व मालमत्तेची विल्हेवाट यासंबंधी प्रतिबंध व वेळेत शोध घेण्यासंबंधी रास्त पणे खात्री देतात.

**अभिप्राय संबंधीची अस्विकृती :**

*आम्हांला पुरविलेल्या माहिती व स्पष्टीकरणावरुन, सनदी लेखापालांचे संस्थेने वित्त अहवालावरील अंतर्गत वित्त नियंत्रणाचे अंकेक्षण करण्याकरिता प्रकाशित केलेल्या मार्गदर्शन टिप्पणी प्रमाणे वित्त अहवालावरील अंतर्गत वित्त नियंत्रणा संबंधीची यंत्रणा कंपनीने प्रस्थापित केलेली नाही. यांमुळे आमचा वित्त अहवालावरील अंतर्गत वित्त नियंत्रणासंबंधी तसेच अंतर्गत वित्त नियंत्रण ३१ मार्च २०१६ पर्यंत परिणामकारकपणे कार्यरत होते किंवा नाही यासंबंधी अंकेक्षण पुरावे नसल्यामुळे आम्ही अभिप्राय व्यक्त करु शकत नाही.*

कंपनीच्या स्वतंत्र वित्त लेखांच्या अंकेक्षण चाचणीचे स्वरुप, वेळ व प्रमाण ठरविणव्याच्या वेळी वरील अस्विकृती विचारात घेतली आहे आणि वरील अस्विकृती मुख्य अंकेक्षण अहवालातील अभिप्रायांवरती कसलाही परिणाम करत नाही.

**बोरकर ॲन्ड मुझुमदार करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन.१०१५६९ डब्ल्यु

सीए देवांग वाघानी
भागीदार
आय सी ए आय एम. नं. १०९३८६
स्थळ : मुंबई
दिनांक : ३ सप्टेंबर २०१५

**उम्मेद जैन ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. ११९२५० डब्ल्यु

सीए यु.एम.जैन
भागीदार
आय सी ए आय एम नं. ०७०८६३

**एम.पी. चितळे ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. १०१८५१ डब्ल्यु

सीए आशुतोष पेडणेकर
भागीदार
आ सी ए आय एम नं. ०४१०३७

## महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्यादित, (सीआयएन-यू४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)

## ३१ मार्च २०१६रोजीचे ताळेबंद पत्रक

रक्कम (₹) मध्ये

| | | | संख्या क्र. | ३१ मार्च २०१६ | ३१ मार्च २०१५ |
|---|---|---|---|---|---|
| I. | **समभाग व दायित्वे** | | | | |
| | | भागधारकांचे निधी | | | |
| | अ) | भाग भाडंवल | १ | २४०,९८३,५६७,८८० | ८०,५७२,८४५,६४० |
| | ब) | राखीव व अधिक्य | २ | (६५,६१७,६१७,१५७) | २२,१४९,४३२,८७४ |
| | | भाग अर्ज निधी | | | |
| | | प्रलबित वाटप (टिपा क्र. २४ पहावी ) | | ७,५५९,८००,०२५ | ९,३०३,११७,८९७ |
| | | चालु नसलेली दायित्वे | | | |
| | अ) | दीर्घ मुदतीची कर्जे | ३ | २२७,५४५,१०६,९१७ | २४६,३७२,८५७,९५९ |
| | ब) | स्थगित कर दायित्वे (निव्वळ) | ४ | १५,२४२,७१९,०७८ | १४,७१६,९१७,०४४ |
| | क) | इतर दीर्घ मुदतीची दायित्वे | ५ | ११,२६४,२८२,०७९ | २१,८८५,७४१,१८२ |
| | ड) | दीर्घ मुदतीच्या तरतुदी | ६ | ८,०३३,६६२,७४० | ८,३८४,२८३,६३१ |
| | | चालु दायित्वे | | | |
| | अ) | अल्प मुदतीची कर्जे | ३(अ) | ९४,३९९,६१८,७५२ | ६०,३९०,३४२,८१८ |
| | ब) | व्यापारी देणी | ७ | १३,८२५,६९९,५४४ | ४०,६३७,२७६,३८८ |
| | क) | इतर चालु दायित्वे | ७(अ) | ६८,४३४,५१८,८४९ | ३८,८३७,४४०,३७७ |
| | ड) | अल्प मुदतीची दायित्वे | ६ | २,५५२,१८१,९११ | ३,५९८,५८९,९६७ |
| | | **एकूण** | | **६२४,२२३,५४०,६१८** | **५४६,८४८,८४५,७७६** |
| II | **स्थिर मत्ता** | | | | |
| | | **चालु नसलेल्या मत्ता** | | | |
| | **अ** | **स्थिर मत्ता** | | | |
| | | मूर्त मत्ता (निव्वळ गट) | ८ | २७६,५४९,००४,३०८ | १८२,४१७,९६१,०३४ |
| | | अमूर्त मत्ता (निव्वळ गट) | ८ | १६१,७४१,७२१ | १६१,६०६,०९५ |
| | | प्रगती पथावरील भांडवली कामे | ८(अ) | १७४,३४६,८९६,३०३ | २०५,६८५,९८२,२७१ |
| | **ब)** | **चालू नसलेल्या गुंतवणुकी** | ९ | १,१००,००० | १,६००,००० |
| | **क)** | **दीर्घ मुदतीची कर्जे व अग्रीम** | १० | ३,८९५,७१४,१५५ | ९,२०४,५८४,७३१ |
| | | चालु मत्ता | | | |
| | अ. | वस्तू सूची | ११ | १९,०२५,१०२,६६३ | १४,२३१,६४४,३६८ |
| | ब. | व्यापारी येणी | १२ | ११३,४३०,२७८,७२० | १०६,०७१,३३५,९२४ |
| | क. | रोख व रोख समतूल्य | १३ | १,४४३,२६७,०९१ | ९०२,६०४,६५२ |
| | ड. | अल्प मुदतीची कर्जे व अग्रीमे | १० | २८,४४४,७३८,७७८ | २४,७२०,०२१,८४९ |
| | इ. | इतर चालु मत्ता | १४ | ६,९२५,६९६,८८१ | ३,४५१,५०४,८५२ |
| | | **एकूण** | | **६२४,२२३,५४०,६१८** | **५४६,८४८,८४५,७७६** |
| | कृपया वित्तिय विवरणवत्रासोबत जोडलेल्य टिपा पहाव्यात | | | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**एम. पी. चितळे ॲन्ड कं. करीता**

सनदी लेखापाल

सी ए आशुतोष पेडणेकर

भागीदार (आयसीएआय एम नं.: ०४१०३७)

**बोरकर आणि मझुमदार करीता**

सनदी लेखापाल

सी ए देवांग वाघानी

भागीदार (आयसीएआय एम नं.: १०९३८६)

**उमेद जैन ॲन्ड कं. करीता**

सनदी लेखापाल

सी ए उमेद जैन

भागीदार (आयसीएआय एम नं.: ०७०८६३)

मुंबई ३ सप्टेंबर २०१६

**महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी करीता**

जे. के. श्रीनीवासन

संचालक वित्त व मुख्य वित्त अधिकारी

डीआयएन नं.:०१२२०८२८

बीपीन श्रीमाळी

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

डीआयएन नं.: ०३२७२१३५

पंकज शर्मा

मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

राहूल दुबे

कंपनी सेक्रेटरी

एम नं.: ए१४२१२

## महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्यादित, (सीआयएन-यू४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)

### दि. ३१.०३.२०१६ रोजीचे ताळेबंद पत्रक

रक्कम (₹) मध्ये

| | | टिपा क्र. | २०१५-१६ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तनापासूनचा महसूल | १५ | १९२,९३४,२२७,७३९ | १८९,६९९,९५६,८७७ |
| २. | इतर उत्पन्न | १६ | १,०३६,३८९,८६१ | २,६६९,७३८,९१० |
| ३. | **एकूण महसूल (१+२)** | | **१९३,९७०,६१७,६०१** | **१९२,३६९,६९५,७८६** |
| ४. | खर्च | | | |
| | (अ) वापरलेल्या साहित्याचा खर्च | १७ | ११३,७५१,६११,८२९ | १२१,८२२,३८७,२७५ |
| | (ब) कर्मचारी लाभ खर्च | १८ | १२,६८३,४११,३४४ | १४,१४९,१६९,८७२ |
| | (क) वित्त खर्च | १९ | २०,०८२,०७७,३५० | १९,५२६,४३५,७०० |
| | (ड) घसारा / कर्जफेडी ची तरतूद | ८ | १२,७५७,१७२,१२० | १०,९१६,५२८,६९५ |
| | (इ) इतर खर्च | २० | १७,३२४,८२५,४४५ | १५,९४५,८९४,१०४ |
| | (फ) पूर्व कालीन बाबी (निव्वळ) | २१ | (४१०,४८१,८६३) | (८०,३०३,८०७) |
| | **एकूण खर्च** | | **१७६,१८८,६१६,२२६** | **१८२,२८०,१११,८३८** |
| ५. | नफा – कर पूर्व ((३)-(४)) | | १७,७८२,००१,३७५ | १०,०८९,५८३,९४८ |
| ६. | असामान्य बाब | २१(अ) | १०५,२०२,४३७,४३० | |
| ७. | नफा – कर पूर्व ((५)-(६)) | | (८७,४२०,४३६,०५६) | १०,०८९,५८३,९४८ |
| ८. | **कर खर्च** | | | |
| | **(अ) चालू कर** | | - | २,४२४,०००,०००, |
| | (ब) स्थगित कर | | ५२५,८०२,०३४ | ३,३०७,७४०,४९० |
| | **नफा / तोटा या कालावधीसाठी** | | **(८७,९४६,२३८,०९०)** | **४,३५७,८४३,४५८** |
| | १. मुळ | | (९.७२) | ०.५२ |
| | २. सौम्य केलेला | | (९.७२) | ०.५२ |
| | कृपया वित्तिय विवरणवत्रासोबत जोडलेल्या टिपा पहाव्यात | | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार
**एम. पी. चितळे ॲन्ड कं. करीता**
सनदी लेखापाल

सी ए आशुतोष पेडणेकर
भागीदार (आयसीएआय एम नं.: ०४१०३७)

**बोरकर आणि मझुमदार करीता**
सनदी लेखापाल

सी ए देवांग वाघानी
भागीदार (आयसीएआय एम नं.: १०९३८६)

**उमेद जैन ॲन्ड कं. करीता**
सनदी लेखापाल

सी ए उमेद जैन
भागीदार (आयसीएआय एम नं.: ०७०८६३)
मुंबई ३ सप्टेंबर २०१६

**महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी करीता**

जे. के. श्रीनीवासन
संचालक वित्त व मुख्य वित्त अधिकारी
डीआयएन नं.:०१२२०८२८

बीपीन श्रीमाळी
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.: ०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.: ए१४२१२

## महानिर्मिती कंपनीच्या वित्तिय विवरणपत्रांवर टिपा

**१) ३१मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तिय विवरण पत्राचा भाग असलेला लेखा धोरणे आणि लेख्यांवरील टिपा.**

ए) वित्तिय विवरणपत्रे तयार करण्याचे आधारतत्त्व

"महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि." ही सार्वजनिकरित्या मर्यादित अशी कंपनी असुन ती कंपनी अधिनियम १९५६ यातील तरतुदी नुसार नोंदणी केलेली कंपनी आहे. ही कंपनी विद्युत अधिनियम २००३ याने प्रशासित केलेली आहे. ज्यावेळी कंपनी अधिनियम २०१३ यातील तरतुदी, विद्युत अधिनियम २००३ ज्याचे सहवाचन त्यानुसार केलेल्या नियमावलीशी विसंगत असतील तेव्हा विद्युत अधिनियमाच्या कलम १७४ च्या अटी नुसार विद्युत अधिनियमातील तरतुदी अभिभावी होती. महानिर्मिती ही एक सतत कार्यरत असणारी चालु स्थितीतील कंपनी आहे. या संकल्पनेच्या आधारे वित्तिय विवरणपत्रे तयार केली आहेत. तसेच उपार्जन तत्वावरील ऐतिहासिक खर्चाची पध्दती यानुसार भारतात सर्व सामान्यत: स्वीकारलेली लेख्यांची तत्वे यानुसार ही वित्तिय विवरणपत्रे तयार केली आहेत. या सर्वसाधारण स्वीकृत लेखा तत्वे यामध्ये कंपनी अधिनियम २०१३ (सदर कायदा) यातील कलम १३३- ज्याचे सहवाचन कंपनी (लेखे) नियमावली २०१४ च्या नियम ०७ सोबत होते, यात विहित केलेली लेख्यासंबधीची मानके आणि कायद्यातील तरतुदी यांचा समावेश होतो.

बी) अंदाजाचा उपयोग

सामान्यत: स्वीकृत लेखा तत्वांशी सुसंगत वित्तिय विवरणपत्रे तयार करताना कंपनीच्या व्यवस्थापनास काही अंदाज करावे लागतात आणि गृहिते धरावी लागतात. हे अंदाज व गृहिते यांचा वित्तिय विवरण पत्राच्या तारखेला मत्ता व दायित्वे तसेच महसुल व खर्च यांच्या अहवाल काळातील रकमांवर परिणाम प्रत्यक्ष निष्कर्ष हे अंदाजापेक्षा वेगळे असु शकतात. अंदाजा संबंधीची परिस्थितीत बदल होत आहे, असे व्यवस्थापनाच्या लक्षात आल्यास अंदाजामध्ये योग्य ते बदल केले जातात. अंदाजातील केलेल्या बदलाचे प्रतिबिंब, त्या कालावधीतील वित्तिय विवरण पत्रात दिसुन येते आणि जर महत्वाचे असेल तर त्याचे प्रकटन वित्तिय विवरणपत्रात केले जाते.

सी) मूर्त स्थिर मत्ता

१) स्थिर मत्तांची नोंद त्यांच्या ऐतिहासिक किंमतीनुसार लेखा पुस्तकात केली जाते. स्थिर मत्ता त्यांच्या संपादनाच्या किंवा त्यांची रचना करण्यास लागलेला खर्च वजा संचित घसारा आणि जर त्या जुन्या / निकामी झाल्यास त्याची तरतुद यानुसार नमूद केल्या जातात. दि. ३१.०३.२०१६ च्या शासण निर्णयान्वये, महाराष्ट्र शासणाने "महाराष्ट्र विद्युत पुर्णेरचना हस्तांतरण योजना, २०१५" जारी केली. शासन निर्णयातील कलम ३ प्रमाणे "महाराष्ट्र विद्युत पुर्णेरचना हस्तांतरण योजना,२०१५ "यामध्ये सुधारणा केली व या योजनेत मत्तांच्या मुल्यांकनासंबंधी कलम १० अ चा अंर्तभाव करण्यात आला. कलम १० अ अन्वेय महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मत्ता महाराष्ट्र शासनास शासन आदेशान्वेय हस्तांतरण करण्यात आल्या. त्या मत्तांचे पुर्णे हस्तांतरण महानिर्मितीसह नविन स्थापण झालेल्या ५-६-२००५ या दिवशीच्या मत्तांच्या बााजारमुल्याप्रमाणे करण्यात आले. अशा प्रकारे कंपनीने तीच्या ०५.०६.२००५ या रोजी असलेल्या नक्त मत्तांच्या किंमतीमध्ये जी वाढ ०१.०४.२०१५ या दिवशी केलेली आहे, तेवढ्याच प्रमाणात कंपणीने तिच्या स्थिर मत्तांची किंमत वाढविली आहे.

२) मत्ता: संपादनाच्या खर्चामध्ये वाहतुक खर्च, शुल्क, कर (जो नंतर कर प्राधिकाऱ्याकडून परत मिळणार आहेत त्या व्यतिरिक्त ) अन्य वसुली, खर्च आणि त्या वापरासाठी योग्य करण्यासाठीचे सर्व प्रासंगिक खर्च समाविष्ट आहेत.

३) कंपनीच्या मालाकीच्या नसलेल्या स्थिर मत्ताच्या निर्मितीसाठी केलेला भांडवली खर्च हा अशा मत्तांचे बांधकाम जोपर्यंत चालु आहे, तोपर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामांच्यामध्ये दर्शविण्यात येते आणि बांधकाम पूर्ण झाल्यावर "कंपनीची मालकी नसलेल्या मत्तांचा भांडवली खर्च" या लेखाशीर्षांतर्गत नोंदला जातो. कंपनीची मालकी नसलेल्या मत्तासाठीचा तसेच कंपन्यांची सामाजिक जबाबदारींची कामे या योगदानासाठी केलेल्या महसुल खर्चाचे आकार नफा व तोटा पत्रकात केले जातात

४) प्रगतीपथावरील चालु असलेल्या ज्या भांडवली कामांकरिता कंत्राटदारांच्या देयकांचे अंतिमीकरण होणे अद्याप बाकी आहे, त्याचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर व अंतिमरित्या चुकती करण्यासाठीच्या समायोजनांच्या अधीन राहून केले जाते.

५) भांडवली कंत्राटाच्या दरातील विचलनाचे दावे, कंपनीने स्वीकारले तरच त्यांचे लेखे केले जातात.

६) ज्यांची मंजुरी विचाराधिन आहे असे प्रकल्प शोधणे, त्यासाठी सर्वेक्षण व सक्षमतेचा अभ्यास करणे यासाठी केलेला खर्च सदर प्रकल्प नाकारला जाणे किंवा तीन वर्षे यापैकी जो कालावधी आधी असेल तोपर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामे यात समाविष्ट केला जातो प्रकल्प नाकारल्यास, ज्यावर्षी तो नाकारला त्या वर्षाच्या महसुलात तो खर्च आकारला जातो.

७) ज्या स्थिर मत्तांच्या बाबत जर काही शासकीय अनुदान मिळाले तर त्या मत्ता लेखा पुस्तकांत निव्वळ अनुदान स्वरुपात दाखविले जातात

८) ज्या स्थिर मत्तांचा प्रत्येकी किंमत ₹ ५०००/- पर्यंत आहे, त्याचा खरेदी वर्षात पूर्ण घसारा केला जातो. सर्व मोबाइल फोनची किंमत खर्च खरेदी वर्षाच्या महसुलमध्ये आकारली जाते.

९) प्रत्यक्ष वापरातुन निवृत्त केलेल्या व विक्रीसाठी राखुन ठेवलेल्या मत्तांचे मुल्यांकन निव्वळ पुस्तकी मुल्य किंवा निव्वळ वसुली योग्य मुल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार ठरविले जाते व ते इतर चालु मत्ता म्हणून प्रकट केले जाते.

१०) **अमूर्त मत्ता**: अमूर्त मत्तांचे भविष्यातील संभाव्य लाभ कंपनीकडे प्रवाहीत होणार असतील तर खर्चातून कर्जफेडीची संचित तरतुद आणि कमी करण्यातील तोटे वजा करुन त्याचे भांडवली करण केले जाते.

११) प्रगतीपथावरील भांडवली कामे:नवे प्रकल्प /विस्तार याद्वारे होणाऱ्या स्थिर मत्ताचे प्रकरणी असे प्रकल्प / विस्तार कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंत संबधित खर्च यांचे व व्याज यांचे भांडवलीकरण केले जाते.

१२) कंपनीने प्रकल्प व नियोजनाच्या कार्यालयांवर या कालावधीत केलेल्या एकूण खर्चाचे संविभाजन संबंधित अमंलबजावणी चालू असलेल्या प्रल्कपांच्या प्रगती पथावरील भांडवली कामे यांच्या लेखामध्ये रचना चालू असणाऱ्या मत्तांच्या संचयी खर्चाच्या शिलकीच्या आधारे केले जाते.

१३) प्रकल्प / वीज निर्मिती कडे प्रायोगिक टप्यावर चालविल्यानंतर त्यासाठी लागलेला खर्च व त्यातून निर्माण झालेला महसूल यांचे समायोजन भांडवलीकरणाच्या दरम्यान केले जाते.

**डी) उसनवारी खर्च**

पात्र मत्तांचे संपादन किंवा त्यांच्या रचनेसाठी केलेला उसनवारीचा खर्च यांचे भांडवलीकरण अशा मत्तांच्या खर्चाचा भाग म्हणून केले जाते.मत्तांच्या उद्देशित उपयोगासाठी तयार होण्यासाठी जास्त वेळ द्यावा लागतो अशा मत्तांना पात्र मत्तां संबोधिले जाते. भांडवली मत्तांचे संपादन किंवा रचना या संबंधात नसलेले इतर उसनवारी खर्च यांना ते ज्या काळात करण्यात आले,त्या काळातील खर्च म्हणून मान्यता दिली जाते.

**इ) मत्ता - कमी करणे**

कंपनी ताळेबंदाच्या तारखेला रोकडा निर्माण करणारा घटक यात समाविष्ट असणाऱ्या मत्ता कमी करण्याची शक्यता किंवा खात्री दिसत असेल त्याप्रमाणे त्यांचे मुल्य निर्धारण करते जर सीजीयु चालु ठेवण्याचे मुल्य त्यांच्या वसुल होणाऱ्या मुल्यांपेक्षा जास्त असेल तर अशा मत्ताची स्थिती कमी करण्यासाठी तरतुद केली जाते.

**एफ) यंत्राचे महत्वाचे सुटे भाग / विमा :**

१) यंत्राचे जे सुटेभाग कारखाना व यंत्रसामुग्री सोबत मिळविले जातात अणि ज्याचा उपयोग अनियमीत असतो आणि सुट्या भागांची किंमत माहित असली तर त्यांचे भांडवलीकरण वेगळे केले जाते. सुट्या भागांची किंमत माहित नसल्यास, त्यांचे भांडवलीकरण

संबंधित कारखान्या समवेत केले जाते.

२) पुढील वर्षात खरेदी केलेल्या यंत्रसामुग्रीच्या सुट्या भागांचे त्यांच्या खरेदी वर्षात भांडवलीकरण केले जाते

३) यंत्रांच्या सुट्या भागांचा घसारा, त्यांच्या संबंधित कारखाना व यंत्रे यांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्याकरिता, पूर्णपणे करण्यात येतो

४) ज्या वर्षी यंत्राचे जुने सुटे भाग बदलण्यात येतात आणि संबंधित आधीचे जुनाट भाग पुढील उपयोगासाठी निरुपयोगी असल्याचे निदर्शनास येते, त्यावेळी ते महसुलात आकारले जातात मात्र संबंधित जुनाट भाग दुरुस्ती करुन पूर्नवापर योग्य असल्यास दोन्हीचा घसारा, संबंधित मत्तांच्या उपयुक्त उर्वरित आयुष्यापर्यंत चालू ठेवण्यात येतो. जुन्या संबंधित भागाच्या दुरुस्तीचे आकार नफा व तोटा पत्रकात केले जातात.

५) ज्यांची कमी केलेली किंमत माहित नाही, असे मत्तांचे मूळ भाग / भांडवली सुटे भाग बदलल्यास,मत्तांचे नवीन भाग/ भांडवली सुटे भाग यांची किंमत/निव्वळ पुस्तकी मुल्य त्यावर्षीच्या महसुली खर्चात समाविष्ट केले जाईल.

**यंत्राचे सुटे भाग यंत्राचे महत्वाचे भाग / विमा या व्यतिरिक्त :**

६) वस्तूसूचीचा भाग असणारे व वेटेड ॲव्हरेज बेसीस किंवा निव्वळ वसुली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्या किंमतीला मूल्यांकन केलेले व जेव्हा दिले ज्याचा खर्च लावला आहे अशा इतर सुट्या भागांना "भांडार वस्तू व सूटे भाग " समजण्यास येते.

**जी) घसारा / कर्जफेडीची तरतूद**

१) मूर्त स्थीर मत्ता:

कंपनी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी त्यांचा "म.वि.नि. आयोग (बहू-वर्षीय दर)" नियमावली २०११ यांद्वारे अधिसूचित केलेल्या दराचे अनुसरण करते. हे दर १ एप्रिल २०११ पासून लागू झाले आहेत. त्याप्रमाणे घसारा सरळ रेषा पध्दतीने मत्तांच्या किंमतीच्या ९० टक्क्यापर्यंत लागू करण्यात येतो. घसाऱ्याची ही नवी पध्दत दि.१ एप्रिल २०१३ पासून सुरु होणाऱ्या लेख्यांच्या कालावधीत लागू केला आहे.

महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र विद्युत पुर्नरचना हस्तांतरण (प्रथम सुधारणा) योजना, २०१६" ३१.०३.२०१६ च्या आदेशान्वये जाहिर केली. या योजनेतील कलम ३ प्रमाणे पूर्वीची "महाराष्ट्र विद्युत पुर्नरचना हस्तांतरण, २००५" या योजनेची सुधारणा केली आणि यामध्ये मालमत्ता मुल्यासंबंधी कलम१० अ चा अंतर्भाव करण्यात आला. कंपनीने या योजनेअंतर्गत मालमत्तांचे बाजारमुल्य वाढविले व नविन बाजारमूल्याप्रमाणे मालमत्तांचा घसारा खालील प्रमाणे ठरविण्यात आला.

ज्या मालमत्ताचा घसारा हा त्या मालमत्तांच्या मूल्यांच्या ९०% इतका ३१.०३.२०१५ पूर्ण असल्यास या मालमत्तांच्या मूल्यामध्ये बाजारमूल्य प्रमाणे ९०% इतकी झालेली वाढ हि घसारा म्हणून गणन्यात आलाी.

ज्या मालमत्तांची ३१.०३.२०१५ पूर्वी विल्हेवाट लावण्यात आली- अशा मालमत्तांची १०० % मूल्यांमधील वाढ ही नफा व तोटा पत्रकात वर्ग करण्यात आली.

ज्या मालमत्तांचा घसारा हा ३१.०३.२०१५ पूर्वी त्या मालमत्तांच्या मूल्यांच्या ९०% इतपत झालेला नाही . अशा मालमत्तांचा घसारा हा त्यांच्या पूर्वीच्या घसाराच्या प्रमाणात नविन वाढविलेल्या बाजारमूल्याप्रमाणे गणन्यात आला.

वर्षभरात ज्या स्थिर मत्तांची भर झाली / विल्हेवाट लावली/काढून टाकल्या त्यांचा घसारा यथाप्रमाण तत्वांच्या आधारे भर/विल्हेवाट/काढून टाकणे, यांच्या महिन्यांच्या संदर्भानुसार केला जातो.तसेच हरीत क्षेत्र /ब्राउन फिल्ड यांचे भाडवली करण्याच्या प्रकरणात घसाऱ्यांची आकारणी, नफा व तोटा पत्रकात वाणिज्य प्रकल्पाच्या कार्यान्वित होण्याच्या तारखेपासून केली जाते.

जेव्हा एखाद्या मत्तेचे आयुष्य नुतनीकरण व आधुनिकीकरण यामुळे वाढविले जाते तेव्हा त्यासाठीचा खर्च व त्यासाठी कर्जेफेडीची तरतुद नसलेली घसारा योग्य रक्कम ही तांत्रिक मूल्यांमापनातून निश्चित केलेल्या संभाव्य सुधारीत उपयुक्त आयुष्यासाठीच

आकारली जाते.

भाडेपट्टीच्या जमिनीसाठी कर्ज फेडीची तरतुद सामान्यत: त्यांच्या भाड्याच्या कालावधीसाठी केली जाते. मात्र जमिनीत गुंतवणूक म्हणून भाडेपट्टीने घेतलेल्या जमिनी वापरण्या योग्य करण्यासाठी केलेला खर्च याकरिता घसारा सरळ रेषा पद्धतीने ३.३४ % प्रति वर्ष या दराने आकारले जातो.

२) ज्या मत्तांच्या (येथे खालील परिच्छेद क्र. (३) यामध्ये नमूद केलेल्या मालमत्ता व्यतिरिक्त) घसारा, त्या कार्यान्वित झाल्यापासून ७० टक्के पर्यंत आकारलेला नाही, त्यांना कंपनी खालील विहित दराने घसारा आकारते. संचित घसारा ज्या वर्षी ७० टक्के होतो, त्या वर्षाच्या अखेरीकरीता अशा मत्तांच्या एकूण गटांसाठी हिशेब केला जातो.

मत्तांचे घसारा राखीव ७० टक्के पूर्ण झाल्यानंतर त्यांचे उपयुक्त उर्वरित आयुष्याच्या आधारे ७० टक्के घसारा कंपनी आकारते. म.वि.नि. आयोगाचे बहुवर्षीय दर नियमन यानुसार औष्णिक व वायु आधारित वीज निर्मिती केंद्राचे आयुष्य २५ वर्षे आणि जल विद्युत निर्मिती केंद्राचे आयुष्य ३५ वर्षे विहित केले आहे.

| | |
|---|---|
| जल विद्युत केद्रातील कारखाने व यंत्रसामुग्री बाष्प वीज व वायु आधारित वीज निर्मिती केंद्र व कुलींग टॉवर्स, हायड्रालिक वर्क्स, ट्रान्स्फॉर्मर व इतर स्थिर उपकरणे, पारेषण तारा, केबल नेटर्वक इ. | ५.२८% |
| इमारत व इतर स्थापत्य बांधकामे | ३.३४% |

३) खालील मत्तांसाठी घसारा सरळ रेषा पध्दतीने ९० टक्क्या पर्यंत किंवा मत्तांवर खाली दिलेल्या दराने आकारले जातो.

| | |
|---|---|
| फर्निचर, जाडणी व कार्यालयीत उपकरणे | ६.३३% |
| वाहने | ९.५०% |
| माहिती तंत्रज्ञानाची उपकरणे | १५.००% |

४) **अमूर्त मत्ता :**

नविन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी करुन त्याची कार्यवाही बाह्य तिसऱ्या पक्षाच्या सल्लागाराकडून करणे व त्याचे परवाने खरेदी करणे. यासाठीचे भांडवलीकरण केलेल्या कर्जफेडीची तरतुद त्यांचे अंदाजित उपयुक्त दहा वर्षापेक्षा जास्त नाही असे गृहित धरुन केली जाते. इतर कर्जफेडीची तरतुद करताना त्यांच्याकडून पुरेसे आर्थिक लाभ ज्या मुदतीसाठी मिळतील तेवढ्या मुदतीसाठी केली जाते.

**एच) वस्तूसूची**

भांडार साठ्यातील साहित्यामध्ये कोळसा गिरण्यांनी नाकारलेला माल, भांडारातील पडीक वस्तु, सुटेभाग यांचे मुल्यांक त्याच्या किमतीपेक्षा किंवा निव्वळ वसुल होण्याजोगे मुल्य याप्रमाणे केले जाते, आणि त्यांचा खर्च मुव्हींग वेटेड ॲव्हरेज कॉस्ट मेथड या पद्धतीने निश्चित केली जातात. खर्चामध्ये खरेदी खर्च (मुल्य वर्धीत खर्चाचा मिळू शकणारा निव्वळ परतावा) आणि त्यांना सध्याच्या जागी व स्थितीमध्ये आणण्यासाठी केलेले इतर खर्च यांचा समावेश होतो. पोलादी भंगार व कोळसा गिरण्यांनी नाकारलेला माल हे वस्तुसुचीतील वस्तु म्हणून मान्यता दिली जात नाही.

आढावा घेतल्यनंतर, निरुपयोगी व जुनाट माल तसेच सुटेभाग निश्चित केले जातात आणि त्यासाठी लेखांमध्ये तरतुद केली जाते.

**आय) महसुल मान्यता :**

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने केलेल्या मंजुरी दराच्या आधारे वीज विक्रीचा लेखा केला जातो. त्यामध्ये इंधन समायोजन आकार समाविष्ट असतो तसेच लेखांच्या मुदतीच्या अखेरपर्यंत उपार्जित झालेला विनादेयक महसुलचा, म.वि.नि. आयोगाकडून समायोजनाच्या मंजुरीच्या अधीन राहून, समावेश करण्यात येतो. याशिवाय या महसुलामध्ये महावितरण कंपनीसोबत केलेल्या वीज खरेदी कराराच्या अटीनुसार महावितरणावर आकारलेल्या विलंब भरणा अधिभार समाविष्ट असतो.जेव्हा मोजणी किंवा गोळा करणे याशियाव कोणतीही महत्त्वाची अनिश्चितता नसेल, तेव्हा कंपनी महसुल उत्पन्नात मान्यता देते.

फ्लाय ॲश (राख) विक्रीचा लेखा ग्राहकांनी मान्य केलेल्या दराप्रमाणे नोंदला जातो. या विक्रीतुन मिळलेली रक्कम पर्यावरण व वन मंत्रालयाने दि. ०३-११-२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार फ्लाय ॲश वापर निधी या वेगळ्या लेखाशीर्षात केली जाते.राख वापरास प्रोत्साहन देण्यासाठी करावयाच्या खर्चासाठी या निधीचा उपयोग केला जातो.

इतर उत्पन्न उपार्जन तत्वावर मान्य केले जाते. भंगार विक्री आणि नाकारलेला कोळसा इ. यांचे खरेदीदार जेव्हा कंपनीच्या जागेतुन असे भंगार प्रत्यक्षात उचलून नेतात आणि कंपनी अशा विक्री व्यवहाराचे बीजक तयार करते तेव्हांच त्यांचे लेखे केले जातात. परिसमापनातील नुकसानाची वसुली व कंत्राटरांना दिलेल्या अग्रीमाचे व्याज ज्यावर्षी ते प्रत्यक्षात होइल. त्यावर्षी त्यांना उत्पन्न म्हणून मान्यता दिली जाते / स्थिर मत्तांमध्ये समायोजन केले जाते.

**जे) गुंतवणूकी**

दीर्घ मुदतीच्या गुंतवणूक यांचे वर्गीकरण 'चालु नसलेल्या" असे केले जाते आणि त्यांची किंमत वजा हंगामी व्यतिरिक्त होणाऱ्या घटीसाठीची तरतुद यानुसार गुंतवणूकीच्या मुल्यानुसार त्यापुढे नेल्या जातात.

**के) परकीय चलनातील व्यवहार**

परकीय चलनातील व्यवहाराची नोंद प्रारंभिक अहवालातील चलनानुसार केली जाते. त्यासाठी परकीय चलनातील रक्कमेस अहवालातील चलन व परदेशी चलन यातील व्यवहारच्या तारखेला लागु असलेल्या वित्तिय दर लागु करुन नोंद केली जाते. ताळेबंदाच्या तारखेस, परकीय चलनातील बाबींची नोंदणी अखेरच्या दरानुसार वापरुन केली जाते. जर काही हानी किंवा प्राप्ती असेल तर त्यास त्या वर्षीच्या नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. पैसे भरण्याची तारीख व व्यवहाराची तारीख या दिवशीच्या फरकामुळे पूर्वीच्या रुपांतरीत मुल्यामुळे होणारी प्राप्ती किंवा हानी, नफा व तोटा पत्रकात आकारली जाते.

**एल) कर्मचारी लाभ**

**१) अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ**

कर्मचाऱ्यानी दिलेल्या सेवेच्या बद्दल त्यांना अपेक्षित अल्पमुदतीच्या कर्मचारी लाभाच्या आणि विना सवलतीच्या रक्कमेला कंपनी दायित्व (उपर्जित खर्च) म्हणून मान्यता देते.

**२) नोकरी नंतरचे लाभ**

**व्याख्यांकित लाभ योजना**

**उपदान व रजेचे रोखीकरण :**

व्याख्याकित लाभ योजना व नोकरी नंतरचे अन्य लाभ यांच्या दायित्वाची गणना प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड ही पध्दत वापरुन केली जाते आणि ज्या मुदतीमध्ये कर्मचाऱ्याची सेवा प्राप्त होणे अपेक्षित आहे, त्या मुदतीकरिता तिचे कार्यकाल योजन केले जाते.

नोकरीनंतरच्या लाभासंबंधी विमागणिती शास्त्रानुसार होणारे लाभ व हानी यांची नफा व तोटा पत्रकात आकारणी केली जाते.

**भविष्य निर्वाह निधि लाभ**

कंपनी, भविष्य निर्वाह निधीसाठी एका पूर्वनिश्चित केलेल्या दराने आपले अंशदान व त्यासोबत कर्मचाऱ्याचे अंशदान यांचा भरणा एका वेगळ्या विश्वस्त संस्थेकडे करते. ही विश्वस्त संस्था इतर कंपनीच्या गटाच्या निधीचे सुध्दा व्यवस्थापन करते.या निधीची गुंतवणूक पूर्व परवानगी मिळालेल्या प्रतिभूतींमध्ये करण्यात येते. या निधीमध्ये ठरलेल्या कालावधीसाठी केलेले अंशदान याला खर्च म्हणून मान्यता देण्यात आली असून त्याची आकारणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

**एम) भाडेपट्टी**

**वित्तिय भाडेपट्ट्या**

वित्तिय भाडेपट्टीने संपादित केलेल्या ज्या मत्तांच्या मालकीची संपूर्ण जोखीम व मोबदला यांची जबाबदरी कंपनीवर आहे, अशा मत्तांचे भांडवलीकरण आरंभीच्या किमान रास्त मुल्याच्या आधारे किंवा सध्याच्या किमान भाडे या पैकी जे कमी असेल भरणा यानुसार केले जाते आणि त्यांच्या समान रकमेचे दायित्व निर्माण केले जाते. प्रत्येक मुदतीवरील थकबाकीच्या दायित्वावर स्थिर मुदतीच्या व्याजदर मिळवा यासाठी भरलेल्या भाड्याचे नियत वाटप दायित्व व व्याजखर्च यात केले जाते. जल विद्युत निर्मितीच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र शासनासोबत भाडेपट्टीचा करार केलेली नाही

**प्रवर्तन भाडे**

भाड्याने घेतलेल्या ज्या मत्तांच्या जोखीम व मोबदला भाड्याने देणाऱ्याकडे आहे त्याचे वर्गीकरण प्रवर्ती भाडे असे केले जाते व त्या भाड्याचा भरणा सरळ रेषा तत्वानुसार खर्च म्हणून मान्य केला जातो.

**एन) कर**

१) **आयकर**

आयकर अधिनियम १९६१ यातील तरतुदीनुसार वार्षिक करपात्र उत्पन्नाप्रमाणे या वर्षाचा चालु कर निश्चित केला आहे. त्यासाठी परवानगी प्राप्त सवलत, कंपात / नामंजुर बाबी इ. चा हिशेब करण्यात आला आहे. आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ११५ जेबी मधील एम.ए.टी. तरतुदीनुसार चालु करारांची तरतुदनुसार जेव्हा केली जाते, तेव्हा त्याचा भरणा जमा करण्यासाठीचे लाभ कराचे निर्धारण केल्यानंतरच्या १० निर्धारण वर्षा करिता सलग उपलब्ध असतात आणि ते जेव्हा प्रत्यक्ष वसुल केले जातील, तेव्हा त्यांना मान्यता देण्यात येते.

२) **स्थगित कर**

स्थगित कर हा एक विशिष्ट मुदतीमधील करपात्र उत्पन्न आणि लेखा नोंदीतील निर्माण झालेले उत्पन्न यांच्यातील फरकानुसार मान्य केला जातो आणि हा स्थगित कर एक किंवा जास्त मुदतीमध्ये उलटी नोंद करण्यासाठी पात्र असतो आणि तो लेखा मानक – २२ : उत्पन्नावरील कराचा लेखा, यानुसार कराचे दर व कायदे तसेच त्यानंतरचे ताळेबंदाच्या तारखेपर्यंत केले असलेले कायदे सुज्ञपणे लागु करणे या कृतीच्या अधीन असतो.

स्थगित कर मत्तांना त्याची भविष्यातील वसुलीची खात्री असेल तर त्यांना मान्यता देण्यात येते.

**ओ) पूर्वकालीन बाबी व असाधारण बाबी**

या पूर्वीच्या वर्षातील झालेल्या विवरण पत्रातील चूक-भूल यांच्या समायोजनांची नोंद पूर्वकालीन बाबी या अंतर्गत लेखा नोंद केली जाते.

कंपनीच्या सर्वसाधारण पणे असणाऱ्या कृतीपेक्षा वेगळ्या असणाऱ्या घटना व व्यवहारामधून मिळणारे उत्पन्न व संबंधातील खर्च हे असाधारण बाब म्हणून गणले जातात. लेखा विवरणपत्रामध्ये अशा गोष्टी निर्देशित केल्या जातात. त्याचप्रमाणे, कंपनीच्या अखत्यारित

नसलेल्या बाह्य घटनेमुळे, कंपनीच्या उत्पन्न व खर्चावर खूप मोठा परिणाम होत असल्यास, त्यांना असाधारण बाबी म्हणून गणण्यात येऊन तसे निर्देशित केले जाते.

काही ठराविक प्रसंगी, कंपनीच्या सर्वसाधारण कृतीसंबंधीत उत्पन्न व खर्च यांचा आवाका, प्रकार यांचा निर्देश केल्यास, कंपनीची कामगिरी समजण्यामध्ये सुधारणा होत असल्यास अशा बाबी असाधारण बाबी म्हणून निर्देशित केल्या जातात.

**पी) तरतुदी, आकस्मिक दायित्त्वे आणि आकस्मिक मत्ता**

जुन्या घटनांच्या परिणामामुळे ज्यांचे सध्या बंधन आहे, आणि त्यामुळे संसाधनाचे बहिर्गमन होण्याची शक्यता आहे, अशा महत्वाच्या अंदाजित तरतुदींना मान्यता दिली जाते.

ज्या प्रकरणी आकस्मिक दायित्वे व्यक्तिश: ₹ १० लाख पेक्षा जास्त मुल्य असतात, ती प्रकट केली जातात. वित्तिय विवरणापत्राच्या मंजुरीच्या तारखेपर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे आकस्मिक दायित्वांचे परिणाम प्रकट केले जातात. आकस्मिक मत्तांना वित्तिय विवरणपत्रात मान्यता दिली जात नाही.

**क्यू) शासकीय अनुदान धोरण**

विनिर्देशीत स्थिर मत्तांशी संबंधित शासकीय अनुदाने अशा स्थीर मत्तांच्या ठोक मुल्यातुन वजा केल्या जातात. जी शासकीय अनुदाने महसुलाच्या संबंधीत आहेत, त्यांचा लेखा, एका विशिष्ट पध्दतीच्या आधारे त्याला योग्य कालावधीसाठी आणि ज्या खर्चाच्या भरपाई करण्याच्या हेतुसाठी दिली आहेत त्याला अनुरुप पध्दतीने केला जातो.

**आर)रोकडता प्रवाह विवरण पत्रक**

लेखा मानक ३- रोकडता प्रवाह विवरण पत्रक यात विहित केलेल्या अप्रत्यक्ष पध्दतीनुसार रोकडता प्रवाह विवरण पत्रक तयार करण्यात आले आहे.

**एस) प्रतिभाग मिळकत (इ.पी.एस.)**

यामध्ये सुधारणा केल्या व या योजनेत मत्तांच्या मूल्यांकनासंबंधी कलम १० अ चा अंतर्भाव करण्यात आला. या कलमान्वये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मत्ता महाराष्ट्र शासनास शासन आदेशान्वये हस्तांतरण करण्यात आल्या त्या मत्तांचे पूर्णहस्तांतरण महानिर्मितीसह नविन स्थापन झालेल्या कंपन्यास ०५-०६-२००५ या दिवशीच्या मत्तांच्या बाजारमूल्याप्रमाणे करण्यात आले.

या योजनेअन्वये, स्थिर मत्तांचे वक्त मूल्य ₹३,५६६ कोटींहून ₹१८,६७७ कोटी इतके झाले परिणामी कंपनीच्या मत्तांच्य मूल्याकंनामधील वाढ ही ₹१५,१११ कोटी असून, कंपनीच्या इतक्याचे मूल्यांचे भागभांडवलाचे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीस देण्यात आले.

याप्रमाणे मत्तांचे ढोबळ मूल्य हे त्या मत्तांच्या ०५-०६-२००५ या दिवशी असलेल्या ढोबळ मूल्यांच्या प्रमाणात ₹१५,६११ कोटीने वाढविण्यात आले. मत्तांच्या सुधारित मूल्याप्रमाणे प्रत्येक वर्षाच्या घसाराची आकारणी ३१-०३-२०१६ पर्यंत करण्यात आली. याप्रमाणे आकारणी केलेले घसारा मूल्य हे ₹ ९,४११कोटी इतके आहे. याचबरोबर, ज्या मत्ता ०५-०६-२००५ या दिवशी अस्तित्वात होत्या, पण पुढीलकाळात ज्यांची विल्हेवाट लावण्यात आली, अशा मत्तांचे सुधारित मूल्य ₹१,१०९ कोटी हे चालू आर्थिक वर्षामध्ये नफा-तोटा खात्यास वर्ग करण्यात आले. वरील दोन्ही बाबी या नफा-तोटा पत्रकात विशेष बाबी म्हणून दर्शविण्यात आल्या आहेत.

**एल) घसारासंबंधीची आगाऊ येणी :**

कर्जाची मुद्दल व घसारा यांमधील अंतर भरुन काढण्याकरीता महाराष्ट्र विद्युत नियमाक आयोगाच्या नियमावलीन्वये घसारासंबंधीचे आगाऊ येणी हे उत्पन्न म्हणून देण्यात आले. यान्वये, कंपनीच्या धोरणाप्रमाणे वरील उत्पन्न कमी दर्शविण्यात आले पण त्याचबरोबर

तेवढ्याच मूल्याची वर्षे २०१५-२०१६च्या ताळबंदपत्रकात देणी दर्शविण्यात आली वरील घसारा संबंधीची येणी ही. परळी संच क्र. ६ व ७, पारस संच क्रमांक ३ व ४ आणि खापरखेडा संच क्र.५ संबंधीची आर्थिक वर्षे २०१२-२०१३ मधील आहेत. वरील सर्व आगाऊ येणी ही आर्थिक वर्षे २०२४-२०२५ म्हणजेच कर्जाच्या मुदतीपुर्तीनंतर उत्पन्न म्हणून दर्शविण्यात येतील.

**एम)** पूर्वीच्या वर्षासंबंधीचे आकडे गरज असेल त्याप्रमाणे पूर्णगणित करण्यात आले आहेत.

## दि. ३१.०३.२०१६ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे रोकडता प्रवाह विवरण पत्र

(रक्कम ₹ मध्ये)

| तपशिल | २०१५-१६ | | २०१४-१५ | |
|---|---|---|---|---|
| **प्रवर्तन कार्यापासूनचा रोकडता प्रवाह** | | | | |
| **निव्वळ नफा करोत्तर** | | (८७,९४६,२३८,०९०) | | ४,३५७,८४३,४५८ |
| खालील समायोजने | | | | |
| करासाठी तरतूद | ५२५,८०२,०३४ | | ५,७३१,७४०,४९० | |
| चालू वर्षाची व पूर्वीचा घसारा आणि कर्जफेडीसाठी तरतूद | १०७,०२७,७६५,००८ | | १०,८७४,६८४,९९५ | |
| व्याजाचे उत्पन्न | (२,२९५,५१३) | | (४,३८०,४३४) | |
| व्याज आणि वित्तीय आकार | २०,०८२,०७७,३५० | १३९,६८५,०४७,८७० | १९,५२६,४३५,७०० | ३५,०३४,५९४,४७८ |
| निकामी साहित्यासाठी तरतूद | १४१,०३६,०६६ | | ६८६,८३३,०७५ | |
| निकामी भांडवली मत्तांसाठी तरतूद | २८२,०६०,१९२ | | २५,१८६,०५० | |
| स्थिर मतांच्या विक्रीचा नफा | (८३,४८४) | | (७५,०६३,९६९) | |
| स्थित मतांच्या विक्रीचा तोटा | ११,०६४,९६७,४१३ | | १,१२५,१७९ | |
| परकीय चलनातील प्राप्ती | ० | | (१,८६०,८८१,०४७) | |
| बुडीत कर्जासाठी तरतूद | ५६३,७१८,८०४ | | १२८,९१४,४३९ | |
| **प्रवर्तनाचा नफा - खेळत्या भांडवलातील बदलापूर्वीचा** | | | | |
| व्यापारी व इतर येणी | (९,८१२,६९९,९७९) | | (२७,३६३,६५५,२९९) | |
| वस्तूसूची | (४,९३४,४९४,३६१) | | २,२२७,९५३,८३८ | |
| व्यापारी व इतर देणी व कर्मचारी लाभाची तरतूद | (३२,२६०,९२३,४०१) | | ९,४१०,०७५,५१२ | |
| **प्रवर्तनाच्या कार्यापासूनची निव्वळ** | | | | |
| **रोकड** | | (४७,००८,११७,७४१) | | (१५,७२५,६२५,९४९) |
| भरलेली कर | (१,७६६,१४०,८७०) | | (१,२०४,९३२,७७८) | |
| | | (१,७६६,१४०,८७०) | | (१,२०४,९३२,७७८) |
| **प्रवर्तनाच्या कार्यापासूनची निव्वळ रोकड** | | २,९६४,५५१,१६९ | | २२,४६१,८७९,२०९ |
| **गुंतवणूक कार्यापासून** | | | | |
| स्थिरमताची खरेदी यामध्ये प्रगतीपथावरील | | | | |
| भाडंवली कामे समाविष्ट | (१९३,१७१,७२७,७१७) | | (३२,३३४,५८६,४३९) | |
| स्थिरमताची विक्री यामध्ये प्रगतीपथावरील भाडंवली कामे समाविष्ट | १२,००४,९२५,६५४ | | | |
| खरेदी / विक्री गुंतवणूकीची संयुक्त | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उपक्रमाची | ० | | २५,०००,००० | |
| खरेदी / विक्री गुतंवणूकीची इतर | ५००,००० | | ० | |
| व्याजाचे उत्पन्न | २,२९५,५१३ | | ४,३८०,४३४ | |
| | | (१८१,१६४,००६,५५०) | | (३२,३०५,२०६,००५) |
| **वित्तीय कार्यापासून** | | | | |
| अनुदानात वाढ | १७९,१८८,०५९ | | २५,७३४,३३३ | |
| समभागात वाढ | १५८,६६७,४०४,३६८ | | ७,४६३,१६३,००० | |
| कर्ज/उसनवारे | ३८,०७५,४९०,३३५ | | २२,२६४,७७६,९४६ | |
| व्याज व वित्त आकार | (१८,१८१,९६४,९४३) | | (१९,४४८,२६०,३३५) | |
| | | **१७८,७४०,११७,८२०** | | **१०,३०५,४१३,९४४** |
| **रोकडतेमधील निव्वळ वाढ / घट** | | **५४०,६६२,४३९** | | **४६२,०८७,१४८** |
| **आरंभीची शिल्लक** | | | | |
| रोख | ६४१,१९० | | १,५२५,६४९ | |
| बँक | ९०१,९६३,४६२ | ९०२,६०४,६५२ | ४३८,९९१,८५५ | ४४०,५१७,५०४ |
| **अखेरची शिल्लक** | | | | |
| रोख | ५०६,५२१ | | ६४१,१९० | |
| बँक | १,४४२,७६०,५७० | १,४४३,२६७,०९१ | ९०१,९६३,४६२ | ९०२,६०४,६५२ |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**एम. पी. चितळे अॅन्ड कं. करीता**

सनदी लेखापाल

सी ए आशुतोष पेडणेकर

भागीदार (आयसीएआय एम नं.: ०४१०३७)

**बोरकर आणि मझुमदार करीता**

सनदी लेखापाल

सी ए देवांग वाघानी

भागीदार (आयसीएआय एम नं.: १०९३८६)

**उमेद जैन अॅन्ड कं. करीता**

सनदी लेखापाल

सी ए उमेद जैन

भागीदार (आयसीएआय एम नं.: ०७०८६३)

मुंबई ३ सप्टेंबर २०१६

**महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी करीता**

जे. के. श्रीनीवासन

संचालक वित्त व मुख्य वित्त अधिकारी

डीआयएन नं.:०१२२०८२८

बीपीन श्रीमाळी

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

डीआयएन नं.: ०३२७२१३५

पंकज शर्मा

मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

राहूल दुबे

कंपनी सेक्रेटरी

एम नं.: ए१४२१२

## स्वतंत्र लेखारिक्षक यांचा अहवाल

प्रति,

सर्व सदस्य,

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि . मुंबई

**कंपनीच्या एकत्रीत वित्तिय विवरण पत्रांवर अहवाल**

१. आम्ही यासोबत जोडलेले महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (यानंतर त्यांचा उल्लेख सुत्रधारी कंपनी असा केला आहे) अणि तिच्या उकंपन्या (यानंतर सुत्रधारी कंपनी आणि तिच्या उपकंपन्या दोन्ही मिळून त्यांचा उल्लेख गट असा केला आहे.) ज्या दि. ३१मार्च २०१६ रोजीच्या एकत्रित ताळेबंदामध्ये समाविष्ट आहेत. त्यांची वित्तीय विवरणपत्रे आणि त्यादिवशी संपलेल्या वर्षाच्या नफा व तोटा यांचे एकत्रित विवरणपत्र आणि महत्त्वाच्या लेखाधोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती याचे लेखा परिक्षण केले. (यापूढे याचा सर्वांचा उल्लेख एकत्रित केलेली विवरण पत्रे असा करण्यात येईल)

**एकत्रित वित्तिय लेखापत्रकांबाबत कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी :**

२. सुत्रधारी कंपनीचे संचालक मंडळ कंपनी अधिनियम २०१३ चे (अधिनियम) कलम१३४(५) यात सांगितलेल्या विषयांनुसार गटाची एकत्रित वित्तिय स्थिती व कामगिरी यांचे सत्य व रास्त दर्शन घडविणारी एकत्रित वित्तिय विवरणपत्रे तयार करणे, यासाठी जबाबदार आहे. भारतात सर्वसामान्यपणे स्वीकारलेल्यान लेखा तत्वानुसार आणि या अधिनियमातील कलम १३३ ज्याचे सहवाचन कंपनीची (लेखा) नियमावली २०१४ यातील ७ यानुसार विनिर्देशित केलेली लेखा मानके विशेषत: मानक २१ एकत्रित वित्तिय विवरणपत्रे याप्रमाणे ही जबाबदारी सुत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाने पूर्ण केली पाहिजे. गटांमध्ये समाविष्ट असलेल्या संबंधित कंपन्यांच्या संचालक मंडळाच्या पुढील जबाबदाऱ्या आहेत. त्या म्हणजे संबंधित कंपन्याच्या मत्तांचे रक्षण करण्यासाठी अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य लेखा अभिलेखांचे जतन करणे व लबाडी व इतर अनियमीतता शोधणे व त्यांना आळा घालणे, योग्य लेखा धोरणे निवडणे व अमंलात आणणे, सुज्ञ व प्रमाणशीर न्यायनिर्णय व अंदाज करणे, अंतर्गत वित्तिय नियंत्रणाची रचना अंमलबजावणी व व्यवस्थापन करणे, त्यांचे प्रभावी संचलन करुन त्यातून लेखांचे अभिलेख अचूक व पूर्ण करण्याची खात्री मिळविणे, उपरिलिखित सुत्रधारी कंपनीच्या संचालकांना त्यांचा वापर करुन कंपनी गटाचे सत्य व रास्त दर्शन घडविणारी आणि कोणत्याही प्रत्यक्ष चुकीची माहिती नसलेली वित्तिय विवरणपत्रे तयार करता येतील .

३. **लेखा परिक्षकांची जबाबदारी :**

आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारे या एकत्रित वित्तिय विवरणपत्रांवर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

अधिनियम व त्यासाठी केलेली नियमावली यातील तरतुदीनुसार आवश्यक असणारी माहिती आमच्या लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट करण्यासाठी आम्ही अधिनियमाच्या तरतुदी लेखांची व लेखापरिक्षणांची मानके याबाबी लक्षात घेतल्या आहेत.

आम्ही उपकंपन्याच्या लेखापरिक्षकांनी दिलेल्या लेखापरिक्षण अहवालावर विश्वास ठेवला आहे. त्याचा संदर्भ खाली दिलेल्या इतर विषय यांच्या परिच्छेदात दिला आहे आणि या विश्वासावर विसंबून आम्ही आमचे लेखा परिक्षण, अधिनियमाच्या कलम १४३ (१०) यात विनिर्देशित केलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकांनुसार केले आहे. या लेखा मानकांनुसार आम्ही नैतीक गरजांची पुर्तता करणे तसेच ही वित्तिय विवरणपत्रके कोणत्याही प्रत्यक्ष गैर विवरणांपासुन मुक्त आहेत किंवा कसे याबद्दल योग्य प्रकारे आश्वासन मिळविण्याच्या दृष्टिने आमच्या लेखा परिक्षणाचे नियोजन करणे व ते पार पाडणे आवश्यक आहे.

कोणत्याही लेखापरिक्षणात एकत्रित वित्तिय विवरणपत्रातील रकमा व प्रकटने यासाठी लेखापरिक्षणात्मक पुरावे मिळविण्याच्या दृष्टिने एका पध्दतीनुसार कार्य करावे लागते. यासाठी लेखा परिक्षक त्यांच्या न्यायबुध्दीवर अवलंबुन योग्य पध्दत निवडतात. त्यामध्ये लबाडी किंवा नजरचुका यामुळे वित्तिय विवरणपत्रांचे गैर विवरण होणाऱ्या धोक्याचे मुल्यांकन करणे समाविष्ट असते या धोक्याचे मुल्यमापन करण्यासाठी, परिस्थितीस अनुरुप अशा लेखा परिक्षणाची रचना ठरविताना, लेखा परिक्षक गटाचे सत्य व रास्त दर्शन घडविणारी एकत्रित वित्तिय विवरणपत्रे

तयार करण्यासाठी, सुत्रधारी कंपनीच्या अंतर्गत वित्तिय नियंत्रणाचा विचार करतात. मात्र या गटाकडे वित्तिय माहिती बाबत पुरेशी आर्थिक नियंत्रणे आहेत की नाहीत, तसेच ही नियंत्रणे प्रत्यक्षात कितपत प्रभावी असण्याबाबत कोणतेही मत व्यक्त करणे, असा लेखापरिक्षकांचा हेतु नसतो. लेखा परिक्षणांमध्ये सुत्रधारी कंपनीच्या संचालकांनी वापरलेल्या लेखाधोरणांच्या योग्यतेबाबत आणि त्यांनी केलेल्या लेखांच्या अंदाजाबाबत तसेच एकत्रित वित्तिय विवरणपत्रांचे सर्वांगिण सादरीकरणाचे मुल्यांकन करणे, यांचाही समावेश होतो.

आमच्या मते आम्ही मिळविलेले लेखा परिक्षणात्कम पुरावे तसेच इतर लेखा परिक्षकांनी त्यांच्या अहवालात मिळविलेले लेखा परिक्षणाचे पुरावे हे येथे खाली नमुद केलेल्या अहवालाच्या व 'इतर विषय' यावरील परिच्छेद हे या एकत्रित वित्तिय विवरणपत्रांवर आमचे लेखा परिक्षणात्मक मत व्यक्त करण्यासाठी आधार देतात.

**४. पात्रतेच्या मतांचा आधार**

आम्ही खालील बाबींवर लक्ष वेधतो

*१. कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि. सोबत वीज खरेदी कराराच्या अटीनुसार ग्राहकांकडून अधिभाराची रक्कम या लेखाशीर्षाखाली थकीत भरण्यावरील व्याजाची रक्कम ₹१०३९.२६ कोटी वर्षभरातील अधिभाराचे उत्पन्न म्हणून मान्य केली आहे. महावितरणाने अधिभाराचे रक्कम ₹ ६३८.२७ कोटी दि.३१ मार्च २०१६ पर्यंत भरली नव्हती. तसेच बहु वर्षीय वीज दर विनियम, २०११ आणि त्या नंतर आलेल्या सुधारणेनुसार कंपनीने महाराष्ट राज्य वीज पारेषण कंपनीला ₹ ६२.३७ कोटीचे रिॲक्टीव पॉवरचे बील केले परंतु ते महापारेषण ने मान्य केले नाही. महावितरण व महापारेषणने ही देयके स्वीकारले नसल्याने आणि लेखांचा मेळ झाला नसल्याने आम्ही या उत्पन्नाची विश्वासर्हता व त्याचा कंपनीचा या वर्षीचा तोटा, व्यापारी येण्याचे मुल्य, महसुल व राखीव व अधिक्य या बाबींवरील परिणाम यावर अभिप्राय देण्यास असमर्थ आहेत.*

*२. टिपा क्र ३१ लेखावरील टिप यात नमुद केल्याप्रमाणे कर्ज व अग्रीमे यांच्या शिल्लकी ठेवा, जागतिक बँकेकडील कर्जे व माल पुरवठ्याचे दायित्व या प्रकरणांप्रमाणे संबंधित संस्था व्यक्ति यांचेकडून कायम होणे आणि/किंवा त्यांच्या अभिलेखांशी त्यांचा मेळ होणे यांच्या अधीन आहेत.असे कायम होणे व मेळ करणे प्रलंबित असल्याने त्याचे परिणाकारक समायोजना करणे शक्य झालेले नाही. याशिवाय कर्ज व अग्रिमे यांच्या काही शिलकींच्या समजयोग्य मुदतीपेक्षा अधिक काळ थकीत रकमांचा लेखा निहाय तपशील उपलब्ध नाही. त्यामुळे जर त्यातील विशिष्ट खात्यांसाठी तरतुद करणे आवश्यक असेल तर निश्चित करता येत नाही, यामुळे या शिलकींवर पडू शकणारा प्रभाव व कंपनीचा नफा याबाबत आम्ही अभिप्राय व्यक्त करण्यास असमर्थ आहोत.*

*३. लेखांवरील टिपा क्र.३२ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, कर्जे व अग्रिमे यांत कोळसा कंपन्यांना अग्रिमापोटी दिलेल्या ₹७६०.८८ कोटी समावेश आहे. या अग्रिमाबाबत कंपनीने कोळसा पुरवठ्यासंबंधी ₹३७३.५२ कोटीचे दायित्वाची तरतूद केली आहे. याच्या देयकांचे अंतिमीकरण प्रलंबित असल्याने कंपनीने दिलेल्या आग्रिमा दायित्व काढले नाही यामुळे कंपनीच्या मत्ता व दायित्व यांचे जादा विवरण झाले आहे. यावरील बाबींचा कंपनीच्या नफ्यावर होणारा परिणाम निश्चित करता आलेला नाही.*

**पात्र मत**

*५. आमच्या मते व आमची सर्वोतपरी योग्य माहिती व आम्हांस दिलेली स्पष्टिकरणे यानुसार ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रे, अधिनियमानुसार आवश्यक असणारी माहिती त्यासाठीच्या विहित नमुन्यात देतात. मात्र वरील परिच्छेद क्र.४ मधील मुद्दे क्र.१ ते ३ यामध्ये दि. ३१ मार्च २०१६ रोजी वर्षाचा नफा व निव्वळ मत्ता यांच्यावर होणाऱ्या परिणाम अनिश्चित असल्याचे आमचे मताच्या अधीन राहुन ही विवरणपत्रे भारतात सर्व साधारणपणे स्विकारल्या जाणारी लेखा मानके यांच्याशी सुसंगत असुन ती कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१६ रोजी असलेली स्थिती आणि त्या दिवशी दिलेल्या संपलेल्या वर्षाचा कंपनीचा यांचे यथार्थ व योग्य दर्शन घडवितात.*

**प्रकरणांवर भर**

६. आम्ही खालील टिपांवर लक्ष वेधू इच्छितो :

(अ) टिपा क्र. ३५ (अे) (२) जर काही तुट / नफा असल्यास त्याचा लेखा करणे याबाबत भविष्य निर्वाह निधीच्या हंगामी खात्याच्या

आधारित आवश्यक तो तपशिल व माहिती उपलब्ध नसल्यामुळे.

(ब) टिपा क्र. ३५ (डी): कंपनीची (लेखा मानके) नियमावली २००६ अंतर्गत लेखा मानक १९- भाडेपट्टी संबंधी अंतर्गत आवश्यक जी माहिती दिलेली नाही. कारण विविध जल विद्युत केंद्राच्या वीज निर्मिती सुविधाबाबत महाराष्ट्र शासनाच्या सोबत करावयाचा भाडेपट्टी कराराची कार्यवाही प्रलंबित आहे.

(क) टिपा क्र ३५ (आय): महागुज कोलायरीज लि. या उपकंपनीच्या गुंतवणूकीतील तोट्याचा लेखा न करण्याबद्दलचे समर्थना संबंधी.

(ड) टिपा क्र ३५ (के): महाराष्ट्र विद्युत प्रथम सुधारणा हस्तांतरण योजना अंतर्गत काढलेल्या महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३१ मार्च २०१६ रोजीच्या जाहिरनाम्यानुसार स्थिर मत्ताचे वाढीव मूल्य, वाढीव मूल्यावरील घसारा व त्यामुळे झालेली समभागातील वाढ यांच्या लेखा संबंधी.

(इ) धोपावे कोस्टल पॉवल लि. कंपनीने सुत्रधारी कंपनी व तिची सहोदर कंपनी यांच्या कडून एकूण ₹८.३२ कोटीचे कर्ज घेतले. हे कर्ज, तिचे भांग भांडवल ₹ ०.०५ कोटी यापेक्षा खूप जास्त आहे. टिपा क्र. २.१ यात याबाबत लक्ष वेधले आहे की, कंपनीने चालु असणारी संस्था यानुसार कंपनीची वित्तिय विवरणपत्रे तयार केली नाहीत. त्यानुसार प्रवर्तनापूर्वीच्या खर्चासंदर्भातील तोट्याची तरतूद लेखा पुस्तकात केली आहे.

वरील प्रकरणी आमची मते पात्र झालेली नाहीत.

**इतर विषय**

७. आम्ही कंपनीच्या उपकंपन्यांच्या वित्तिय विवरणपत्रांचे लेखा परिक्षण केलेल नाही. त्यांच्या वित्तिय विवतरणपत्रात एकून मत्ता ₹.६२.९१ कोटी व महसुल ₹०.०२ कोटी दाखविला आहे. उपकंपन्यांचा वित्तिय विवरणपत्रांचे लेखा परिक्षण अन्य लेखा परिक्षकांनी केलेले आहे. त्यांचे अहवाल आम्हांला देण्यात आले. एकत्रित वित्तिय विवरण पत्रांबाबत उपकंपन्यांच्या रकमा व प्रकटने याबाबतचे आमचे मत तसेच अधिनियमाच्या कलम १४३ (३) व (११) यानुसार आमचा अहवाल, यामध्ये उपकंपन्यांच्या संदर्भात जे काही असेल ते, पूर्णपणे इतर लेखापरिक्षकांच्या अहवालाच्या आधारे केलेले आहे.

एकत्रित वित्तीय विवरणपत्राबद्दलचे आमचे मत तसेच इतर कायदेशीर व नियमांच्या आवश्यकता या विषयी खाली दिलेला आमचा अहवाल हा वरिल विषयांबाबत इतर लेखापरिक्षक यांचे केलेले काम व त्यांचे अहवाल, तसेच व्यवस्थापनांचे प्रमाणित केलेली वित्तीय विवरणपत्रे / वित्तीय माहीती यांच्या आधारावर आम्ही सुधारणा केलेली नाही.

**इतर कायदेशीर व नियमांच्या आवश्यकता विषयी अहवाल :**

८. सुत्रधारी कंपनी व तिच्या उपउपकंपन्यांच्या लेखापरिक्षण अहलातील परिक्षणाच्या आधारे कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) यातील आवश्यकतेनुसार व भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी दिलेल्या आदेशानुसार कृती, त्यांच्या कंपनीच्या लेखांवर व वित्तिय विवरणपत्रांवर झालेला प्रभाव यांची पूर्तता याबाबतचे आमचे निवेदन परिशिष्ट - १ मध्ये दिले आहे.

९. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (३) यांतील आवश्यकतेनुसार आम्ही खालील अहवाल देतो.

अ) *पात्रतेच्या मतांसाठी आधार या विषयीचा उपपरिच्छेद ४ यात वर्णन केलेली बाब वगळता,* आमच्या लेखा परिक्षणासाठी, आमचे सर्वोतपरी ज्ञान व विश्वास यानुसार आम्हांला आवश्यक अशी सर्व माहिती शोधली व तिची स्पष्टीकरणे मिळविली आहेत.

ब) आमच्या मते, *उपरिनिर्दिष्ट पात्रतेच्या मतांसाठी आधाराचा परिच्छेद वगळता,* कंपनीने, कायद्यानुसार आवश्यक ती योग्य लेखांच्या वह्या, पुस्तके व्यवस्थित ठेवलेली आहेत, असे या वह्या-पुस्तकांच्या आम्ही केलेल्या तपासणीत दिसून आले आहे.

क) या अहवालाशी संबंध असलेले एकत्र ताळेबंद व एकत्रित नफा व तोटा ही पत्रके तयार करण्यासाठी जतन करण्यात आलेल्या लेखा पुस्तकांशी सुसंगत आहेत.

ड) *वरील परिच्छेद ४ मधील आमच्या निरिक्षणांच्या अधिन राहुन आम्ही मत देतो की,* ही एकत्रित वित्तिय विवरणपत्रे कंपनी अधिनियम

२०१३ चे कलम १३३, ज्याचे सहवाचन कंपनी (लेखा) नियमावली २०१४ यातील नियम ७ केले जाते, यात संदर्भ दिलेल्या लेखा मानकांचे, विशेषत: लेखा मानक २१ जे एकत्रित वित्तिय विवरण पत्रांसंबंधी आहे, त्याचे अनुपालन करतात.

इ) शासकीय कंपनी असल्याने भारत सरकारने काढलेली अधिसुचना क्र. जी एस.आर ४६३ (इ) दि. ५ जुन २०१५ यानुसार कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १६४ (२) यातील तरतुदी कंपनीस लागु नाहीत.

फ) कंपनीच्या वित्तिय अहवालावरील पुरेसे अंतर्गत वित्तिय नियंत्रण आणि ह्या नियंत्रणाची प्रर्वतनातील परिणाम कारकर्ता याबाबतच आमचे निवेदन परिशिष्ट - २ मध्ये दिले आहे.

ग) कंपनी (लेखा परिक्षण व लेखा परिक्षक) नियमावली २०१४ यातील नियम ११ यानुसार परिक्षकांच्या समाविष्ट करावयाच्या इतर विषयाबाबत आमची सर्वोत्तम माहिती व आम्हांस दिलेली स्पष्टीकरणे तसेच कंपनीच्या उपकंपन्याच्या अन्य लेखापरिक्षकांनी लेखा परिक्षणे केलेली वेगळी वित्तिय वविरणपत्रे यावर भरवसा ठेवून आमची मते खालील प्रमाणे आहेत.

१) या गटाने प्रलंबित कायदेविषयक खटल्यांचा परिणाम आपल्या वित्तिय विवरणपत्रात प्रकट केल आहे. संदर्भ टिपा क्र. २३- वित्तिय विवरणपत्रांविषयी.

२) सुत्रधारी कंपनी व तिच्या उपकंपन्यानी ज्याकरिता भविष्यात होणाऱ्या प्रत्यक्ष तोटयांकरिता तरतुद करावी लागेल असे दिर्घ मुदतीचे करार केलेले नाहीत. तसेच कंपनीने कोणताही डेरीव्हीटीव करार केलेला नाही.

३) या वर्षात गटातील कोणत्याही कंपनीस गुंतवणुकदार शिक्षण व रक्षण निधीची थकबाकी जमा करावी लागलेली नाही किंवा भरावी लागली नाही.

**बोरकर अॅन्ड मुझुमदार करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन.१०१५६९ डब्ल्यु

सीए देवांग वाघानी
भागीदार
आय सी ए आय एम. नं. १०९३८६
स्थळ : मुंबई
दिनांक : ३ सप्टेंबर २०१६

**उम्मेद जैन अॅन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. ११९२५० डब्ल्यु

सीए यु. एम. जैन
भागीदार
आय सी ए आय एम नं. ०७०८६३

**एम.पी. चितळे अॅन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. १०१८५१ डब्ल्यु

सीए आशुतोष पेडणेकर
भागीदार
आ सी ए आय एम नं. ०४१०३७

## स्वतंत्र्य लेखापरिक्षकांचे अहवालास जोडपत्र – १.

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी व तिच्या उपकंपन्या यांच्या दि. ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता आमच्या समान तारखेच्या अहवालातील इतर कायदेशीर व नियमानाच्या आवश्यकता यांच्या विभागात परिच्छेद क्र. ७ यात दिलेल्या संदर्भानुसार.

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) नुसार निर्देशांवर अभिप्राय धोपावे कोस्टल पाटवर लि. व महागुज कोबयरीज लि. यांच्या संविधिक लेखापरिक्षकांनी कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (५) नुसार आवश्यक असलेला अहवाल सादर केलेला नाही. म्हणून उपलब्ध अहवालानुसार खालील माहिती संकलीत केली आहे.**

१ **जर कंपनीची निर्गुंतवणूक करण्यासाठी निवड करण्यात आली तर मत्ता (अमुर्त मत्ता व जमीनी यासह) आणि दायित्वे (बांधीलकी असलेली व सर्वसामान्य राखीव यासह) यांच्या मुल्यांकनाबत संपूर्ण स्थितीदर्शक अहवालचे परिक्षण करावे, त्यामध्ये निर्गुंतवणूकीची कार्यपद्धती व सहयाच्या कार्याचा टप्पा यांचा समावेश करावा.**

**सुत्रधारी कंपनीचे उत्तर :**

ही कंपनी निर्गुंतवणूकीसाठी निवडलेली नाही. म्हणून यासाठी माहिती देणे कंपनीत लागु नाही.

**धुळे थर्मल औष्णिक वीज कंपनी लि.**

नाही ही कंपनी निर्गुंतवणूकीसाठी निवडलेली नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लागू नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

नाही ही कंपनी निर्गुंतवणूकीसाठी निवडलेली नाही.

२ **जर काही कर्जे / उसनवारी / व्याज इ. सोडुन देणे / निर्देशित करणे याची काही प्रकरणे असली तर त्याची कारणे व त्यात असलेली रक्कम यांचा अहवाल देणे.**

**सुत्रधारी कंपनी :**

लेखा परिक्षणाच्या काळात व आहांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणतेही कर्जे उसनवारी / व्याज इ. सोडुन देणे / निर्देशित करणे याचे कोणतेही प्रकरणे वर्षे २०१५-१६ दरम्यान उदभवलेली नव्हती. कंपनीला मराविंम सुत्रधारी कंपनी मर्यादीत (तिची सुत्रधारी कंपनी) कडून एक पत्र प्राप्त झाले. ज्यात पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विज मंडळाच्या लेखापुस्तकात नमुद असलेल्या अज्ञात मत्ता व दायित्वे कंपनीच्या लेखा पुस्तकात घेण्याचे नमुद केले होते. पालक कंपनीने हे अज्ञात मत्ता / दायित्वे कंपनी व इतर उपकंपन्याना तर्क निर्देशक न वापरता एका ठराविक प्रमाणात हस्तांतरण केली. पालक कंपनीने ह्या अज्ञात मत्ता / दायित्त्वे पुनर्लिखीत / करण्यास कंपनीस कळविले. या शिल्लकीत ₹ २६५ कोटी भांडवली राखीवाचा (कंपनीचा भाग ₹६६ कोटी) समावेश आहे. कंपनीन ह्या मत्ता / दायित्वाला (निव्वळ ₹८६ कोटी) अद्याप मान्यता दिली नाही व व्यवस्थापनाने आम्हास कळविले आहे की, पालक कंपनीकडून याबाबतीत अधिक माहिती मिळवू

**धुळे औ. वि.क.**

यावर्षात कर्जे / व्याज इ. सोडुन देणे / निर्देशित करणे याचे एकही प्रकरण आढळलेले नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

कर्ज माफीचे प्रकरण नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

हो, कार्यान्वयाच्या टप्प्यात प्रकल्पावर आकारलेलेल पूर्व संचालनाचे खर्च लेख्यातून कमी केले, कारण कंपनीने पूर्वीचे प्रकल्प निवृत्त करण्याचे ठरविले होते. ह्यात ₹ ८.२९ कोटीचा समावेश आहे.

३) **तिसऱ्या पक्षाकडे असलेल्या वस्तुमाल आणि शासन व अन्य प्राधिकरणे यांच्याकडून देणगांच्या स्वरुपात मिळालेल्या मत्ता यासाठी योग्य अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे ?**

**सुत्रधारी कंपनी :-**

कंपनी तिच्या वस्तुमाल / सामान तिसऱ्या पक्षाकडे फक्त प्रवर्तनासाठी किंवा जोडणी करण्यासाठीच पाठविते. आम्हांस असे सांगण्यात आले की, वर्षभरात शासनकडून कोणत्याही मत्ता देणगी स्वरुपात कंपनीला मिळालेली नाही

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लागु नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लागु नाही.

४) **कायदेशीर / लवादाकडे प्रलंबित खटल्यांचे वर्ष निहाय विश्लेषणाचा अहवाल देणे त्यात प्रलंबित असल्याची कारणे व सर्व कायदेशीर खटल्यांवरील खर्चावर लक्ष देणारी यंत्रणा अस्तित्वात असल्याबद्दल तिच्या प्रभावी उपयोगाबद्दल ही माहिती समावेश करणे (यात परदेशातील व स्थानिक खटल्यांची ही माहिती देणे)**

**सुत्रधारी कंपनी :-**

कंपनीने प्रलंबित / लवादाकडील प्रकरणे यांना आकस्मित दायित्वे म्हणून निश्चित केली असुन ती प्रकट केली आहेत. एकूण ३८० प्रलंबित कायदेशीर / लवादाकडील खटल्यांचे वर्ष निहाय विश्लेषण खालील प्रमाणे आहेत.

| प्रकरणाचे वय | प्रकरणाची संख्या |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | ३८ |
| १ ते २ वर्षे | ५८ |
| २ ते ३ वर्षे | १९ |
| ३ ते ५ वर्षे | ४० |
| ५ वर्षापेक्षा जास्त | १९५ |
| इतर अनुपस्थित राहिलेली | ३० |
| **एकूण** | **३८०** |

खटले सामान्यत: पुढील कारणास्तव प्रलंबित आहेत : १) सुनावणी चालु आहे किंवा लवाद / न्यायाधिकरणे न्यायालये यांना अधिक माहिती / कागदोपत्री पुरावे हवी असल्याने अपूर्ण आहेत. २) न्यायालयांनी तारखा निश्चित केल्या नसल्याने किंवा स्थगीत केल्याने खटले प्रलंबित आहेत. कंपनीने प्रत्येक खटल्यातील खर्चाचे तपशील मांडले आहेत.

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

| प्रकरणाचे वय | प्रकरणाची संख्या |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | १ |

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लागु नाही

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(५) यातील उपनिर्देशांवर अभिप्राय :-**

५) **औष्णिक वीज प्रकल्पाच्या बाबतीत :- विविध प्रदुषण नियंत्रण कायदे यांचे अनुपालन करणे, त्यांचे परिणाम त्यात राखेचा वापर व विल्हेवाट व या विषयी कंपनीचे धोरण या बाबी तपासणे व त्यावर अभिप्राय देणे .**

**सुत्रधारी कंपनी :-**

कंपनीने असे निवेदन दिले आहे की वर्षे २०१५-१६ मध्ये कंपनीने प्रदुषण नियंत्रण कायदयाच्या आवश्यकतांची पूर्तता केली आहे. यामध्ये राखेची विल्हेवाट व वापराचे परिणाम यावाही समावेश आहे. या विविध प्रदुषण कायद्याची पूर्तता व राखेचा वापर व विल्हेवाट याचे आम्ही स्वतंत्रपाने पडताळणी केलेली नाही.

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

६) **कंपनीने पिटहेडस मधुन कोळसा बाहेर काढणे यासाठी खाजगी संस्थासोबत महसुल वाटुन घेण्याबाबत करार केले आहेत का? आणि त्यात कंपनीच्या वित्तिय हितसंबंधाचे योग्यप्रकारे रक्षण होते का?**

**सुत्रधारी कंपनी :-**

नाही. कंपनीने कोळसा बाहेर काढणे यांसाठी कोणत्याही खाजगी संस्थासोबत कसलेही करार केलेले नाहीत.

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही. कारण अद्याप वीज निर्मितीचे कार्य सुरू झाले नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

७) **कोळशासाठी दिलेले आदेश व प्राप्ती यांचा मेळ करणारी योग्य कार्यप्रणाली कंपनीकडे आहे का? आणि कोळसा दर्जा त्यातील ओलसरपणा आणि विलंब आकार इ.ची नोंद लेखा पुस्तकात योग्य प्रकारे केली जाते का ?**

**सुत्रधारी कंपनी :-**

होय, कंपनीकडे आदेश दिलेल्या कोळशाची संख्या / दर्जा व त्याची त्याप्रमाणे प्राप्ती यांचा मेळ करण्याची प्रणाली आहे. मात्र सध्याची पद्धती अधिक बळकट करण्याची गरज आहे. कंपनी कोळशाच्या श्रेणीची निश्चित संबधित युनिट्स अंतर्गत रसायन शास्त्रज्ञ यांचेकडून करण्याऐवजी पुरवठाद्वाराच्या बीजकातील नोंदणीप्रमाणे कोळशाचे दायित्व मान्य करते. कोळशाच्या दर्जा कमी असल्याचे दावे कोळसा भरण्याचा जागी प्रतिनिधी व पुरवठादारांचे प्रतिनिधी यांच्या तर्फे संयुक्तपणे व कोळसा खाणीने दिलेला दर्जा याबाबत केले जातात. परंतू हे दावे कोळसा पुरवठादाऱ्याने मान्य केलेले नाहीत, यामुळे व इतर कारणांमुळे अशा कंपन्याच्या शिल्लकीत फरक आढळतो.

तसेच चालू वर्षी महानिर्मितीने करारानुसार कोळशाच्या श्रेणी बाबत कोळसा कंपन्या विरुद्ध ₹ ८०३.३८ कोटीचे दावे दाखल केले. परंतु पुरवठादाऱ्यांनी मालाच्या कमी उचल यासाठी कंपनीवर ₹ ५० कोटीचा दावा लावला, कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसल्यामुळे कोणत्याही एका पक्षाचा दावा खरा असण्याच्या निर्णयापर्यंत पोहचणे कठीण आहे. कंपनीने कोळसा पुरवठादाऱ्यांचे दावे आकस्मीत देणी म्हणून उघड केली आहेत. तसेच ह्याच कोळसा पुरवठादाऱ्यांने केलेल्या कामगीरी प्रोत्साहनाच्या दाव्याचा लेखाही कंपनीने केलेला नाही.

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही. कारण अद्याप वीज निर्मितीचे कार्य सुरू झाले नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

**८) राज्य शासनाला देय असलेला विनामुल्य विजेचा वाटा किती आहे, आणि त्याची संमतीच्या करारानुसार हिशेब केला जातो का? आणि तो स्विकारलेल्या लेखा मानकांनुसार लेखांमध्ये दाखविण्यात येतो का?**

**सुत्रधारी कंपनी :-**

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, राज्य शासनाच्या कोणत्याही करारानुसार विजेचा विनामुल्य वाटा नाही.

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही. कारण अद्याप वीज निर्मितीचे कार्य सुरू झाले नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

**९) जलविद्युत प्रकल्पांच्या बाबतीत पाणी सोडणे ही कृती करताना तेथील जैविक विविधता जपण्यासाठी राज्य शासनेचे धोरण/मार्गदर्शन सुचना यानुसार केली जाते का? तसे केले नाही? तर काही दंड भरला असेल/देय असेल तर त्याची माहिती द्यावा.**

**सुत्रधारी कंपनी :**

पाणी सोडण्याचे कामावर राज्य शासनाच्या जलसंसाधन नियंत्रण असते. आणि आम्हांस दिलेल्या माहितीप्रमाणे या कामात कंपनीची कोणतीही भुमिका नाही. त्यामुळे पाणी सोडण्याबाबत कोणताही दंड भरला/देय नाही.

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही. कारण अद्याप वीज निर्मितीचे कार्य सुरू झाले नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लेखापरिक्षकांनी टिप्पणी केलेली नाही.

**१०. कंपनीकडे कार्यान्वयन नियमांचा संच आहे का? व्यवस्थापनाने कामगीरीचे मुल्याकंन वरिल नियामाप्रमाणे केले आहे का आणि नियमांचे उंल्लघंन झाल्यास कोणती योग्य कार्यवाही केली आहे का?**

**सुत्रधारी कंपनी**

लागु नाही

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

संचलन अजुन चालू झालेले नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लागु नाही.

**११. व्यापारी येणी, व्यापारी देणी हंगामी ठेवी, बँकेचे खाते आणि रोख यांच्या शिल्लकीच्या पृष्टी करण्याबाबतची टिप्पणी.**

**सुत्रधारी कंपनी**

लागु नाही

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

सर्व आवश्यक पृष्टीकरण प्राप्त झाले आहेत.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लागु नाही.

**१२. खर्चाचे सर्व घटक समाविष्ट असल्याची खात्री करण्यासाठी कंपनीने बनविलेले किमंत धोरण तपासणे.**

**सुत्रधारी कंपनी**

लागु नाही

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लागु नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लागु नाही.

**१३. कारखाना, यंत्रे व साधने यांच्या वापराची मर्यादा व निकामीपणा यावरील अहवाल, जर लागू असेल तर**

**सुत्रधारी कंपनी**

लागु नाही

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लागु नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लागु नाही.

**१४. विशिष्ट काम करण्यासाठी केंद्र / राज्य सरकार किंवा त्यांच्या संस्थेने दिलेल्या अनुदान / अर्थ सहाय्याचे फेरफार करणाऱ्या प्रकरणावरिल अहवाल.**

**सुत्रधारी कंपनी**

लागु नाही

**धुळे औ. वि.क.लि.**

लागु नाही.

**महागुज कॉलरीज लि.**

लागु नाही.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**

लागु नाही.

**बोरकर ॲन्ड मुझुमदार करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन.१०१५६९ डब्ल्यु

सीए देवांग वाघानी
भागीदार
आय सी ए आय एम. नं. १०९३८६
स्थळ : मुंबई
दिनांक : ३ सप्टेंबर २०१६

**उम्मेद जैन ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. ११९२५० डब्ल्यु

सीए यू. एम. जैन
भागीदार
आय सी ए आय एम नं. ०७०८६३

**एम.पी. चितळे ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. १०१८५१ डब्ल्यु

सीए आशुतोष पेडणेकर
भागीदार
आ सी ए आय एम नं. ०४१०३७

## स्वातंत्र्य लेखापरिक्षक यांच्या अहवालास जोडपत्र – २

### जोडपत्र : २ महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित च्या दि. ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता संबंधीत अधिनियमाच्या कलम १४३ (३) मध्ये आवश्यक असलेला स्वतंत्र लेखा परिक्षकाच्या अहवालातील परिच्छेद ९(फ) मध्ये दिलेले संदर्भ.

**कंपनी अधिनियम २०१३ (सदर कायदा) चे कलम १४३ यातील उपकलम ३ च्या खंड १ खालील अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील अहवाल.**

३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्राचे संयुक्तपणे केलेल्या आमच्या लेखापरिक्षणानुसार महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (सुत्रधारी कंपनी) व तिच्या उपकंपन्या यांच्या दि. ३१ मार्च २०१६ रोजीच्या आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत आर्थिक नियंत्रण व स्वायत्त विवरण पत्रकाच्या परिक्षणाकरीता संयुक्त पणे आमची नियुक्ती झाली आहे. उपकंपन्याच्या लेखापरिक्षकांनी आर्थिक अहवाला प्रति अंतर्गत अर्थिक नियंत्रण दि. ३१ मार्च २०१६ रोजी चे लेखापरिक्षण केले.

**अंतर्गत आर्थिक नियंत्रणाकरीता व्यवस्थापनाची जबाबदारी**

दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्स ऑफ इंडिया यांनी विहित केलेली आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील मार्गदर्शन टीप (सदर मार्गदर्शन टीप) यात नमुद केलेल्या अंतर्गत नियंत्रणासाठी आवश्यक घटकाचा विचार करुन तयार केलेले आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत नियंत्रणाच्या निष्कर्षावर आधारीत अंतर्गत आर्थिक नियंत्रण स्थापन करणे व त्याची देखरेख करणे ह्यासाठी कंपनीचे व्यवस्थापन जबाबदार आहे. या जबाबदारी मध्ये पुरेशी अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची स्थापना करणे, अंमलबजावणी करणे आणि देखभाल करणे, जे व्यवसायाची कार्यक्षमता व शिस्तबद्धता सुनिश्चित करण्याचे कार्य प्रभावीपणे करणे, कंपनीच्या धोरणाशी एकनिष्ठ असणे, सर्व मत्तांची देखभाल करणे, कोणत्याही लबाडीस आळा घालणे व लबाडीस शोधणे, लेख्यांचे दस्तऐवज अचूक व संपूर्ण करणे, आणि कंपनी अधिनियम २०१३ प्रमाणे आवश्यक खात्री लायक आर्थिक माहिती वेळेत बनवणे याचा समावेश होतो.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी**

आयसीएआय ने जारी केलेली आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत आर्थिक नियंत्रणावरील मार्गदशक टिप व लेखापरिक्षण मानके ज्या प्रमाणात लागू होतील त्यानुसार आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे कंपनीचे आर्थिक अहवालाप्रती अंतर्गत आर्थिक नियंत्रणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

**सुत्रधारी कंपनी**

*खालील अस्विकृती संबंधीच्या अभिप्रायाप्रमाणे, आम्हांला अंकेक्षण संबंधीचे पुरेसे पुरावे नसल्यामुळे, आम्ही कंपनीतील वित्तिय अहवालावरील अंतर्गत वित्तिय नियंत्रणासंबंधी अंकेक्षण अभिप्राय देऊ शकत नाही.*

**उपकंपन्या**

वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियत्रंणाचा पुरेसापणा व त्याची परिणामकारकता असल्याबद्दलचा अंकेक्षण पुरावा जमा करण्याच्या पद्धतीचा समावेश उपकंपन्याच्या अंकेक्षणामध्ये होतो. वित्तीय अहवालावरील अतंर्गत वित्तीय नियंत्रणाच्या अंकेक्षणामध्ये वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियत्रणाचे आकलन, यामध्ये दुर्बलता असलेल्या बद्दलच्या धोक्यांचे आकलन, अतंर्गत नियंत्रणाची रचना व त्याची परिणामकारकता यासंबधीची चाचणी व अवलोकन याबाबींचा समावेश होतो. यामध्ये निवडलेल्या पद्धती या लेखापरिक्षकांचा अंदाज, वित्तीय पत्रामधील घोटाळे व त्रुटी यामधील संभावित चुकांचे अवलोकन यावर अंलबुन आहे.

उपकंपन्याच्या लेखापरिक्षकांना असा विश्वास वाटतो की, उपकंपन्यांच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणा संबंधी अभिप्राय देण्यासाठी पुरेसे अंकेक्षण पुरावे मिळाले आहेत.

**वित्तिय अहवालावरील अंतर्गत वित्तिय नियंत्रणाचा अर्थ :**

कंपनीचे वित्तिय अहवालावरील अंतर्गत वित्तिय नियंत्रण ही पद्धत कंपनीच्या वित्तिय अहवालचा विश्वसनीयते संबंधीची आणि कंपनीचे वित्तिय अहवाल हे सर्वसाधारण पणे मान्य असलेल्या लेखा तत्वांप्रमाणेच तयार केलेले आहेत यासंबंधीची खात्री देण्यासाठी आहे. कंपनीच्या वित्तिय अहवालावरील अंतर्गत वित्तिय नियंत्रणात अंतर्भुत असलेली धोरणे आणि पद्धती:

१) कंपनीच्या मालमत्ताच्या संबंधीत व्यवहार आणि मालमत्तांची विल्हेवाट यासंबंधी विस्तृत, अचूक आणि न्याय रीतीने माहिती देणारे लेखे तयार करण्यासंबंधी.

२) कंपनीतील व्यवहार हे वित्तिय लेख्यांमध्ये सर्वसाधारणपणे मान्य असलेल्या लेखा तत्त्वांनुसार नोंदलेले आहेत आणि कंपनीतील जमा व खर्च हे व्यवस्थापनाने आणि कंपनीच्या संचालकांनी दिलेल्या अधिकृत परवानगीप्रमाणेच केलेले आहेत याची रास्तपणे खात्री देतात.

३) कंपनीच्या वित्तिय लेख्यांवरती मोठ्या प्रमाणात परिणाम करणाऱ्या कंपनीच्या मालमत्ता संपादन, वापर व मालमत्तेची विल्हेवाट यासंबंधी प्रतिबंध व वेळेत शोध घेण्यासंबंधी रास्त पणे खात्री देतात.

**सुत्रधारी कंपनी**

**अभिप्राय संबंधीची अस्विकृती :**

*आम्हांला पुरविलेल्या माहिती व स्पष्टीकरणावरुन, सनदी लेखापालांचे संस्थेने वित्त अहवालावरील अंतर्गत वित्त नियंत्रणाचे अंकेक्षण करण्याकरिता प्रकाशित केलेल्या मार्गदर्शन टिप्पणी प्रमाणे वित्त अहवालावरील अंतर्गत वित्त नियंत्रणा संबंधीची यंत्रणा कंपनीने प्रस्थापित केलेली नाही. यांमुळे आमचा वित्त अहवालावरील अंतर्गत वित्त नियंत्रणासंबंधी तसेच अंतर्गत वित्त नियंत्रण ३१ मार्च २०१६ पर्यंत परिणामकारकपणे कार्यरत होते किंवा नाही यासंबंधी अंकेक्षण पुरावे नसल्यामुळे आम्ही अभिप्राय व्यक्त करु शकत नाही.*

कंपनीच्या स्वतंत्र वित्त लेखांच्या अंकेक्षण चाचणीचे स्वरुप, वेळ व प्रमाण ठरविणव्याच्या वेळी वरील अस्विकृती विचारात घेतली आहे आणि वरील अस्विकृती मुख्य अंकेक्षण अहवालातील अभिप्रायांवरती कसलाही परिणाम करत नाही.

**उपकंपन्या**

**वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणामधील मुळच्या मर्यादा :**

नियंत्रणामधील संघर्ष व नियंत्रणाचे अयोग्य व्यवस्थापन यामुळे वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये मुळच्या मर्यादा असुन यामुळे वित्तीय पत्रामध्ये चुका व घोटाळे झाले असल्यास त्या लक्षात येऊ शकणार नाहीत. तसेच वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या मुल्य मापनाचे भविष्यकालीन अंदाज वर्तवण्यामध्ये, बदलेल्या परिस्थीती, धोरण पद्धतीच्या पालनाचा ऱ्हास होऊ शकल्यामुळे धोका आहे.

**मत :**

उपकंपन्याच्या लेखापरिक्षकांच्या मताप्रमाणे, उपकंपन्यामध्ये सर्व महत्वाच्या बाबींना अनुसरुन, वित्तीय अहवालावर अंतर्गत वित्तीय नियत्रंण पुरेसे असून ते मार्च ३१, २०१६ या दिवसापर्यंत परिणामकारकपणे कार्यरत आहे. तसेच हे इन्स्टिट्युट ऑफ चार्टड अकौंटटस् ऑफ इंडिया यांनी प्रसारीत केलेल्या आर्थिक अहवालाप्रति अंतर्गत आर्थिक नियंणाबद्दलच्या मार्गदर्शन टिप मधील घटकाननुसार उपकंपन्या बनविलेल्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्राणावर आधारीत आहे.

**बोरकर ॲन्ड मुझुमदार करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन.१०१५६९ डब्ल्यु

सीए देवांग वाघानी
भागीदार
आय सी ए आय एम. नं. १०९३८६
स्थळ : मुंबई
दिनांक : ३ सप्टेंबर २०१६

**उम्मेद जैन ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. ११९२५० डब्ल्यु

सीए यु.एम. जैन
भागीदार
आय सी ए आय एम नं. ०७०८६३

**एम.पी. चितळे ॲन्ड कंपनी करिता**
**सनदी लेखापाल**
एफ.आर.एन. १०१८५१ डब्ल्यु

सीए आशुतोष पेडणेकर
भागीदार
आ सी ए आय एम नं. ०४१०३७

# महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्यादित, (सीआयएन-यू४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)
# ३१ मार्च २०१६ रोजीचे एकत्रित ताळेबंद पत्रक

रक्कम (₹) मध्ये

| | | | संख्या क्र. | ३१ मार्च २०१६ | ३१ मार्च २०१५ |
|---|---|---|---|---|---|
| I. | **समभाग व दायित्वे** | | | | |
| | | भागधारकांचे निधी | | | |
| | अ) | भाग भाडंवल | १ | २४०,९८३,५६७,८८० | ८०,५७२,८४५,६४० |
| | | अल्पसंख्य हितसंबंध | | ० | २००,००० |
| | ब) | राखीव व अधिक्य | २ | (६५,६५०,२८५,४३९) | २२,१४८,३६८,४१२ |
| | | भाग अर्ज निधी प्रलंबित वाटप (टिपा क्र.२४ पहावी चालु नसलेली दायित्वे) | | ७,५५९,८००,०२५ | ९,३०३,११७,८९७ |
| | अ) | दीर्घ मुदतीची कर्जे | ३ | २२७,७८७,२८९,९४३ | २४६,६१०,४५९,२७८ |
| | ब) | स्थगित कर दायित्वे (निव्वळ) | ४ | १५,२४२,७१९,०७८ | १४,७१६,९१७,०४४ |
| | क) | इतर दीर्घ मुदतीची दायित्वे | ५ | ११,२६४,२८२,०७९ | २१,८८५,७४१,१८२ |
| | ड) | दीर्घ मुदतीच्या तरतुदी | ६ | ८,०३३,६६२,७४० | ८,३८४,२८३,६३१ |
| | | चालु दायित्वे | | | |
| | अ) | अल्प मुदतीची कर्जे | ३(अ) | ९४,३९९,६१८,७५२ | ६०,३९०,३४२,८१८ |
| | ब) | व्यापारी देणी | ७ | १३,८२६,२५६,८५४ | ४०,६३७,३०७,००६ |
| | क) | इतर चालु दायित्वे | ७(अ) | ६८,५१७,६७२,८२६ | ३८,८३८,०११,४४९ |
| | ड) | अल्प मुदतीची दायित्वे | ६ | २,५५२,१९६,२४२ | ३,५९८,६०३,८०८ |
| | | **एकूण** | | **६२४,५१६,७८०,९८०** | **५४७,०८६,१९८,१६४** |
| II | **स्थिर मत्ता** | | | | |
| | | **चालु नसलेल्या मत्ता** | | | |
| | अ | स्थिर मत्ता | | | |
| | | मूर्त मत्ता (निव्वळ गट) | ८ | २७६,५४९,१३१,९३५ | १८२,४१८,१५४,६०७ |
| | | अमूर्त मत्ता (निव्वळ गट) | ८ | १६१,७४१,७२१ | १६१,६०६,०९५ |
| | | प्रगती पथावरील भांडवली कामे (निव्वळ) | ८(अ) | १७४,४२९,२४५,५४१ | २०५,७६८,३२६,५७४ |
| | | | | | |
| | ब) | चालू नसलेल्या गुंतवणुकी | ९ | ३००,००० | ३००,००० |
| | क) | दीर्घ मुदतीची कर्जे व अग्रीम | १० | ३,५६२,५४०,४६७ | ८,९४८,०७३,३७८ |
| | | **चालु मत्ता** | | | |
| | अ. | वस्तुसुची | ११ | १९,०२५,१०२,६६३ | १४,२३१,६४४,३६८ |
| | ब. | व्यापारी येणी | १२ | ११३,४३०,२७८,७२० | १०६,०७१,३३५,९२४ |
| | क. | रोख व रोख समतूल्य | १३ | १,४४५,१९०,२७१ | ९०४,६४६,८३९ |
| | ड. | अल्प मुदतीची कर्जे व अग्रीमे | १० | २८,४४३,४४८,७६४ | २४,५८६,२३१,९४६ |
| | इ. | इतर चालु मत्ता | १४ | ६,९२५,७३०,७८९ | ३,४५१,८०८,३२१ |
| | फ. | संकीर्ण खर्च | | ५४४,०७०,१११ | ५४४,०७०,११२ |
| | | **एकूण** | | **६२४,५१६,७८०,९८०** | **५४७,०८६,१९८,१६४** |
| | | कृपया वित्तिय विवरणवत्रासोबत जोडलेल्य टिपा पहाव्यात | | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**एम. पी. चितळे ॲन्ड कं. करीता**

सनदी लेखापाल

सी ए आशुतोष पेडणेकर

भागीदार (आयसीएआय एम नं.: ०४१०३७)

**बोरकर आणि मझुमदार करीता**

सनदी लेखापाल

सी ए देवांग वाघानी

भागीदार (आयसीएआय एम नं.: १०९३८६)

**उमेद जैन ॲन्ड कं. करीता**

सनदी लेखापाल

सी ए उमेद जैन

भागीदार (आयसीएआय एम नं.: ०७०८६३)

मुंबई ३ सप्टेंबर २०१६

**महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी करीता**

जे. के. श्रीनीवासन

संचालक वित्त व मुख्य वित्त अधिकारी

डीआयएन नं.:०१२२०८२८

बीपीन श्रीमाळी

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

डीआयएन नं.: ०३२७२१३५

पंकज शर्मा

मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

राहूल दुबे

कंपनी सेक्रेटरी

एम नं.: ए१४२१२

## महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी मर्यादित, (सीआयएन-यू४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)

### दि. ३१.०३.२०१६ रोजी संपलेल्या वर्षाचे एकत्रित नफा व तोटा पत्रक

रक्कम (₹) मध्ये

| | | टिपा क्र. | २०१५-१६ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तनापासूनचा महसूल | १५ | १९२,९३४,२२७,७३९ | १८९,६९९,९५६,८७७ |
| २. | इतर उत्पन्न | १६ | १,०३६,५४१,७३४ | २,६६९,९००,९८६ |
| ३. | एकूण महसूल (१+२) | | १९३,९७०,७६९,४७४ | १९२,३६९,८५७,८६२ |
| ४. | खर्च | | | |
| | (अ) वापरलेल्या साहित्याचा खर्च | १७ | ११३,७५१,६११,८२९ | १२१,८२२,३८७,२७५ |
| | (ब) कर्मचारी लाभ खर्च | १८ | १२,६९२,८५१,९७५ | १४,१६१,८९६,१२८ |
| | (क) वित्त खर्च | १९ | २०,०८२,०७७,३५० | १९,५२६,४३५,७०० |
| | (ड) घसारा / कर्जफेडी ची तरतूद | ८ | १२,७५७,२३८,०६६ | १०,९१६,६९५,०३७ |
| | (इ) इतर खर्च | २० | १७,४१०,३२१,४९१ | १५,९४८,००२,०९० |
| | (फ) पूर्व कालीन बाबी (निव्वळ) | २१ | (४१०,४८१,८६३) | (८०,३०३,८०७) |
| | एकूण खर्च | | १७६,२८३,६१८,८४९ | १८२,२९५,११२,४२२ |
| ५. | नफा – कर पूर्व ((३)-(४)) | | १७,६८७,१५०,६२५ | १०,०७४,७४५,४४० |
| ६. | असामान्य बाब | २१(अ) | १०५,२०२,४३७,४३० | |
| ७. | नफा – कर पूर्व ((५)-(६)) | | (८७,५१५,२८६,८०६) | १०,०७४,७४५,४४० |
| ८. | **कर खर्च** | | | |
| | **(अ) चालू कर** | | ४३,८७८ | २,४२४,०७२,६६८ |
| | (ब) स्थगित कर | | ५२५,८०२,०३४ | ३,३०७,७४०,४९० |
| | **नफा / तोटा या कालावधीसाठी** | | (८८,०४१,१३२,७१८) | ४,३४२,९३२,२८२ |
| | १. मुळ | | (९.७३) | ०.५२ |
| | २. सौम्य केलेला | | (९.७३) | ०.५२ |
| | कृपया वित्तिय विवरणवत्रासोबत जोडलेल्या टिपा पहाव्यात | | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार
**एम. पी. चितळे ॲन्ड कं. करीता**
सनदी लेखापाल

सी ए आशुतोष पेडणेकर
भागीदार (आयसीएआय एम नं.: ०४१०३७)

**बोरकर आणि मझुमदार करीता**
सनदी लेखापाल

सी ए देवांग वाघानी
भागीदार (आयसीएआय एम नं.: १०९३८६)

**उमेद जैन ॲन्ड कं. करीता**
सनदी लेखापाल

सी ए उमेद जैन
भागीदार (आयसीएआय एम नं.: ०७०८६३)
मुंबई ३ सप्टेंबर २०१६

**महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी करीता**

जे. के. श्रीनीवासन
संचालक वित्त व मुख्य वित्त अधिकारी
डीआयएन नं.:०१२२०८२८

बीपीन श्रीमाळी
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन नं.: ०३२७२१३५

पंकज शर्मा
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

राहूल दुबे
कंपनी सेक्रेटरी
एम नं.: ए१४२१२

## एकत्रित वित्तिय विवरणपत्रांवर टिपा

**१) ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तिय विवरण पत्राचा भाग असलेली महत्त्वाची लेखा धोरणे आणि लेख्यांवरील टिपा.**

**ए) वित्तिय विवरणपत्रे तयार करण्यासाठी आधारित तत्त्वे :**

**१ महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.लि. (महानिर्मिती)**

महानिर्मिती कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतुदीनुसार नोंदणी झालेली एक सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे. ही कंपनी विद्युत अधिनियम २००३ या कायद्याने शासीत आहे. जेव्हा विद्युत अधिनियम २००३ व त्या अंतर्गत केलेली नियमावली ही कंपनी अधिनियम २०१३ यांच्या लागु होणाऱ्या मर्यादेशी सुसंगत नसतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १७४ नुसार सदर अधिनियम व त्याची नियमावली अभिभावी असेल.

**धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड :**

धोपावे कोस्टल पॉवर लि. ही कंपनी दि. १६ ऑगस्ट २००७ रोजी स्थापन झाली असुन ती महानिर्मिती कंपनीची एक उपकंपनी आहे. या कंपनीचे मुख्य उद्दीष्टे व कार्य वीज निर्मिती करणे आहे.

ही वित्तिय विवरणपत्रे उपार्जन तत्त्वांचे ऐतिहासिक खर्च संकेत या तत्वांनुसार केली असून ती भारतात सामान्यत: स्विकारलेली लेख्यांची तत्वे आणि कंपनी कायदा, २०१३ कलम १३३ प्रमाणे लागू असलेल्या लेखा मानके आणि कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदी यांच्याशी सुसंगत आहेत. कंपनीकडे ₹५००,०००इतके भरणा केलेले भाग भांडवल व ₹८३,२६८,१०९इतके दीर्घ मुदतीचे कर्जे आहे, ते सुत्रधारी कंपनीच्या उपकंपन्याकडून घेण्यात आले आहे. हे भांडवल मुख्यत: चालू असलेल्या भाडंवली खर्चासाठी वापरण्यात आले आहे. सुत्रधारी कंपनीच्या उपकंपनी धोपावे धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड (डिसीपीएल) बंद करण्यासाठी परवानगी मिळविली असून आणि असा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर केला आहे, म्हणून वित्तिय लेखापत्रे कार्यरत कंपनीच्या तत्वांनुसार तयार केलेली नाहीत. याकरिता, कंपनीने यासंबंधीची तरतूद लेखा पुस्तकांमध्ये केलेली आहे. महाराष्ट्र शासनाची परवानगी मिळाल्यानंतर या तरतुदी, मत्तांबरोबर वर्ग केल्या जातील.

३१ मार्च २०१६ अखेर कंपनीने ₹ ८२,९३२,२१२ इतका खर्च व उचल दिलेली आहे. सुत्रधारी कंपनीच्या दोन उपकंपन्या बरोबर अशी व्यवस्था केली आहे की या कंपन्या सर्व खर्चाचा परतावा तसेच उगमस्थांनी करकपात इत्यादी गोष्टींची काळजी घेतील.

**महानिर्मिती ॲश मॅनेजमेंट सर्व्हिसेस लिमिटेड. (एमएएमएसएल)**

महानिर्मिती ॲश मॅनेजमेंट सर्व्हिसेस लि. या कंपनीची स्थापना २४ ऑगस्ट २००७ रोजी झाली. या कंपनीचे मुख्य उद्दीष्टे व कार्य विजेची निर्मिती करणे हे आहे. हे कंपनीचे नववे (९वे) वर्षे आहे.

**महागुज कॉलरीज लिमिटेड (एमसीएल) :**

कंपनीची वित्तिय विवरणपत्रे ही कार्यरत संस्था या तत्वानुसार तयार केलेली आहेत आणि ती भारतात सनदी लेखापाल संस्थेने जारी केलेल्या लेखा मानके व कंपनी कायदा २०१३ च्या तरतूदीनुसार सामान्यत: स्विकारलेली लेखांची तत्वे यानुसार उपार्जन तत्वांचे ऐतिहासिक खर्च संकेताशी सुसंगत आहेत. सर्व मत्ता व देणी यांची वर्गवारी अल्पमुदतीची व दीर्घमुदतीची अशी केली असुन आणि हे कंपनीच्या सर्वसाधारण कार्यचक्र व सुधारित परिशिष्टामधील निकषाप्रमाणे आहे.

कंपनीचे तिची मत्ता व देणी यांची अल्पमुदतीची व दीर्घमुदतीची अशी वर्गवारी करण्याकरिता तिचे कार्यचक्र १२ महिने इतके असल्याची खात्री केलेली आहे.

कंपनी सामान्यत: व्यापारी लेखा पद्धत वापरते आणि उत्पन्न व खर्च यांतील मुख्य बाबींची आलेख ही जमा झाल्याने झालेली वाढ या तत्वांनुसार करते.

भारत सरकारने १९९३ ते २०१० या कालावधीमध्ये वाटप केलेल्या कोळसा खाणींचे वाटप माननीय सर्वोच्च न्यायालयाने २५-

०८-२०१४ व २४-०९-२०१४ आदेशान्वये रद्द केलेले आहे, यामध्ये कंपनीच्या संस्थापकांना वाटप झालेल्या मच्छकटा-महानदी कोळसा खाणीचा समावेश आहे. रद्द झालेल्या कोळसा खाणींच्या पूर्नेवाटपाकरिता भारत सरकारने कोळसा खाणी (विशेष तरतुद) कायदा, २०१५ (२०१५ मधील क्र.११) हा २१-१०-२०१४ या दिवसापासून पूर्वलक्षी प्रभावाने जारी केलेला आहे.

याप्रमाणे वरील उल्लेख केलेल्या कोळसा खाणीचे पूर्नेवाटप भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने नविन कंपनीस केल्यानंतर कागदपत्रे, भूवैज्ञानिक अहवाल,खाणीचा नकाशा, खाण बंद करण्याचा नकाशा इत्यादींच्या हस्तांतरणाची प्रक्रिया आणि भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने ठरविलेली भरपाईची रक्कम महागुज कॉलरीज लिमिटेडच्या संस्थापकांना देण्यांसंबंधीची प्रक्रिया चालू केली जाईल. यानंतर कंपनीचा कारभार गुंतवण्याची प्रक्रिया चालू केली जाईल.

२ **एकत्रीकरणाची तत्त्वप्रणाली :**

एकत्रित वित्तिय विवरणपत्रे हे मुळ जनक कंपनी म्हणजे महानिर्मितीशी नात्याने संबंधित आहेत म्हणजे महानिर्मिती कंपनी लि. आणि तिच्या उपकंपन्या यांच्याशी निगडीत आहेत.

ही एकत्रित वित्तिय विवरणपत्रे कार्यरत (चालु असलेली) संस्था या तत्वानुसार तयार केलेली आहेत आणि ती भारतात सामान्यात: स्वीकारलेली लेख्यांची तत्वे (इंडियन जी.ए.ए.पी.) यानुसार उपार्जन तत्वांचे ऐतिहासिक खर्च संकेत यांच्याशी सुसंगत आहेत. जी ए.पी.पी. सामान्यत; स्विकारलेली लेख्यांची तत्वे ही कंपनी अधिनियम २०१३ (अधिनियम) यांनी कलम १३३ ज्यांचे सहवाचन कंपनी (लेखा) नियमावली २०१४ यातील नियम ७ नुसार व या कायद्यांच्या तरतुदी यानुसार बंधनकारक असणाऱ्या लेखा मानकांचा एक भाग आहेत.

ही एकत्रित वित्तिय विवरणपत्रे तयार करताना शक्यतो सामान्यत: व्यवहार व तरतुद परिस्थितीत घटनाप्रसंग यासाठी असलेली महत्वाची लेखा धोरणे यांचा उपयोग केला आहे आणि ती त्या शक्यतांच्या मर्यादित, ज्या पद्धतीने महानिर्मितीची वेगळी वित्तीय विवरणपत्रे सादर केली आहेत त्याच मर्यादेत ती सादर केली आहेत.

महानिर्मितीची आणि तिच्या उपकंपन्या यांची वित्तिय विवरणपत्रे ही लाईन-बाय-लाईन एकत्रित करताना सारख्या मत्ता, दायित्व, उत्पन्न व खर्च यासारख्या बाबींची एकत्रित बेरीज करण्यात आली आहे. गटांच्या अंतर्गत असणारी शिल्लक, आंतर गट व्यवहार आणि अशा व्यवहारातील प्राप्त स्वरुपातील नफे किंवा तोटे यांना पुर्णपणे काढून टाकण्यात आले. उपकंपन्यामधील अल्पसंख्या हितसंबंध हे एकत्रित वित्तिय पत्रांत वेगळे निर्देशित केले आहेत.

उपकंपन्यांची आकडेवारी जेथे आवश्यक आहे तेथे जनक कंपनी म्हणजे महानिर्मितीच्या वित्तिय विवरण पत्रांशी अनुरुप करण्यासाठी पूर्नवर्गीकरण करण्यात आले आहे.

काही बाबींसाठी महानिर्मिती व तिच्या उपकंपन्या याची वेगवेगळी लेखा धोरणे वापरलेली आहेत. मात्र त्यांचा परिणाम नगण्य आहे.

३ **एकत्रित वित्तिय विवरणपत्रात समाविष्ट केलेल्या कंपन्या :**

एकत्रित वित्तिय विवरणपत्र यामध्ये लेखा परिक्षण केलेला व दि. ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षासाठीची महानिर्मिती व तिच्या उपकंपन्यांची लेखा परिस्थित केली वित्तिय विवरणपत्रे यांचा समावेश आहेत.

| कंपनीचे नाव | महानिर्मिती मालकीचे स्वारस्य ३१.०३.२०१६ |
|---|---|
| उपकंपन्या | - |
| धोपावे कोस्टल पॉवर | १०० टक्के |
| महागुज कोलयराज लिमिटेड | ६० टक्के |
| महानिमिर्ती राख सेवा व्यवस्थापन मर्यादीत | १०० टक्के |

महागुज कॉलरीज लिमिटेड मधील अल्पसंख्याक हक्क हे ऋण असल्यामुळे शून्य असे दर्शविण्यात आले आहेत आणि त्याचे समायोजन कंपनीच्या ₹ ४६.१३ लाख या संचिताशी करण्यात आले आहे.

४ धोपावे कोस्टल पॉवर कं.लि. या कंपनीच्या प्रकरणी महानिर्मिती कंपनीने ₹ ५,००,०००/- भाग भांडवलाचा भरणा केला असुन ₹ ८३,२६८,१०९/- दीर्घ मुदतीचे कर्जे दोन उपकंपन्यांकडून पर्यायाने सुत्रधारी कंपनीकडून घेतले आहे. हे कर्जे प्रामुख्याने प्रगती पथावरील भांडवली कामाच्या खर्चासाठी घेतले आहेत.

कंपनीने वित्तिय लेखापत्रे कार्यरत कंपनीच्या तत्वांनुसार तयार केलेली नाहीत कारण सूत्रधारी कंपनी संचालक मंडळाने उपकंपनी धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड बंद करण्यास मान्यता दिली असून, धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड कंपनी बंद करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर केला आहे. म्हणून कंपनीने लेखापुस्तकामध्ये सदर बाबीची तरतुद केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेनंतर सदर तरतुदीचे समायोजन संबंधित मत्तांबरोबर करणयात येईल.

**बी) अंदाजाचा उपयोग**

**वित्तिय विवरणपत्रे सामान्यत:** स्वीकृत लेखा तत्वांशी सुसंगत वित्तिय विवरणपत्रे तयार करताना कंपनीच्या व्यवस्थापनास काही अंदाज करावे लागतात आणि गृहिते धरावी लागतात. हे अंदाज व गृहिते यांचा वित्तिय विवरण पत्राच्या तारखेला मत्ता व दायित्वे तसेच महसुल व खर्च यांच्या अहवाल काळातील रकमांवर परिणाम प्रत्यक्ष निष्कर्ष हे अंदाजापेक्षा वेगळे असु शकतात. अंदाजा संबंधीची परिस्थितीत बदल होत आहे, असे व्यवस्थापनाच्या लक्षात आल्यास अंदाजामध्ये योग्य ते बदल केले जातात. अंदाजातील केलेल्या बदलाचे प्रतिबिंब, त्या कालावधीतील वित्तिय विवरण पत्रात दिसुन येते आणि जर महत्वाचे असेल तर त्याचे प्रकटन वित्तिय विवरणपत्रात केले जाते.

**सी) मूर्त स्थिर मत्ता**

१ स्थिर मत्तांची नोंद त्यांच्या ऐतिहासिक किंमतीनुसार लेखा पुस्तकात केली जाते. स्थिर मत्ता त्यांच्या संपादनाच्या किंवा त्यांची रचना करण्यास लागलेला खर्च वजा संचित घसारा आणि जर त्या जुन्या / निकामी झाल्यास त्याची तरतुद यानुसार नमूद केल्या जातात. दि. ३१.०३.२०१६ च्या शासण निर्णयान्वये, महाराष्ट्र शासणाने "महाराष्ट्र विद्युत पुर्नेरचना हस्तांतरण योजना, २०१६ " जारी केली. शासन निर्णयातील कलम ३ प्रमाणे " महाराष्ट्र विद्युत पुर्नेरचना हस्तांतरण योजना,२०१५ "यामध्ये सुधारणा केली व या योजनेत मत्तांच्या मुल्यांकनासंबंधी कलम १० अ चा अंर्तभाव करण्यात आला. कलम १० अ अन्वेय महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मत्ता महाराष्ट्र शासनास शासन आदेशान्वेय हस्तांतरण करण्यात आल्या. त्या मत्तांचे पुर्ण हस्तांतरण महानिर्मितीसह नविन स्थापण झालेल्या ५-६-२००५ या दिवशीच्या मत्तांच्या बाजारमुल्याप्रमाणे करण्यात आले. अशा प्रकारे कंपनीने तीच्या ०५.०६.२००५ या रोजी असलेल्या नक्त मत्तांच्या किंमतीमध्ये जी वाढ ०१.०४.२०१५ या दिवशी केलेली आहे, तेवढ्याच प्रमाणात कंपणीने तिच्या स्थिर मत्तांची किंमत वाढविली आहे.

२ मत्ता: संपादनाच्या खर्चामध्ये वाहतुक खर्च, शुल्क, कर (जो नंतर कर प्राधिकाऱ्याकडून परत मिळणार आहेत त्या व्यतिरिक्त ) अन्य वसुली, खर्च आणि त्या वापरासाठी योग्य करण्यासाठीचे सर्व प्रासंगिक खर्च समाविष्ट आहेत.

३ कंपनीच्या मालाकीच्या नसलेल्या स्थिर मत्ताच्या निर्मितीसाठी केलेला भांडवली खर्च हा अशा मत्तांचे बांधकाम जोपर्यंत चालु आहे, तोपर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामांच्यामध्ये दर्शविण्यात येते आणि बांधकाम पूर्ण झाल्यावर 'कंपनीची मालकी नसलेल्या मत्तांचा भांडवली खर्च" या लेखाशीर्षांतर्गत नोंदला जातो. कंपनीची मालकी नसलेल्या मत्तासाठीचा तसेच कंपन्यांची सामाजिक जबाबदारींची कामे या योगदानासाठी केलेल्या महसुल खर्चाचे आकार नफा व तोटा पत्रकात केले जातात

४ प्रगतीपथावरील चालु असलेल्या ज्या भांडवली कामांकरिता कंत्राटदारांच्या देयकांचे अंतिमीकरण होणे अद्याप बाकी आहे, त्याचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर व अंतिमरित्या चुकती करण्यासाठीच्या समायोजनांच्या अधीन राहून केले जाते.

५ भांडवली कंत्राटाच्या दरातील विचलनाचे दावे, कंपनीने स्वीकारले तरच त्यांचे लेखे केले जातात.

६ ज्यांची मंजुरी विचाराधिन आहे असे प्रकल्प शोधणे, त्यासाठी सर्वेक्षण व सक्षमतेचा अभ्यास करणे यासाठी केलेला खर्च सदर प्रकल्प नाकारला जाणे किंवा तीन वर्षे यापैकी जो कालावधी आधी असेल तोपर्यत प्रगतीपथावरील भांडवली कामे यात समाविष्ट केला जातो प्रकल्प नाकारल्यास, ज्यावर्षी तो नाकारला त्या वर्षाच्या महसुलात तो खर्च आकारला जातो.

७ ज्या स्थिर मत्तांच्या बाबत जर काही शासकीय अनुदान मिळाले तर त्या मत्ता लेखा पुस्तकांत निव्वळ अनुदान स्वरुपात दाखविले जातात

८ ज्या स्थिर मत्तांचा प्रत्येकी किंमत ₹ ५०००/- पर्यंत आहे, त्याचा खरेदी वर्षात पूर्ण घसारा केला जातो. सर्व मोबाइल फोनची किंमत खर्च खरेदी वर्षाच्या महसुलमध्ये आकारली जाते.

९ प्रत्यक्ष वापरातुन निवृत्त केलेल्या व विक्रीसाठी राखुन ठेवलेल्या मत्तांचे मुल्यांकन निव्वळ पुस्तकी मुल्य किंवा निव्वळ वसुली योग्य मुल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार ठरविले जाते व ते इतर चालु मत्ता म्हणून प्रकट केले जाते.

१० डीसीपीएलच्या संदर्भात, स्थिर मत्ता ह्या त्यांच्या संपादनाच्या घसारा व संबंधित मत्तांना त्यांच्या ठरविलेल्या वापराकरीता चालू स्थितीत आणण्याकरिता येणारा खर्च वजा करुन दर्शविल्या जातात.

११ एमसीएल च्या संदर्भात स्थिर मत्ता ह्या त्यांच्या संपादनाच्या खर्चातून घसारा व संबंधित स्थिर मत्तांना त्यांच्या ठरविलेल्या वापराकरिता चालू स्थितीत आणण्याकरिता येणारा खर्च वजा करुन दर्शविल्या जातात.

स्थिर मत्तांवरील घसारा हा कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार मुल्य कमी होण्याच्या पध्दतीप्रमाणे आकारला जातो.

वाढविलेल्या मत्ता / काढून टाकलेल्या मत्ता यांच्या वरील घसारा हा वाढींची / काढून टाकलेल्या दिवसाच्या प्रमाणात आकारला जातो.

१२ **अमूर्त मत्ता :** अमूर्त मत्तांचे भविष्यातील संभाव्य लाभ कंपनीकडे प्रवाहीत होणार असतील तर खर्चातून कर्जफेडीची संचित तरतुद आणि कमी करण्यातील तोटे वजा करुन त्याचे भांडवली करण केले जाते.

१३ **प्रगतीपथावरील भांडवली कामे :नवे प्रकल्प / विस्तार**

याद्वारे होणाऱ्या स्थिर मत्ताचे प्रकरणी असे प्रकल्प / विस्तार कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंत संबधित खर्च यांचे व व्याज यांचे भांडवलीकरण केले जाते.

१४ कंपनीने प्रकल्प व नियोजनाच्या कार्यालयांवर या कालावधीत केलेल्या एकूण खर्चाचे संविभाजन संबंधित अमंलबजावणी चालू असलेल्या प्रल्कपांच्या प्रगती पथावरील भांडवली कामे यांच्या लेखामध्ये रचना चालू असणाऱ्या मत्तांच्या संचयी खर्चाच्या शिलकीच्या आधारे केले जाते.

१५ प्रकल्प / वीज निर्मिती कडे प्रायोगिक टप्प्यावर चालविल्यानंतर त्यासाठी लागलेला खर्च व त्यातून निर्माण झालेला महसूल यांचे समायोजन भांडवलीकरणाच्या दरम्यान केले जाते.

**डी) उसनवारी खर्च**

